
४४

# शब्द रुची

जानेवारी २०२०
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६८



storytel

# नववर्षाचा संकल्पः 2020 मध्ये ऐका ऑडिओबुक्स!




१ जानेवारी २०२० रोजी माहितीयुगाच्या नव्या पर्वात प्रवेश करताना आपल्या आसपास अनेक सामाजिक बदल घडताना दिसत आहेत. मोठ्या शहरात अनेक तरूण मुले आणि मुली हेडफोन लावून वावरताना दिसतात. सिलेक्टेड कंटेंटच ऐकतात किंवा पहातात अशा चोखंदळ वाचक, प्रेक्षक आणि श्रोत्यांसाठी मोबाईलवर नवे ऑडिओ आणि व्हिडीओ ओटिटी प्लॅटफॉर्म निर्माण होऊ लागले आहेत.

या नव्या तंत्रज्ञानामुळे वाचकांच्या पुस्तक वाचनाच्या सवयी बदलत आहेत. अनेक चोखंदळ वाचक आता आपल्या टॅबवर किंवा रिडरवर ईबुक्स वाचतात किंवा मोबाईलवर ऑडिओबुक्स ऐकतात. अनेक उत्तमोत्तम, दर्जेदार साहित्यकृती आता ऑडिओबुक्स स्वरूपात उपलब्ध होऊ लागल्या आहेत. नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातले अनेक नामवंत अभिनेते आपल्या वाचनकौशल्याचा वापर करून या दर्जेदार साहित्यकृतींना आपल्या आवाजाने अधिक कलात्मक पध्दतीने सादर करत आहेत.

भारतामध्ये २०१७ साली स्टोरीटेल या स्विडिश स्ट्रिमिंग कंपनीने ऑडिओबुक्सची सेवा मासिक वर्गणी घेऊन द्यायला सुरूवात केली. फक्त रू.२९९ रूपयात मराठी, इंग्रजी आणि हिंदीतील एक लाखांहून अधिक पुस्तके ऑडिओबुक्स स्वरूपात मोबाईल ॲपमध्ये एका क्लिकवर उपलब्ध झाली. ही एक प्रकारची क्रांतीच आहे.










## स्टोरीटेल डाऊनलोड कसं कराल?

अकाऊंट उघडण्यासाठी www.storytel.com/**marathi** या वेबसाईटला भेट द्या

ईमेल आयडी, पासवर्ड किंवा फेसबूकवरूनही तुम्हीं अकाऊंट उघडू शकता

तुमच्या डेबिट किंवा क्रेडिट कार्डचा तपशील भरा

****

तुमच्या फोनवर ओटीपी नंबर येईल

कन्फर्मेशन मिळवा

स्टोरीटेल ॲप ॲप-स्टोअर किंवा प्ले-स्टोअरवरून शोधा व डाउनलोड करा

QR कोड स्कॅन करा आणि 30 दिवस मोफत ऐका

30 दिवसांचा ट्रायल पिरियड संपल्यानंतर तुमचे सबस्क्रिप्शन 299/महिना असे सुरू राहील.

Download on the App Store

GET IT ON Google Play

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची


ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**जानेवारी २०२०, वर्ष सहावे**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**


---


**कार्यालयीन संपर्क**

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**


---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

---


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप.
हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com


---

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---


अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.


## अनुक्रम


**साहित्यसंमेलन विशेष**

- **उस्मानाबादच्या साहित्यिक इतिहासाला मिळेल झळाळी/ ६**
  **रवींद्र केसकर**

**स्मरणस्वर**

- आयुष्यावर सावली धरणारे : डॉ. श्रीराम लागू / ९
  **दीपक करंजीकर**
- डॉ. श्रीराम लागू माझे गॉडफादर / १२
  **कुमार सोहोनी**
- हळव्या ग्रामीण व्यथांचे चित्रण
  सखा कलाल यांच्या कथा / १४
  **डॉ. वृषाली किन्हाळकर**

**कलासंस्कृती**

- मुखपृष्ठ चित्रकार सतीश भावसार / १८
  **मुलाखत : दीपक घारे**
- टू लेट / २२
  **संतोष पाठारे**

**साहित्यरंग**

- दहिवडीचे दिवस / २४
  **अपर्णा महाजन**
- **डॉ. अनंत देशमुख यांच्या कविता** / २७

**अवतीभवती**

- चंद्राची दुसरी बाजू / २८
  **डॉ. मोहन द्रविड**
- राजकारण आणि राजकारण्यांचं पर्सनल ब्रँडिंग
  काल, आज आणि उद्या / ४१
  **डॉ. लतिका भानुशाली**
- अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची निवडणूक : स्वरूप व संदर्भ / ४५
  **डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
- आदर्शवादी संस्थाचे पुनर्जीवन : राष्ट्र सेवा दलाचा
  महत्त्वाकांक्षी प्रकल्प / ५०
  **अभिजित हेगशेट्ये**
- बालवाचकदिन : अभिवाचन स्पर्धा - **चांगदेव काळे** / ५१
- **'ग्रंथाली' ४५ वा कथा-विशेष वाचकदिन वृत्तांत** / ५३
- **मराठीप्रेमी पालक महासंमेलन वृत्तांत** / ५७
- **'ग्रंथाली' पुस्तकप्रकाशन वृत्तांत** / ६१
- ग्रंथाली ग्रंथपाने - **चांगदेव काळे** / ६३

# संपादकीय

समाज सातत्याने बदलत राहतो. अभिसरण, परिवर्तन आणि गतिशीलतेबरोबरच स्थितिशीलता हेही आपल्या समाजाचे वैशिष्ट्य असते, त्यामुळेच रुढी-परंपरा आणि विचारांच्या साखळबंद अवस्थेतून समाजाचे काही घटक बाहेर पडू इच्छित नाहीत. यामागच्या कारणांचा ऊहापोह वेगवेगळ्या विचारवंतांनी आजतागायत केला आहे. वैचारिक ऊहापोहांबरोबर कृतिशील विद्रोहाची पुरेपूर किंमतही त्यांना आपल्या समाजात मोजावी लागली.

समाजपरिवर्तनाची वाट शिक्षणातून जाते. आजची शिक्षणव्यवस्था आमूलाग्र बदलली आहे. विचारवंत गोविंद पानसरे त्यांच्या एका भाषणात म्हणतात, ''नवी बाजारी शिक्षणसंस्कृती तयार झाली आहे. शिक्षण हा धंदा झाला आहे. 'शिक्षणमहर्षी' मागे पडताहेत आणि 'शिक्षणसम्राट' उदयास आले आहेत.''

एका राजव्यापी शिक्षक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून उपस्थित डॉ. प्रज्ञा दया पवार यांनी अलीकडेच केलेले भाषण आपल्या देशातील शिक्षणव्यवस्थेवर नेमके भाष्य करणारे होते. या भाषणात शिक्षणप्रक्रियेस आवश्यक वातावरण आपल्याकडे आहे का? प्रश्न विचारण्याचा विद्यार्थ्याचा अधिकार या शिक्षणव्यवस्थेत हिरावला जातोय का? अंगभूत विषमता आजच्या शिक्षणव्यवस्थेला पोकळ करते आहे का? असे कळीचे प्रश्न त्यांनी या निमित्ताने ऐरणीवर आणले.

एकूण जगण्यातलीच भेसळ वाढत जाण्याच्या आजच्या काळात अनेक गोष्टींचा बळी गेला आहे. सत्याच्या मुळापर्यंत जाणे अवघड होते आहे. मूक प्रेक्षकांची संख्या वाढते आहे. कसलीही झळ आपल्याला लागू नये म्हणून वास्तवाच्या आगीपासून दूर राहाणं लोकांना अधिक सोयीचं वाटतं.

धर्म नि जात हे मुद्दे कायमच समाजात संघर्षाचे मुद्दे राहिले आहेत. काही संघर्ष संपवण्यापेक्षा ते जिवंत राहण्यातच अनेकांचा स्वार्थ असतो. अशा संघर्षांना भिडण्याची ताकद प्रतिभावंतांच्या अभिव्यक्तीत असते.

फाळणीच्या पार्श्वभूमीवरची मंटोची एक कथा आहे. 'सहाय' नावाची! या कथेची सुरुवातच अशी आहे, ''ये मत कहो कि एक लाख हिंदू, एक लाख मुसलमान मरे हैं। ये कहो कि दो लाख इन्सान मरे हैं।'' कथेची ही सुरुवात वाचकाला धरून ठेवते. या एका वाक्यातून मंटो केवढं मोठं सत्य सांगून जातो.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'जनस्थान' पुरस्कार स्वीकारताना वसंत आबाजी डहाके त्यांच्या भाषणात म्हणाले, ''सध्या प्रागतिक भांडवलशाहीचा काळ आहे. ही नुसती आर्थिक अवस्था नसते तर राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक अवस्थाही असते. सत्तासंपादनासाठी वेळोवेळी वंश, धर्म, भाषा या प्रभावी घटकांचा उपयोग केला जातो.'' कवी हस्ती यांच्या दोन ओळी इथे दिल्यावाचून राहवत नाही.

*ये गीता उनकी है, बायबल तुम्हारी*
*किया बंटवारा किसने रोशनीका?*

अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे वारे वाहू लागले आहेत. 'नाही मी एकला' म्हणणारे फादर फ्रान्सिस दिब्रिटो यंदाच्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष आहेत.
यानिमित्ताने 'ग्रंथाली' आणि 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' यांच्या संयुक्त विद्यमाने एका नाविन्यपूर्ण सृजनयात्रा आणि ग्रंथप्रसारयात्रेला प्रारंभ होतो आहे. तालुकापातळीवरील नवजागरणाचा शोध यातून

घेतला जाणार आहे. आजवरच्या जवळपास सर्व साहित्यसंमेलनांमध्ये ‘ग्रंथाली’ने पुस्तकाचे दालन सजवले आहे. यातून गावोगावचे लेखक आणि वाचक जोडले गेले आहेत.

२०२० सुरू झालंय. नव्या ऊर्जेची स्पंदने आणि सळसळ अनेक अर्थांनी जगणं भारून टाकतात, मात्र त्याकरता ध्यास जपणं गरजेचं आहे. आपल्याला ओढ लावणाऱ्या गोष्टीचा ध्यास कठीण असला तरी काही माणसं तो आयुष्यभर जपतात. डॉ. लागू हे असंच एक नाव.

*आयुष्याचे सार सांगणारे हे त्यांचे शब्द : मानवी आयुष्यात ‘सुखा पाहता जवापाडे – दुःख पर्वताएवढे’ हेही निरपवाद सत्यच आहे; पण अगदी अंतःकरणाच्या गाभ्यापासून करावाशा वाटणाऱ्या एखाद्या गोष्टीचा आयुष्यभर पाठपुरावा करता येण्याचे भाग्य लाभणे, यातले सुख ‘जवापाडे’ असले तरी त्या तीळभर सुखात ‘पर्वताएवढ्या दुःखाला’ शरमेने मान खाली घालायला लावण्याचे सामर्थ्य असते, हा केवढा दिलासा आहे!*

कलावंताने आपला–आपला हस्तिदंती मनोरा बांधून त्यात बंदिवान होऊन राहता कामा नये, अशी डॉ. लागूंची भूमिका होती, म्हणून भोवतालच्या सामाजिक–सांस्कृतिक–राजकीय वास्तवाचे डोळस भान त्यांनी कायम जपले.

असे भान तल्लखपणे जपण्याकरता सृजनाच्या वाटेवरच्या प्रत्येक प्रवाशाला ‘ग्रंथाली’च्या अनेक शुभेच्छा!

**– डॉ. वीणा सानेकर**
सी–१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई–४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

॥ग्रंथाली॥




**उन्हानं बांधलं सावलीचं घर**

**भाग्यश्री केसकर**


माणूस दुबळा झाला की अडचणींची ताकद वाढते. माणसाची ताकद वाढली तर अडचणी पराभूत होत जातात. ‘उन्हानं बांधलं सावलीचं घर’ या कवितासंग्रहात अडचणींचे हल्ले परतवून लावणाऱ्या एका ज्वलंत निर्धाराची कविता आहे. ही कविताच अशी आहे की ती भाग्यश्रीनं लिहिलेली असली तरी केवळ एका भाग्यश्रीची कविता नाही. ही अनंत भाग्यश्रींची कविता आहे.

**– यशवंत मनोहर**

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

**अम्लान**

**योजना शिवानंद**




शब्द मिटू शकतात... रंग विटू शकतात... नक्षीही पुसली जाऊ शकते. मिटत नाहीत ते अर्थ, विटत नाही ते अंतरंग आणि पुसल्या जाऊ शकत नाहीत त्या मनावर रेखलेल्या नक्षीखुणा. हे अर्थ, हे अंतरंग, या नक्षीखुणा असतात अम्लान. कधीच न कोमेजणाऱ्या, कधीच न मिटणाऱ्या. हे असे ‘अम्लान’ हाची लागणे सहजसाध्य नाही. शब्दांसोबत, सुरांसोबत रंग व नक्षी यांचीही असोशी योजना शिवानंद यांना आहे. या पुस्तकातील कवितांसोबतचे दोन छोटेखानी विभाग हा त्यांचा दाखला. रंगांसोबतची त्यांची म नोगुंफण विलोभनीय आणि कशिदा मन मोहवून टाकणारा. योजना शिवानंद यांच्या ओंजळीत अम्लान असे काही पडले आहे.

**– राजीव काळे**

**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन

# उस्मानाबादच्या साहित्यिक इतिहासाला मिळेल झळाळी

**रवींद्र केसकर**

उस्मानाबाद जिल्हा राज्याच्या नकाशावर भलेही ठळकपणे दिसून येत नसेल, मात्र येथील मातीला प्रतिभेचा वारसा लाभलेला आहे. संतश्रेष्ठ गोरोबा काका ते मानवतेची शिकवण देणारे सुफी संत हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी यांच्यापर्यंत नाळ जोडणारी एक वैचारिक परंपरा येथे आहे. कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या वास्तव्याने हा जिल्हा पुनित झाला आहे. आध्यात्मिक, वैचारिक, ऐतिहासिक, शैक्षणिक अशा सर्व अंगांनी उस्मानाबादकरांनी आपले नाव देशाच्या पटलावर कोरले आहे. आगामी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने जिल्ह्याच्या या सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासाला पुन्हा झळाळी लाभणार आहे.

दुष्काळी भूभाग म्हणून वाट्याला येणाऱ्या वेदना सहन करत जिल्ह्यातील विविध संस्था, संघटना आणि व्यक्तींनी अनेकवेळा आपले लौकिक देशपातळीवर नोंदविले आहेत. साहित्य आणि उस्मानाबाद हे दोन घटक वेगळे करता येणार नाहीत. उस्मानाबाद आणि उस्मानाबादकरांना समृद्ध अशी साहित्यिक परंपरा लाभलेली आहे. मराठी साहित्यविश्वाला अनेक प्रतिभावाने लेखक, कवी, कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, अभ्यासक या भूमीने दिले आहेत. हा वारसा पुढील काळातही वृद्धिंगत व्हावा, पुढच्या पिढीला त्याचे ज्ञान व्हावे, यासाठी मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच परिपाक म्हणून यंदा उस्मानाबादकरांना साहित्य संमेलनाच्या यजमानपदाचा बहुमान मिळाला आहे. तब्बल ९२ वर्षांनंतर मिळालेली ही संधी अधिक ऐतिहासिक करण्यासाठी जिल्ह्यातील सर्वसामान्य ना-गरिकदेखील उत्स्फूर्तपणे आपल्या भावना व्यक्त करीत आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ही मायमराठीची सेवा करू इच्छिणाऱ्यांसाठी अलौकिक अशी बाब आहे. हा सुवर्णक्षण अनुभवण्यासाठी प्रत्येक जण आसुसलेला असतो. बाराव्या शतकात संतश्रेष्ठ गोरोबा काकांच्या गावी तेर येथे ज्ञानेश्वरमाऊली, मुक्ताई, सोपानदेव, निवृत्तीनाथ यांच्यासह तत्कालीन मराठी सारस्वतांचा मेळा झाला होता. तो अमृतयोग आजही उस्मानाबादकरांच्या घराघरात चर्चिला जातो. त्यानंतर सारस्वतांच्या सेवेचा लाभ उस्मानाबादकरांना मिळू शकला नाही. तो यंदाच्या ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मिळावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली होती.

गोरोबा काकांच्या भक्तिमय परिसरात तब्बल ८०० वर्षांनंतर साहित्यशारदेचा दरबार अनुभवण्यासाठी सबंध जिल्हावासीय आता उत्सुक झाले आहेत. सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब साहित्यातून उमटत असते. आज दूरदर्शन, कॉम्प्युटर व त्यावरील फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअ‍ॅपसारख्या अनेक प्रोग्राममुळे लेखन आणि वाचनसंस्कृती डबघाईला आलेली आहे. अशा काळात साहित्यक्षेत्रामुळे परिसंवाद, चर्चासत्र, कथाकथन, कविसंमेलन, विविध स्तरांवरील साहित्य संमेलने आयोजित करून साहित्य चळवळ जपण्याचा, वाढवण्याचा प्रयत्न अनेक साहित्यसंस्था, प्रकाशनसंस्था, शैक्षणिकसंस्थांच्या माध्यमातून करण्यात आला आहे. मराठवाडा साहित्य परिषद-देखील साहित्यक्षेत्रात कार्य करणारी अग्रगण्य अशी संस्था आहे. उस्मानाबाद शाखेला उज्ज्वल अशी साहित्यिक परंपरा लाभलेली आहे. अनेक दर्जेदार साहित्यिक उस्मानाबाद शाखेत आणि शाखेशी संलग्न आहेत. २००७ साली भव्य असे २८ वे मराठवाडा साहित्य संमेलन झालेले आहे. प्रा. भास्कर चंदनशीव यांच्यासारखे प्रतिभावंत ग्रामीण, मराठी भाषेची जाण असणारे शेतकरी, शेतमजुरांच्या व्यथा जाणणारे लेखक या संमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभले. असा हा सकस वारसा असणाऱ्या मसापने या संमेलनाच्या आयोजनाची धुरा खांद्यावर घेतली आहे.

२०१६ साली उस्मानाबाद शहरात मोठ्या दिमाखात ७ वे मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन आयोजित केले. मोठ्या दिमाखात पार पडलेले हे साहित्य संमेलन आजही अनेकांच्या स्मरणात आहे. शाहीर अमर शेख यांच्या मातोश्री मुनीरबी यांचे नाव मुख्य मंचाला देण्यात आले होते. त्यानिमित्ताने मुनीरबी शेख यांची आणि त्यांच्या साहित्याची ओळख जिल्हावासियांना झाली. आगामी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून जिल्ह्यातील असाच लख्ख वारसा मराठी साहित्यविश्वासमोर मांडण्याची एक नामी संधी उस्मानाबादकरांसमोर या निमित्ताने उपलब्ध झाली आहे.

**आपलं संमेलन झकास होणार!**

आपलं संमेलन झकास होणार अशा उत्साहपूर्ण आणि गगनभेदी घोषणा देत विद्येचे माहेरघर पुणे येथून उस्मानाबादपर्यंत साहित्य संमेलनाच्या प्रचार आणि प्रसारासाठी सायकलवरून प्रवास करणाऱ्या प्रथमेश तुगावकर या साहित्यप्रेमी तरुणाने सायकलफेरी काढली. त्याचे उस्मानाबादमध्ये २२ नोव्हेंबर रोजी शहरवासीयांनी जंगी स्वागत केले. शहरातील सायकलपटूंसह विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यप्रेमी पुरुष, महिला, युवकांनी तुगावकर यांच्यासोबत



सायकलफेरी काढली. 'खास होणार, हमखास होणार, आपलं संमेलन झकास होणार' अशा गगनभेदी घोषणा देत छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या एनसीसीच्या ५० कॅडेट्सनी देखील या सायकल फेरीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संमेलनाच्या बोधचिन्हाचे टीशर्ट आणि संमेलनध्वज सायकलला लावून निघालेल्या या फेरीने उस्मानाबादकरांचे लक्ष वेधून घेतले. शिंगोली विश्रामगृहापासून औद्योगिक वसाहत, ज्ञानेश्वर मंदिर, महात्मा बसवेश्वर चौक, राम नगर, आनंद नगर, समता नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, ताजमहल टॉकीज, काळा मारुती चौक, आर्य समाज चौक या मार्गावरून या फेरीचा साहित्य संमेलन संपर्क कार्यालयात समारोप करण्यात आला. यावेळी संमेलन संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांसह शहर आणि परिसरातील साहित्यप्रेमी विद्यार्थी, तरुण, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आली साहित्याची वारी, गोरोबांच्या दारी..**

संबळाचा निनाद, हलगीचा कडकडाट आणि एका क्षणात काळजाचा ताबा घेणारे शब्द, या साऱ्याच्या जोडीला कर्णमधुर संगीताचा बाज अशी अफलातून अनुभूती देणाऱ्या संमेलनगीताचे बुधवार, १ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते उस्मानाबाद आकाशवाणी केंद्रातून एकाचवेळी राज्यातील १२ जिल्ह्यांत लोकार्पण करण्यात आले. जयघोष करीत सृजनाचा ही अक्षरदिंडी आली, आली साहित्याची वारी गोरोबांच्या दारी.. हा शब्दसाज एकाचवेळी राज्यातील लाखो रसिक श्रोत्यांपर्यंत यानिमित्ताने पोचणार आहे. संमेलनाच्या प्रसार आणि प्रसिद्धीसाठी संयोजन समितीच्या वतीने नवनवीन बाबींची अंमलबजावणी कल्पकपणे केली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्याच्या सांस्कृतिक अधिष्ठानाची महती विशद करणारे आणि संतश्रेष्ठ गोरोबा कुंभार ते महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे माहात्म्य साध्या-सोप्या शब्दात व्यक्त करणारे संमेलनगीत रसिक श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेत आहे. उस्मानाबाद आकाशवाणी केंद्रावरून साहित्य संमेलन सामान्यांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने 'जागर साहित्याचा' या विशेष कार्यक्रम मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ८.४० वाजता त्याचे प्रसारण होणार आहे. या कार्यक्रमात संमेलनाशी आणि साहित्याशी निगडित असलेल्या मान्यवरांच्या मुलाखती तसेच उस्मानाबाद जिल्हा आणि परिसरातील मौखिक, पारंपारिक साहित्याचा आढावा घेतला जाणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून दररोज हे संमेलनगीत उस्मानाबाद जिल्हा आणि राज्यातील बारा जिल्ह्यांतील लाखो रसिक श्रोत्यांना ऐकावयास मिळणार आहे.

संमेलनगीताची शब्दरचना पुणे येथील तरुण कवी वैभव देशमुख यांची असून त्यास पारंपरिक वाद्यांचा अप्रतिम वापर करून संगीतसाज ऋषीकेश यांनी दिला आहे. आपल्या पहाडी आवाजात सुहास








दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम असे भरगच्च कार्यक्रम आखले आहेत. याशिवाय ज्येष्ठ व श्रेष्ठ कथाकार भास्कर चंदनशीव, दिल्ली येथे चहा विकून चरितार्थ चालवणारे मूळ अमरावती जिल्ह्यातील मान्यवर मराठी भाषक व हिंदी साहित्यिक लक्ष्मणराव (चहावाले) आणि श्रीरामपूरच्या शब्दालय प्रकाशनच्या प्रकाशक श्रीमती सुमती लांडे यांचा त्यांनी आपापल्या क्षेत्रात केलेल्या लक्षणीय कामगिरीबद्दल संमेलनात जाहीर सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय मराठवाड्यातील कवींचे आमचे कवी : आमची कविता असे एक स्वतंत्र कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. संमेलनस्थळी मांडवासमोर रसिक-वाचकांसाठी भव्य ग्रंथप्रदर्शन आयोजित केले असून पुस्तके खरेदी-विक्रीची उत्तम सोय करण्यात आलेली आहे. प्रदर्शनाच्या मध्यभागी पुस्तक प्रकाशनाची खास सोय करण्यात आली आहे. संमेलनस्थळाला संत गोरोबा काका नगरी असे नाव देण्यात असले असून कार्यक्रमांसाठी उभारलेल्या मंडपांना उस्मानाबाद जिल्ह्यातील सुपुत्र शाहीर अमरशेख, देवीसिंग चौहान आणि दत्तो आप्पाजी तुळजापूरकर अशी नावे देण्यात आलेली आहेत.

सावंत यांनी या संमेलनगीत गायिले आहे. साहित्य संमेलनाच्या इतिहासात पहिल्यांदाच संमेलनगीताचे लोकार्पण आकाशवाणी केंद्रावरून करण्यात आले आहे. साहित्य संमेलनाचे यू ट्यूब चॅनल, फेसबुक पेज आणि संकेत स्थळावर संमेलनगीताच्या चित्रफितीला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

**पहिल्यांदाच 'साहित्यज्योत'ची संकल्पना**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी आणि संतश्रेष्ठ गोरोबा काकांच्या पावन भूमीत होत असलेल्या ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा जागर करण्यासाठी साहित्यज्योत जिल्हाभरात फिरणार आहे. मराठवाड्याचे प्रवेशद्वार असलेल्या उमरगा तालुक्यातील अचलबेट येथून ३ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता साहित्यज्योतीचे प्रस्थान होणार असून ही ज्योत उमरगा, लोहारा, तुळजापूर, येडशी, कसबे तडवळे, ढोकी, गोविंदपूर, भाटशिरपुरा, डिकसळ, कळंब शहरातील प्रमुख मार्गांवर फिरून संमेलनाचा जागर केला जाणार आहे. दुसऱ्या दिवशी ४ जानेवारी रोजी कळंब शहरातून इटकूरकडे प्रस्थान करून इटकूर, वाशी, भूम, सोनारी, परंडा, बार्शी व नंतर उस्मानाबाद येथे सायंकाळी ४.३० वाजता पोचणार आहे. शहरात आगमन झाल्यानंतर मुख्य मार्गावरून रॅली काढून संमेलनस्थळी साहित्यज्योत स्थापित केली जाणार आहे.

**संमेलनात कार्यक्रमांची रेलचेल**

साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ कवी पद्मश्री ना. धों. महानोर हे करणार असून समारोपात प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कथा-कादंबरीकार प्राचार्य रा. रं. बोराडे यांना निमंत्रित करण्यात आले आहे. संमेलनात वाङ्मयीन व सामाजिक प्रश्नांवर पाच परिसंवाद, श्रीमती प्रतिभा रानडे यांची प्रकट मुलाखत, निमंत्रित कवींची दोन कविसंमेलने, कथाकथन, महात्मा जोतिराव फुले यांच्या शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथावर अभ्यासकांची परिचर्चा तसेच आजच्या पाच लक्षवेधी कथाकारांशी अरविंद जगताप व राम जगताप यांचा प्रकट संवाद, बालसाहित्यिकांचा मुलांशी संवाद साधणारा बालमेळावा, बालाजी सुतार यांच्या गावकथाफ या नाटकाचा प्रयोग आणि

**संमेलन ऐतिहासिक ठरेल : स्वागताध्यक्ष नीतिन तावडे**

उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध संस्था, पदाधिकारी आणि नागरिकांनी व्यक्त केलेली प्रबळ इच्छा, औरंगाबाद येथील मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. कौतिकराव ठाले-पाटील, डॉ. दादा गोरे, कुंडलिक अतकरे यांनी दिलेले प्रोत्साहन आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडून मिळणारा प्रतिसाद आमचे बळ वाढविणारा आहे. महामंडळाने आमच्या प्रस्तावास मान्यता द्यावी, ही विनंती. सादर केलेल्या प्रस्तावानुसार उस्मानाबाद येथे होणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ऐतिहासिक करण्याचा आम्ही प्रयत्न करू. आगामी साहित्य संमेलनांना दिशा ठरेल, असे आयोजन मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ पुणे यांच्या मार्गदर्शनुसार पार पाडण्याची संधी उस्मानाबाद-मराठवाडा साहित्य परिषदेच्या शाखेला मिळाली आहे. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून हे संमेलन नक्कीच ऐतिहासिक ठरेल, असे संमेलन स्वागताध्यक्ष तथा मराठवाडा साहित्य परिषद शाखा उस्मानाबादचे अध्यक्ष नीतिन तावडे यांनी सांगितले.

**– रवींद्र केसकर**
भ्रमणध्वनी : ९७६६४३४४०२
कार्यवाह, ९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

# आयुष्यावर सावली धरणारे डॉ. श्रीराम लागू

**दीपक करंजीकर**

**प्रखर असा बुद्धिप्रामाण्यवाद, त्यासाठी आवश्यक ती जाहीर भूमिका घेण्याची तयारी आणि तशा मांडणीचा आग्रह धरणारा दुसरा अभिनेता झाला नाही.**


आपल्याकडे काही शब्दांचे नेमकेपण विलक्षण आहे जसे जीविका आणि उपजीविका. ज्या गोष्टीने आयुष्य व्यवहार नेटका होतो ती उपजीविका आणि ज्यामुळे आयुष्य का जगायचे कळते ती जिविका. सर्वसाधारणपणे माणसे उपजीविकेच्या मागे लागून आपले सारे आयुष्य व्यतीत करतात. तेच त्यांचे साधन बनते आणि साध्यही.

आपली उपजीविका सोडून जीविकेच्या मागे जावे असे वाटणारे किती जण असतात? जीविकेला उपजीविकेपेक्षा अधिक मोलाचे मानणारे किती असतात? केवळ जीविकेच्या जोरावर आपल्या उपजीविकेवर मात करून दाखवणारे किती? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर काहीही असो पण या प्रश्नांच्या उत्तरात मात्र डॉ. श्रीराम लागूंच्या आयुष्याचे सगळे सार सामावलेले आहे.

मला जे आवडते त्यासाठी मी माझ्याकडे जे आहे ते सोडून देतो आहे, अशा निश्चयाने आयुष्याला सामोरे जाण्याची वहिवाट किती आनंददायी असते हे आपल्याला डॉ. लागूंच्या जीवनप्रवासाकडे पाहिल्यास लक्षात येते.

एक नावाजलेला डॉक्टर परदेशात जातो तिथे अनेक वर्षे व्यवसाय करून पुन्हा मायदेशात येतो. सगळे आयुष्य सुख पुढे हात जोडून उभे असताना नाट्यसृष्टीत पदार्पण करतो आणि मग सुरू होते एका दीर्घकाळची इनिंग,जी या देशातल्या चित्र-नाट्यसृष्टीत एक बुद्धिमान आणि अस्सल अभिनेता असे स्थान निर्माण करते. डॉक्टर लागू म्हणजे तब्बल अडीचशे हिंदी मराठी चित्रपट, अत्यंत लक्षवेधक अशी २० मराठी नाटके अशा अत्यंत रुंद पल्ल्याच्या अभिनय कारकिर्दीची किनार लाभलेले ९२ वर्षांचे दीर्घ आणि शिस्तबद्ध आयुष्य. या आयुष्यात वाचिक अभिनयावर लिहिलेले अत्यंत शास्त्रशुद्ध पुस्तक आणि सामाजिक जाणिवेच्या अनेक उपक्रमांत व्यतीत केलेला काळ यांचाही समावेश आहे. अर्थात इतक्याच चौकटीत त्यांचे आयुष्य बसवता येत नाही. डॉक्टर लागूंच्या कक्षा नाट्य-चित्रक्षेत्रातील इतर कोणत्याही कलावंतापेक्षा अधिक विस्तृत आणि समाजपरिघाला कवेत घेणाऱ्या आहेत. माझे काम निष्ठापूर्वक करता असताना मी, ज्या समाजात वावरतो त्याच्या सर्वंकष हिताचे, त्या समाजाला शहाणे करून सोडावे यासाठी आवश्यक ती भूमिका जाहीरपणे घेणे आणि तिच्याशी अत्यंत प्रखर अशा प्रामाणिकपणे आयुष्यभर जोडलेले राहणे हे डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अजून एक लोभस रूप आहे. मुळात एखादी भूमिका घेणे हीच एक अत्यंत सामर्थ्यवान अशी गोष्ट असते. महाराष्ट्राचे या देशात असणारे जे व्यवच्छेदक लक्षण आहे ते हे की इथे सामाजिक भान ठेवत त्यावर ठाम भूमिका घेणाऱ्या समाजसुधारकांची स्वातंत्र्यपूर्व काळात एक मोठी फळीच जन्माला आली .

डॉक्टर लागू या रंगधर्मीने (हा देखणा आणि त्याचसाठीचा उचित शब्द, खरे तर त्र्यं.वि. सरदेशमुख या विचक्षण लेखकाचा) माणसाने आपल्या स्वच्छ वाणीने, त्याहीपेक्षा स्वच्छ विचारप्रक्रियेने आणि त्याहीपेक्षा अत्यंत पारदर्शी अशा वागणुकीने महाराष्ट्रातील कलावंत, विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ यांच्यासमोर एक आदर्श ठेवला आहे. वास्तविक, जनमानसावर जे परिणाम करतात असे कलाकार आणि विचारवंत यांच्यासाठी तर, ती एक नित्यनेमाने करायची गोष्ट आहे. पण बहुधा आणि सातत्याने असेच दिसते की ह्या क्षेत्रातली मंडळी समाजमनाशी निगडीत अशा महत्त्वाच्या विषयांवर कोणतीही भूमिका घेत नाही, घेतली तरी तिच्याशी ठाम रहात नाही. खरेतर या लोकांकडे समाजाचे वैचारिक नेतृत्व असते पण एकदा यांनीच बोटचेपे धोरण स्वीकारले की मग समाज अधिकच क्षीण होत जातो, त्याच्या धारणेची वीण विशविशीत होते भूमिका साधारणतः भय आणि भूक या दोन गोष्टींमुळे घेतल्या जात नाहीत. कोणती तरी भूक भागते अथवा कुठलेतरी भय सतावत असते. कालानुरूप या भय-भुकेच्या व्याखेत असा बदल झालाय की, कोणीतरी भूक भागवत असते आणि कोणाचे तरी भय असते. आणि एकदा का आपण भुकेच्या आणि भयाच्या आहारी गेलो की मग भूमिका घेणे हे आपले भान सुटते आणि आपण कोडगेपणाने जागत राहतो. याशिवाय ठाम भूमिका घेत जगता येते हे डॉक्टर लागूंनी दाखवून दिले. त्यांनी आयुष्यभर अगदी प्रसंगी आपली प्रतिमा आणि लोकप्रियता धोक्यात घालून आपल्या भूमिका अत्यंत स्पष्टपणे आणि कोणताही हेतू मनात न ठेवता मांडल्या, पण त्यांचे वेगळेपण असे की, हे करताना 'आपण काहीतरी त्याग करत आहोत' किंवा 'बघा असे जगले पाहिजे' असा यत्किंचितही आव त्यांनी आणला नाही. आपली भूमिका तर्कशुद्ध निकषासकट समोर ठेवीत आपले म्हणणे



संकल्पनेपायी अनेक संघर्ष उभे ठाकले आणि ते मानवीय दृष्टिकोनातून अनुचित होते. देव या गोष्टीचे अनेक दुष्परिणाम बघता आपण यामुळे जन्माला आलेल्या अनेक अमानवीय प्रथांना आता निरोप द्यायची वेळ आली आहे. या असल्या अंधश्रध्देपायी आपण, वस्तुनिष्ठ विचार करण्याची आपली क्षमता नष्ट करीत आहोत. देव ही भितीची संकल्पना झाली आहे.'

प्रखर असा बुद्धिप्रामाण्यवाद, त्यासाठी आवश्यक ती जाहीर भूमिका घेण्याची तयारी आणि तशा मांडणीचा आग्रह धरणारा दुसरा अभिनेता झाला नाही. अर्थात त्यांच्या जगण्यात या अशा भूमिका पोचविण्याचा नेमका प्रामाणिकपणा आणि त्यायोगे येणारी सामाजिक बांधिलकीची अतूट जाणीव हे दोन्हीही ठासून भरलेले होते. डॉ. श्रीराम लागूंचे एक आगळे वैशिष्ट्य म्हणजे ते अत्यंत बळकट अशा वैचारिक धारणेचे अभिनेते होते.

वैचारिकदृष्ट्या घट्ट असणाऱ्या व्यक्तिमत्वात एकप्रकारचा कोरडेपणा असतो, पण डॉक्टरांच्या व्यक्तिमत्वातील ऋजुता अनन्यसाधारण होती. ते अमेरिकेत आले असता, भारतात परत आल्यावर आमच्या काही भेटी आणि जायची अनेक वर्षे आठवण रहावी अशा गप्पा झाल्या. मी भारतात परत आल्यावर माझ्या पहिल्या व्यावसायिक नाटकाचा (त्या एका वळणावर) पुण्यात प्रयोग ठरला, मी त्यांना फोन केला. ते म्हणाले, ''बघतो. एक दोन दिवसात सांगतो.'' तेव्हा त्यांची प्रकृती फारशी बरी नव्हती. त्यांच्या औषधवेळा आणि इतर अनेक गोष्टीमुळे ते येतील असे मलाही वाटले नाही. मी गो. पु. देशपांडे आणि सतीश आळेकर यांनाही आमंत्रित केले होते.

नाटकाच्या दिवशी सकाळी ११ वाजता दिपाजींचा फोन आला, ''आम्ही येत आहोत.'' मला इतके बरे वाटले. आमच्या त्या प्रयोगाला कोथरूडच्या नाट्यगृहात डॉक्टर लागू, दीपा श्रीराम, गो.पु. देशपांडे आणि सतीश आळेकर असे थोर लोक पहिल्या रांगेत बसले होते, स्टेजवरून ते दृश्य माझ्या मनावर कोरले गेले आहे. प्रयोगानंतर सर्वजण भेटायला आले. डॉक्टर मला म्हणाले, ''छान काम केलेत! इतकी वर्षे परदेशात राहून मराठी अगदी सुस्पष्ट आहे तुमचे! तुम्ही हे काम करत रहा.'' मी म्हटले, ''सगळे सोडून तर आलोय. बघूया.'' डॉक्टरांनी त्यांचा हात माझ्या खांद्यावर ठेवला म्हणाले, ''मी सुद्धा असाच आलो होतो. सिलेक्टिव रहा! जमेल तसे अधून मधून भेटत चला.'' अमेरिकेतल्या आमच्या भेटीबद्दल त्यांना संपूर्ण लक्षात होते. गो.पुं.कडे वळून म्हणाले, ''अमेरिकेत आमच्या प्रयोगाला मदत केलीय यांनी आणि मुख्य म्हणजे त्या वेळी गाजलेल्या The world is flat या पुस्तकाचा उल्लेख करून म्हणाले

कोणाहीसमोर कोणताही आशय न बदलता मांडले. डॉ. लागूंकडे कडे आव आणणे, सोयीने वागणे, स्व-प्रतिमा विचार मनात ठेवून बोलणे आणि सगळे झाल्यावर माझ्या बोलण्याचा विपर्यास झाला, असे सांगण्याचे खोटारडेपण नव्हते आणि ते फार मोलाचे आहे.

त्यांच्या अब्राहम कोवूर यांच्या पुस्तकच्या प्रस्तावनेत म्हटलेल्या 'देवाला रिटायर करा' या बहुचर्चित वाक्याने महाराष्ट्रात वादळ उठले होते. एका तर्कशुद्ध मांडणीने त्यांनी देव या संकल्पनेचा फोलपणा मांडला. पुढे 'पुण्यभूषण' पुरस्कार त्यांना मिळाला तेव्हा सुधीर गाडगीळ यांनी मुलाखतीत त्यांना एक मार्मिक प्रश्न विचारला होता, जब्बार पटेल यांच्या एका नाटकात तुम्हाला विठ्ठलासमोर उभे राहण्याचा प्रसंग होता. प्रश्न असा होता, 'तुम्ही तिथे स्क्रिप्टची गरज असलेले अभिनेते म्हणून उभे होतात की भक्त म्हणून?'

लागू ताड्कन उत्तरले, 'मी तिथे पांडुरंग नावाच्या एका दगडी मूर्तीसमोर उभा होतो.'

पण एखाद्या विचाराने नुसते पाईक असून चालत नाही त्याला सुसंगत असे काम करावे लागते, या न्यायाने त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीत अगदी हिरिरीने भाग घेतला. यावेळच्या त्यांच्या भाषणात ते आपली भूमिका मांडताना म्हणत, 'माझा देवावर विश्वास नाही आणि त्यामुळे त्याला आता रिटायर करावे अशी माझी मांडणी आहे.देव हे संकल्पना एका कवी कल्पनेचा आविष्कार आहे आणि त्याला मानवी वसाहतींच्या अगदी सुरुवातीच्या काळात काही एक हेतूने महत्त्व असेलही, पण आता आपण सगळ्यांनी एक वस्तुनिष्ठपणे या संकल्पनेकडे पाहायला हवे. अशी श्रद्धा असणे हे जी शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध होत नाही, ती अंधश्रद्धा होय. देव या

नुसते तितकेच नाही तर त्या लेखकाशी (Thomas Freedman) परिचय आहे याचा.''

इतका मोठा माणूस! इतका साधा, आरसपानी आणि अत्यंत मृदू, आर्जवी! त्या आजारातही तल्लख स्मरणशक्ती. डॉक्टर बावनकशी अभिनेते, चिंतनशील व्यक्ती आणि सामाजिक जाणीव जपणारे होतेच पण ते अत्यंत निर्हेतुक आणि एखाद्या खळखळणाऱ्या पारदर्शी झऱ्याप्रमाणे अत्यंत नितळ माणूस होते .त्यांच्या भूमिका ठाम कठोर होत्या पण त्या सोबत एक मनस्वी माणूसपणही होते, त्याची रंगमंचावरील शिस्त धारदार होती पण त्याच बरोबर रंगमंच कामगारांना वेळ प्रसंगी आपले मानधन वाटून देण्याचे औदार्य असणारे ते संवेदनशील व्यक्ती होते.

त्यांची अजून एक आठवण हळद कुंकू लावून मनात जपून ठेवावी अशी, तात्यासाहेब शिरवाडकरांना ज्ञानपीठ मिळाले तेव्हा डॉ. लागूंचे 'नटसम्राट' हे नाटक आणि आम्हा नाशिकच्या कलावंतांचा 'लेणी तेजामृताची' हा कार्यक्रम असे करायचे ठरले. आम्ही दिल्लीला एकाच ट्रेनने गेलो होतो. जाताना आम्ही घरून डबे नेले होते. त्यात माझ्याकडे भाकरी आणि बोंबीलाची कोरडी चटणी होती. आमचा दंगा सुरु असताना डॉक्टर त्यांच्या कुपेतून बाहेर आले आणि आमच्या सोबत बसले. ''हे फार छान रसायन आहे,'' असे एक घास खावून त्या चटणीबद्दल म्हणाले आणि नंतर महाराष्ट्रात कुठल्या भागात काय चवदार खाणे मिळते यावर बराच वेळ सांगत बसले. इतका मोठा माणूस आमचा सहप्रवासी होऊन गेला. माझ्या मनात आजही त्या रेल्वेच्या बोगीतली ती सीट, तिथे बसलेले डॉक्टर, त्यांच्या चेहऱ्यावर पडणारा तो हलता प्रकाश, त्यांची तो स्वच्छ उच्चाराच्या आवाजाची रेल्वे-रवाशी जोडलेली लय, याचा एक अगदी कालपरवा घडला असे वाटावे असा एक कोलाज आजही माझ्या मनात रुतून आहे. त्यांच्याशी जो काय थोडाफार संपर्क आला त्यातून नेहमी एका गोष्टीचे मला नेहमी नवल वाटायचे की ते ज्या क्षणी भेटायचे त्या क्षणी आपलेसे होऊन जायचे. अनेक भल्या-भल्या लोकांना हे शक्य नसते. त्याच्याभोवती एक अदृश्य असे त्यांच्या प्रतिमेचे जंजाळ असते.त्यांना त्यातून वेगळे होऊन अनेकवेळा मोकळे होणे शक्य नसते अथवा ते करायचे नसते कदाचित, पण डॉक्टरांचे साधेपण एखाद्या तळ दिसणाऱ्या झऱ्याप्रमाणे अगदी त्यांच्या डोळ्यांसारखे स्वच्छ. त्यांची प्रायोगिक रंगभूमीवरील असणाऱ्या अनेक कलावंतांशी असणारी जवळीक अगदी सहज.त्यांनी नाटक व्यावसायिक आणि प्रायोगिक असा भेद केला नाही. खरे तर असे काही नसतेच. नाटक एक तर चांगले असते किंवा फसलेले असते. प्रायोगिक-व्यावसायिक असले भेद म्हणजे लेबले लावणाऱ्या लोकांच्या सोयी आहेत. असो

राजस व्यक्तिमत्व आणि साधेपणा, वैचारिक ठामपणा आणि माणूसपण, अभिनेता आणि जगण्याचं अस्सलपण, प्रखर बुद्धिवाद आणि ऋजुता, शिस्त आणि संवेदना अशा अनेक द्वैतांचे, विलक्षण अद्वैतपण आयुष्यभर जपलेला आणि आणि जगलेला हा माणूस! असा एखाद्या अश्वत्थ वृक्षासारखा आपल्या आयुष्यावर सावली धरणारा इतका असाधारण माणूस आपल्यात होऊन गेला हे काही काळानंतर खरेही वाटणार नाही .

**- दीपक करंजीकर**
भ्रमणध्वनी : ९८८१५४६५७८
deepak.karanjikar@gmail.com

ग्रंथाली



# शिदोरी

**माझ्या नाट्य-चित्र प्रवासाची**

**कुमार सोहोनी**

शिदोरी' हे एका पातळीवर एका दिग्दर्शकाच्या व्यक्तिगत नाट्य-चित्र प्रवासाचं चित्रण आहे, तर दुसऱ्या पातळीवर महाराष्ट्राच्या नाट्य-चित्रपट क्षेत्रातल्या एका कालखंडातल्या काही टप्प्यांचीही ती नोंद आहे. एका चतुरस्र नाट्यकर्मीचा हा प्रवास आहे.

**- विजय कुवळेकर**

कुमार सोहोनींच्या पिढीचे महत्त्व हे, की अन्य अनेक प्रादेशिक चित्रपट जेव्हा आपले प्रेक्षक पूर्णपणे गमावून बसले होते तेव्हा या मंडळींनी चित्रपट वाहता राखला. प्रेक्षकांचे पाय चित्रपटगृहाकडे वळते ठेवले.

**- अभिराम भडकमकर**

**मूल्य ६०० रु. सवलतीत ३६० रु.**

# तिसरा डुळा



**किरण येले**

आपण पाहतो की जनावरांचे कळप नव्या जन्मलेल्या पिलांना मध्यभागी ठेवत, म्हाताऱ्या आणि आजारी प्राण्यांना मागे ठेवत प्रवास करतात. हेतू हा की एखाद्या हिंस्र प्राण्याने हल्ला केला तर या नको असलेल्या प्राण्यांचा आधी बळी जावा. माणसाचे वेगळेपण येथेच आहे. थकलेल्या, आजारी, कमकुवत माणसांना मध्यभागी ठेवत त्यांना तगवण्याचा, जगवण्याचा प्रयत्न करतो, तो 'माणूस' अशी खरेतर माणूसपणाची व्याख्या आहे. आपण पाहतो की अशा कम कुवत, आजारी, पिचलेल्या लोकांनाच संपवण्याचा प्रयत्न काहीजण करत आहेत. या सगळ्या कथा, अशा संपलेल्या लोकांच्या आहेत.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# डॉ. श्रीराम लागू
# माझे गॉडफादर

## कुमार सोहोनी

**डॉक्टरांनी, ''निर्माता कोण ते तुमचे तुम्ही ठरवा. 'अग्निपंख'मधली 'रावसाहेब' ही भूमिका ते स्वत: करणार आणि दिग्दर्शक कुमार सोहोनी.'' असे ठणकावून सांगितले. ८ मार्च १९८६ रोजी 'अग्निपंख' रंगभूमीवर आले.**

आज 'दिग्दर्शक' म्हणून मी जो काही नावारूपास आलो आहे त्याचे ऐंशी टक्के श्रेय मी डॉ. श्रीराम लागू यांनाच देईन. १९७६-७९ साली 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा', नवी दिल्ली येथे शिकत असताना दोन वेळा डॉक्टरांची माझी भेट झाली होती पण ती स्कूलमधल्या लेक्चरच्या निमित्ताने. तशी ती त्यांच्या लक्षात असणे अशक्यच होते, पण १९८५ साली चोविसाव्या महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात मी दिग्दर्शित केलेल्या 'अथं मनुस जगन हं' नाटकास अंतिम फेरीत प्रथम पारितोषिक मिळाले आणि त्या नाटकाचे नाट्यवलोकन शुक्रवारी सायंकाळी दूरदर्शनवर झाले. ज्यात नाटकाचे काही अंश दाखवले गेले आणि माझी व प्र.ल. मयेकरांची मुलाखतही दाखवली गेली. नंतर लगेचच रविवारी दुपारी गडकरी रंगायतन ठाणे येथे डॉ. लागू यांच्या 'दुभंग' नाटकाचा प्रयोग होता. मी तो पहायला गेलो आणि रंगपटात डॉ. लागूंना भेटलो. त्यावेळी त्यांनी शुक्रवारचे 'अथं मनुस'चे नाट्यावलोकन पाहिल्याचे आणि ते आवडल्याचे आवर्जून सांगितले. शिवाय ह्या नाटकाचे प्रयोग होणे आवश्यक असल्याचे सांगितले. मी नेहमीप्रमाणे, 'आमच्या नाटकात ३०-३५ कलाकार आहेत. सगळे हौशी. प्रयोगाचा खर्च झेपत नाही,' वगैरे रडगाणे गायले. त्यावर त्यांनी मला भेटायला त्यांच्या घरी बोलावले. मी गेलो नाही. कारण नाटकाची स्तुती करणारे खूप जण भेटले होते पण प्रयोगाच्या खर्चाचे काय? नंतर पंधरा दिवसांनी डॉक्टरांच्या 'आकाश पेलताना' नाटकाचा प्रयोग होता. त्याला सुहास जोशीही आली होती. मध्यंतरात तिने मला आत रंगपटात नेले व मी एन्.एस्.डीचा असल्याचे डॉक्टरांना सांगितले. त्यावर त्यांनी पंधरा दिवसापूर्वीची आठवण सांगून मला पुन्हा भेटायला बोलावले. डॉक्टरांची वेळ घेऊन मी व प्र.ल. मयेकर त्यांना भेटायला 'गोल्ड मिस्ट' बांद्रा येथे गेलो. सोबत खर्चाचा तपशील आणण्यास सांगितल्याने तोही घेऊन गेलो. डॉक्टरांनी ते सर्व पाहिले आणि मला पंचवीस हजार रुपये रोख रक्कम दिली आणि हे पैसे परत करायचे नाहीत, जमतील तेवढे 'अथं मनुस'चे प्रयोग करा पण हे नाटक होणे गरजेचे असल्याचे सांगितले. क्षणभर माझा विश्वास बसेना. मग मी डॉक्टरांना जाहिरातीत त्यांचे नाव वापरू का असा प्रश्न केला. त्यावर त्यांनी, ''तुला फायदा होणार असेल तर कर,'' असे स्पष्ट सांगितले. शिवाय पैसे दिल्याबद्दल उगाच वाच्यता करू नकोस असेही बजावले. मग त्यात थोडे पैसे मी टाकून 'डॉ. श्रीराम लागू सादर करीत आहेत 'अथं मनुस जगन हं' अशी जाहिरात करत नाटकाचे प्रयोग सुरू केले. त्याचा खूप फायदा झाला. वेगवेगळ्या शहरांत, वेगवेगळ्या मान्यवरांनी हा प्रयोग पाहिला. नाशिकला कुसुमाग्रज आणि कानेटकर, पुण्याला जब्बार पटेल, पु.ल. देशपांडे, प्रभाकर पणशीकर, काशिनाथ घाणेकर असे अनेक आणि माझे नाव सर्वतोमुखी झाले. २५व्या प्रयोगाला विजय तेंडुलकर प्रमुख पाहुणे म्हणून आले आणि त्यांच्याबरोबर डॉक्टरांनी पूर्ण नाटक पाहिले. डॉक्टरांबरोबर भेटीगाठी वाढत होत्याच. एकदा त्यांनी, 'व्यावसायिक नाटक का करत नाही?' असा प्रश्न केला. त्यावर माझ्याकडे प्र.ल.





'एक रात्र मंतरलेली' चित्रपटात निळू फुले आणि डॉ. श्रीराम लागू

मयेकरांचे 'अग्निपंख' नाटक असल्याचे सांगितले. ते नाटक स्त्रीप्रधान असल्याने त्यात मुख्य भूमिका करण्यास प्रभाकर पणशीकर तयार नव्हते. म्हणून आम्ही प्रभाकर पाटणकरांचा विचार करत होतो. बाईसाहेबांच्या भूमिकेसाठी 'अग्निपंख' वाचायला मागितले आणि दुसऱ्या दिवशी मला डॉक्टरांनी फोन करून नाटक आवडल्याचे आणि त्यातली 'रावसाहेब' ही भूमिका करायला ते तयार असल्याचेही कळवले. 'फक्त मयेकरांना घेऊन घरी ये-चर्चा करायचीय,' असे कळवले. आम्हाला वाटले डॉक्टर रावसाहेबांची भूमिका वाढवून मागणार. मी आणि मयेकर डॉक्टरांना भेटलो. 'अग्निपंख' नाटकात दुसऱ्या अंकाच्या शेवटी गांधीवधानंतर ब्राह्मणांचे वाडे जाळतात असा प्रसंग आहे. त्यावर १९४८ साली काय घडले होते आणि तरुण असताना डॉक्टरांनी स्वत: व त्यांच्या वडिलांनी त्या प्रकारात कशी मदत केली होती आणि बऱ्याच जणांना कसे वाचवले होते. त्यावेळचा माहौल कसा होता हे कथन केले. 'त्या सत्यघटनेचा नाटकात काही उपयोग करता आला तर पहा,' असे मयेकरांना आणि मला सांगितले आणि मयेकरांनी त्यातील काही बाबी चाणाक्षपणे नाटकात वापरून उत्तम शेवट रचला. नाटकाचा निर्माता मीच असणार होतो. डॉ. लागूंना 'अग्निपंख' नाटक आवडलेय आणि ते त्यात भूमिका करताहेत ही बातमी रंगयात्रीच्या मधुकर नाईकांना कळली. त्यांनी त्वरित मयेकरांना गाठले. डॉक्टर 'फक्त रविवारी प्रयोग करतात ते सुद्धा ११ व दुपारी ४.३० वाजताच. रात्रीचा प्रयोग करत नाहीत. कुमारला रविवारच्या तारखा कोण देणार? तो नवखा' निर्माता वगैरे सांगितले. त्यावर मयेकरांनी मला विचारले. मला निर्माता बनायची हौस नव्हतीच. मला दिग्दर्शनातच रस होता. मयेकरांना 'मी फक्त दिग्दर्शन करेन,' असे सांगितले. मधुकर नाईकांनी स्क्रीप्ट वाटले आणि डॉक्टरांना, 'रंगयात्रकी' या नाटकाची निर्मिती करणार असेही सांगितले व कुमारसारख्या नवख्या दिग्दर्शकाऐवजी विजया मेहतांकडे ही जबाबदारी देऊया, अशी तयारी दाखवली. त्यावर डॉक्टरांनी, ''निर्माता कोण ते तुमचे तुम्ही ठरवा. 'अग्निपंख'मधली 'रावसाहेब' ही भूमिका ते स्वत: करणार आणि दिग्दर्शक कुमार सोहोनी.'' असे ठणकावून सांगितले. ८ मार्च १९८६ रोजी 'अग्निपंख' रंगभूमीवर आले. आणि रावसाहेबांच्या त्या मानाने दुय्यम भूमिकेत डॉक्टरांनी असे रंग भरले की एकट्या बाईसाहेबांचे असणारे 'अग्निपंख' बाईसाहेब आणि रावसाहेबांचे झाले. 'अग्निपंख'च्या तालमीतला डॉक्टरांचा सहवास माझ्या अनुभव विश्वाला समृद्ध करून गेला. १९८६च्या ऑक्टोबरमध्ये डॉक्टरांनी सामाजिक कृतज्ञता निधीतर्फे 'लग्नाची बेडी' नाटक करायचे आहे. त्याचे दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाशयोजना आणि छोटीशी भूमिका अशी चौफेर जबाबदारी माझ्यावर सोपवली. सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी महाराष्ट्रभर ३५ प्रयोग करून निधी गोळा करायचा असे प्रयोजन होते आणि त्यात काम करणारे कलाकार, डॉ.लागू, सुहास जोशी, निळू फुले, रोहिणी हट्टंगडी, भारती आचरेकर, सुधीर जोशी, सदाशिव अमरापूरकर आणि रश्मीच्या भूमिकेत तनुजा असे होते. वास्तविक त्या काळात अनेक दिग्दर्शक मराठी रंगभूमीवर कार्यरत होते, पण डॉक्टरांनी माझी निवड दिग्दर्शक म्हणून केली आणि ही संधी मिळाल्याने माझ्या अनुभवविश्वात भर पडली. ह्या तालमींसाठी तीन महिने तालीम योजिली होती पण दोन महिने फक्त डॉक्टर आणि मी सायंकाळी तालमीसाठी जमत होतो. ह्या काळात होणाऱ्या गप्पांमुळे, डॉक्टरांनी भूमिकेचा अभ्यास कसा केला ह्या अनुभवकथनामुळे अभिनयाची थियरी वाचून जे ज्ञान मिळेल, त्याच्या दसपटीने ज्ञान मला मिळाले. डॉक्टरांबरोबर 'आत्मकथा', 'चाणक्य', 'उद्ध्वस्त धर्मशाळा' ह्या नाटकांचे नेपथ्य प्रकाशयोजना करायची संधी मिळाली. १९९० साली डॉ. हुद्दार हे श्री. ना. पेंडसे ह्यांनी लिहिलेले नाटक केले, ज्यात डॉक्टर आणि मंगेश कुळकर्णी प्रमुख भूमिकेत होते.

नाटकानंतर मी चित्रपट दिग्दर्शन करावे असे डॉक्टरांनीच सुचवले. त्यावेळी मी, 'मला अनुभवासाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करायचेय' असे सांगितले. त्यावेळी त्यांनी गुलजार साहेबांना विचारले पण ते तेव्हा चित्रपट करीत नसल्याने मग एन. चंद्रांकडे माझ्यासाठी शब्द टाकला. आणि मी 'तेजाब'साठी एन.चंद्रांकडे सहाय्यक म्हणून काम करू लागलो. १९९०साली मी स्वत: जेव्हा निर्मिता-दिग्दर्शक म्हणून 'एक रात्र मंतरलेली' चित्रपट करायचे ठरवले. तेव्हा तंत्रज्ञ निवडण्यापासून मला अनमोल मदत तर केलीच पण चित्रपटात काम करण्यासाठी एक रुपयाही मानधन घेतले नाही. माझ्या नाटकांना, चित्रपटांना येऊन मला अनेकदा शाबासकीही देऊन मला नवनवे प्रयोग करण्याचे बळ डॉक्टरांनी दिले. त्यामुळेच माझ्या दिग्दर्शकीय करियरच्या यशाचा ऐंशी टक्के वाटा डॉक्टरांचा आणि वीस टक्के माझ्या कर्तृत्वाचा!


**– कुमार सोहोनी**
भ्रमणध्वनी : ९८२००२४५६०
kumar.sohoni@gmail.com

# हळव्या ग्रामीण व्यथांचे चित्रण सखा कलाल यांच्या कथा

डॉ. वृषाली किन्हाळकर

**कलालांची प्रत्येकच कथा मनाचा ठाव घेणारी. ती कमी बोलते आणि अचानकच गप्प होऊन जाते. तुम्ही मात्र पुन्हा-पुन्हा तिला वाचत राहता...**

मी अंबाजोगाईला पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेत असतानाची गोष्ट. आमच्याकडे रात्रपाळीच्या काही नर्सेस एखादे पुस्तक आणायच्या; वेळ मिळाला तर वाचत बसण्यासाठी सहसा त्यांच्याजवळ हिन्द पॉकेट बुक्सची पुस्तकं असत. गुलशन नंदा यांच्या कादंबऱ्या असत. त्यांच्याजवळची पुस्तकं मी सहज चाळत असायची. वाचण्यासारखं कधी काही सापडायचं नाही. एके रात्री मात्र त्यांच्याजवळ मराठी पुस्तक मिळालं मला! मी वाचत बसले. ...गोष्ट होती एका लहान पोराची. खेड्यातली पोरं गुराढोरांना घेऊन रानात गेलेली. हे पोरगं गाई, शेळ्यांना चरायला सोडून एका मोठ्या वडाच्या झाडावर चढतं. चढत-चढत पार शेंड्यावर जाऊन बसतं आणि तिथून गाव, शेत बघत बसतं. इतर पोरांना त्याच्यासारखं सरसर शेंड्यावर जाता येत नाही, त्यामुळे या पोराला भलतीच हुशारी वाटते. वरून पाहताना त्याला चरणारी जनावरं सगळी काळ्या ठिपक्यांसारखी दिसत असतात. भान हरपून तो सगळा परिसर बघत बसतो आणि या नादात त्याच्या शेळ्या दूरवर चरत निघून जातात! दिवस कलायला लागतो तशी सगळी पोरं आपापली जनावरं घेऊन घराकडे परतू लागतात. या पोराच्या गाई म्हशी सापडतात पण शेळ्या मात्र सापडत नाहीत.



सखा कलाल

तो मुलगा आणि त्याची मैत्रीण खूप शोध घेतात. पण शेळ्या गायबच!

पुढे काय होतं हे माझं वाचायचं राहूनच गेलं कारण प्रसूतीची केस पुढ्यात होती. मी कामात ती गोष्ट विसरून गेले. दुसऱ्या रात्री पुन्हा ती गोष्ट वाचावी म्हणाले पण त्या नर्सने ते पुस्तक आणलंच नव्हतं! खूप चुटपुट लागली मनाला.

माझं ते वय, अजून प्रकाशन कोणतं, कितवी आवृत्ती, अशी माहिती लक्षात ठेवण्याचं नव्हतं. वाचण्याचा नाद मात्र होता. पण निश्चित दिशा नव्हती. लेखकाचे नाव लक्षात नव्हते! नुसतीच गोष्ट... ती ही अर्धवट वाचलेली. गोष्टीतल्या त्या मुलाच्या शेळ्या सापडत नव्हत्या म्हणून तो बिचारा आता काय करत असेल, पुढे काय झालं असेल याची उत्कंठा माझ्या मनात म्हणजे त्याला शेळ्या शोधायच्या होत्या आणि इकडे मला पुस्तक शोधायचं होतं! खूप दिवस मी त्या पुस्तकासाठी प्रयत्न केला आणि चिकाटीने मी ग्रंथालयातून ते पुस्तक शोधून काढलं! ती गोष्ट होती 'रान' या शीर्षकाची आणि मी भराभर आधी ती अर्धवट वाचलेली गोष्ट पूर्ण वाचली; मनाची तगमग थांबली एकदाची! नंतर सगळ्याच कथा एका दमात वाचून काढल्या आणि शेवटी लेखक कोण हे बघितलं. ते नाव होतं - सखा कलाल असं!

त्यापूर्वी कुणाकडून मी हे नाव ऐकलेलं नव्हतं. महाविद्यालयीन जीवनात, तोपर्यंत द. मा. मिरासदारांच्या ग्रामीण कथांनी आम्हाला मनसोक्त हसवलेलं होतं. पण शेतशिवारातली, खोपीमधली, चुलीच्या धुरातली अशी व्यथेनं वाकलेली, वेदनेनं कळवळणारी माणसं वाचली नव्हती. त्या 'रान' कथेमध्ये तो मुलगा खूप लांबवर जाऊन शेळ्यांना शोधतो पण कुठेच त्या सापडत नाहीत. याची मैत्रीण म्हणते की ''योक लांडगा फिरतोय म्हणं या वढ्याच्या काठानं'' मग तर या पोराच्या तोंडचं पाणीच पळतं! काट्याकुट्याची फिकिर न करता तो रात्र होईपर्यंत भटकतो आणि शेवटी त्याला त्याची एक शेळी सापडते जी नुकतीच रानात व्यालेली असते. छोटंसं नवजात कोकरू आणि ती बाळंतीण शेळी घेऊन तो आनंदाने घरी येतो. नव्या कोकराच्या नादात दुसऱ्या दोन शेळ्या त्याला आठवतच नाहीत! घरी आल्यावर त्या पिल्लाचं कौतुक संपल्यावर त्याचा बाप त्याला म्हणतो ''बाब्या, आणि दोन शेळ्या रं?''

''फुग्यातनं वारा गेल्यागत एकाएकी माझे पाय लुळे पडले. मी मटूकन खाली बसलो आणि रातकिड्यांचा किर्र आवाज कानात घुमत राहिला.''

ह्या वाक्याने ती गोष्ट संपते!

खेड्यातल्या, अबोध वयातल्या मुलांचा हूडपणा, त्यांचे खेळ, त्यांचे आनंद त्यांच्या मनातल्या आवेग-उत्साहाचे, त्यांच्या कोवळ्या भावनांचे फार वास्तव चित्रण, अतिशय कमी शब्दात,

सखा कलाल करतात; हे त्यांच्या कथांमधून जाणवतं.

कथेचं बीज अत्यंत तरल, हळुवार, छोटीशी, साधी घटना.

खूप घडामोडी नाहीत, चटकदार संवाद नाहीत. कथा अत्यंत आटोपशीर साधंच सुती लुगडं, बाईनं चापून चोपून नेसावं तशी कलालांची कथा. घोटदार, लफ्फेदार नाही. नक्षीकाम नाही. जरतारी किनार नाही. तरीही, वाचायला घेतली कथी की; पहिल्या परिच्छेदातच कथा वाचकाचा कब्जा घेते! पूर्ण वाचणं झालं नाही तर ती कथा आपल्या मानगुटीवरच बसते; हळूच अधून-मधून आपलं काळीज टोकरत राहते.







मी ज्या 'रान' कथेची माझी गोष्ट तुम्हाला सांगितली, त्या कथेत, ती शेळी प्रसूत होणार होती म्हणूनच रानात थांबली, आणि म्हणूनच त्या पोराला सापडली.

आणि मी मात्र प्रसूतीची केस पुढ्यात आली म्हणून ती गोष्ट अर्धीच वाचून कामाला पळाले होते; आणि त्यामुळे माझी आणि त्यामुळे माझी आणि त्या गोष्टीची ताटातूट झाली होती.

'रान'कथेचा, माझा आणि प्रसूतीचा असा हा मजेशीर योगायोग मी कधी विसरू शकले नाही याचं कारण कलालांची लेखन शैली! खेड्यातलं शाळकरी पोरगं जेव्हा घाबरतं तर त्याला - ''फुग्यातनं वारा गेल्यागत'' अशीच उपमा सुचणार ना... आणि म्हणूनच त्यांच्या कथा कायम लक्षात राहताच.

शेळीचं ते नवं जन्मलेलं कोकरू, जेव्हा हे पोरगं हाती धरतं तर तेव्हा ''कापसाच्या गठड्यागत हलकं वाटणाऱ्या त्या पिलाचे मी पापे घेतले'' असं वर्णन येतं.

फार सविस्तर तपशील न देता, त्यांची कथा वाचकाला चट्‌कन त्या वातावरणात घेऊन जाण्यात यशस्वी होते.

१९७४ साली प्रकाशित झालेला त्यांचा पहिला कथासंग्रह 'ढग'. मौज प्रकाशनानेच त्यांचे दोन कथासंग्रह प्रकाशात आणले. दुसरा 'सांज' संग्रह १९८३ला वाचकांच्या हातात आला. 'रान' कथा पहिल्या संग्रहातली आहे. मी सपाट्याने 'ढग' संग्रह मग संपूर्ण वाचून काढला; ते साल होतं १९८५. 'ढग' नावाची जी कथा यात आहे त्या कथेत बाप-लेकाचं सूक्ष्म पीठ पडलेलं तरीही आतमधून ओलं असलेलं नातं अधोरेखित होतं.

पोराचं लग्न झाल्यावर, बायको जराशी आडमूठ असते म्हणून बाप, पोराला वेगळं राहू देतो. हा वेगळं राहणारा पोरगा; आपल्या बायको-मुलात सुखाने रमलेला असतो तरी अधून-मधून बापाची माया त्याला आठवत असते आणि अशाच एका संध्याकाळी त्याचं मन बापाच्या आठवणीने कावरंबावरं झालेलं असतं. तो गलबलून आलेल्या मनाने उगीचच घराच्या उंबऱ्याशी बसून असतो आणि अचानक त्याचा बाप त्याला भेटायला येतो!

बाप-लेकाच्या आतड्यातल्या घट्ट प्रेमाची ही टेलिपथी पाहून, वाचणारा हळूच डोळे पुसतो!

''कल्लेदार पांढऱ्या मिशामागचे ओठ बोलण्यासाठी उघडेच राहिले आणि रिकाम्या चिलम ीगत त्याचं तोंड तसंच आ वासून राहिलं. आभाळात एकाएकी खूप ढग जमले होते आणि बापलेकांना काय बोलावं, कसं बोलावं, तेच कळत नव्हतं.''

कथेचा हा अल्पाक्षरी शेवट, म्हातारा बाप आणि गृहस्थ झालेल्या लेकाचं व्यावहारिक झम ेल्यांपलीकडचं 'अहं' विसरायला लावणारं, एक सूक्ष्म तरीही पक्क्या विणीचं नातं सांगून जातो.

ग्रामीण जगणं अभावाचंच असतं बहुधा हाता-तोंडाशी गाठ असते. कष्ट निरंतर करावे लागतात आणि दोनवेळा पोटात काही पडणं म्हणजेच सुख अशी सुखाची व्याख्या असते. अशाच एका घरातल्या बाप-लेखाचा एक हळुवार प्रसंग 'वड' कथेत आहे.

म्हातारा बाप, मुलगा, सून आणि नातवंड असं भरलेलं घर. तरण्या पोराला बापाची सदा काळजी बापाला सुखात ठेवावं असं त्याला वाटायचं पण गरिबीपुढं नाईलाज!

सकाळी कामावर जाताना बायको त्याला शिळी भाकर देते तर तो बापासाठी तळमळतो. ''बा ला बी भूक लागली आसंल'' म्हणतो, तर बायको म्हणते ''त्यांना दात नाहीत नं, गरम भाकरी करून मग देते.''

एवढ्याच संवादातनं सखा कलाल ते घर वाचकांपुढे साक्षात करतात. मुलगा, सून मायाळू आहेत इतकंच नाही तर दुपारी पाणी आणायला गेलेल्या सुनेच्या डोक्यावरची भरली घागर उतरवून घरात नेऊन ठेवणारा म्हातारा बाप किती प्रेमळ समजूतदार आहे हेही एका वाक्यातच वाचकांना उमजतं. कामावर गेलेला तरणाताठा पोरगा झाडावरून पडतो आणि चार दिवस भुईवरच त्याला पडून रहावं लागतं तर म्हातारा बाप खुरपणीला जातो!

अभावग्रस्त आयुष्यातलं हे पराकोटीचं समंजस वागणं, सखा कलाल त्यांच्या अल्पाक्षरी, नेमक्या टोकदार लेखणीतून असं अचूक टिपतात की ती माणसं त्यांच्या नात्यांच्या हळुवार स्पंदनांसकट आपल्यापर्यंत जशीच्या तशी पोचतात.

कुठलाही कांगावा न करता, मोठमोठी अलंकारयुक्त भाषणं न करता सहज, आपसुकपणे जगण्याशी दोन हात करत, समाधानाने जगणारी, समोरच्या प्रश्नांना साधीसोपी उत्तरे शोधणारी त्यांच्या कथेतील पात्रं. जखमी पोराला आराम मिळावा आणि तरी घरात कुणी उपाशी राहू नये म्हणून येरवाळीच खुरपणीला जाणाऱ्या आबाचे वर्णन पहा :

''मग पोरी याला गरम करून घाल कायतरी'' एवढं बोलून आबा उठला. डगमग करत पुढं निघाला. खुरपणीला येरवाळीच

जावं लागतं. म्हातारं म्हणून चार आठ आणं कमी मिळतील. मिळू द्या. गाडी चालतीया.

...आणि आबा तरण्या पोरागत झपझप चालाय लागला. बसल्या जागेहून पोरगा पाहत होता. हाकेजवळया वडाच्या झाडाजवळ तो दिसेना झाला. पोरानं डोळे मिटले. त्याच्या अंगात झाडपानं सळसळली.''

किती अचूकपणे लेखकाने इथे वडाचे झाडच दाखवलेय! बाप-लेक नाते वटवृक्षाची सावली, आधार, पारंब्या, दोन पिढ्यांमधले स्नेहरज्जू, थकलेल्या, थकलेल्या बापाला सुख देण्यासाठी धडपडणारा पोरगा, घरातलं गरिबीचं असलं तरी प्रेमळ मायेचं वातावरण आणि मुलाच्या झाडावरून पडण्यामुळे आलेलं संकट; त्याचा बाऊ न करता, आपलं थकलं वय विसरून नातवंडाच्या मुखात घास पडावा यासाठी कष्टाला जाणारा म्हातारा बाप... अशा या हळव्या कथेला शीर्षक - 'वड'. हेच सामर्थ्य आणि हेच सौंदर्य आहे, कलालांच्या कथेचं.

'हिरवी काच' ही त्यांची गाजलेली कथा देखील बाप-लेक नात्याचा एक वेगळा पदर दाखवते. इथेही बाप गरीबच आहे. कधीच त्याचं स्वप्न आहे, बायकोला लुगडं, स्वत: सदरा आणि पोराला चपला घ्यायच्या हे!

पण नशिबीची 'साडेसाती' सुटत नसते. बाप लेक एकदा पोहायला विहीरीवर जातात. हा बाप पट्टीचा पोहणारा गडी असतो. एका माणसाची सोन्याची अंगठी पोहताना विहिरीत पडते. तो माणूस अस्वस्थ होतो. अनेक पोहणारी माणसं तळाला जाऊन अंगठी शोधतात पण अंगठी कुणाला सापडत नाही!

बाप लेक घरी परतत असताना बाप कमरेला लपवून ठेवलेली अंगठी आणि पोराला म्हणतो, 'साडेसाती संपली रं पोरा! आता तुला चपला, मला मुंडा तिला लुगडं समदं घ्यायचं. आता कशाचा घोर नाय!'

पोराच्या डोळ्यात हिरवी काच चमकते!

'हिरवी काच' हे किती सुंदर, सूचक शीर्षक आहे या कथेचं!

या पोराच्या मित्राजवळ असते अशी हिरवी काच. ज्यातून ऊन कसं हिरवंहिरवं वाटत असतं. हिरव्या काचेतून पाहीलं म्हणजे सगळं कसं गार शीतल वाटतं; ऊन्हाची काहिली जाणवत नाही, तसंच आता इतक्या ओढग्रस्त परिस्थितीत सहज हाती आलेली ती तोळाभर सोन्याची अंगठी!

कितीतरी दिवसानंतर हातात चार पैसे खुळखुळतील... बापाची चिंता मिटलीय. तसा बाप काही चोर नाहीये, पापी नाहीये पण तरीही... त्याने विहिरीत तळाशी जाऊन अंगठी शोधली पण सापडलीच नाही असे लोकांना सांगितले होते. आता म्हणतोय की साडेसाती संपली! पोराला नेमकं, नीट असं काही कळतच नाही, पण नव्या चपला मिळणार आणि मुख्य म्हणजे आपला सतत रागात असणारा बाप खुशीत आहे आज..! यामुळे सुखावलेल्या त्या पोराला हिरवी काच आठवते!

अबोध वयातल्या पोरांचं जग, त्यांची छोटी स्वप्नं, फारच अचून टिपत सखा कलाल कथा लिहून जातात.

उन्हामुळे पोराचे पाय भाजत असतात तेव्हा बाप म्हणतो.

''घिवू हां चपला तुला. जरा साडासाती हाय. गेली म्हणजे घिवू.''

तर पोरगं ''साडासाती कोण?'' असं विचारतं.

त्याचा हा भाबडा प्रश्न वाचकांना आतून हलवून जातो.

अशा लहान प्रसंगामधून कलालांची कथा सशक्त होऊन जाते. लांबलचक संवादाची तिथं आवश्यकता उरत नाही मग. ते मात्र जिवंत करण्याची किमया कलाल दोन तीन वाक्यातच करून जातात.

खेड्यातल्या जीवनात स्त्रीचं स्थान काय हे नेमकं सांगणाऱ्या तीन कथांचा उल्लेख करते.

'बळी', 'भोग' आणि 'इरादा' अशा या तीन कथा.

अवखळ तारुण्याला बांध घालत जगायचं हे ग्रामीण तरुणीचं प्राक्तन.

बळी कथेतलं वर्णन पहा :

''ती पडून होती. चादरीत गुंडाळून टाकल्यागत. तिच्या राखणीला बसलेले घराचे डोळे सुया टोचायचे. ती कळवळायची. डोळ्यांपुढं ती स्वत:लाच बघत होती. डोक्यावर रिकामी घागर. बांधावरची एवढीशी वाट. कसा पाय घसरला... आणि ती आतल्या आत कळवळली.''

- कथेच्या पहिल्या परिच्छेदातच त्या मुलीच्या आयुष्यात काय घडलं असावं याचा अचूक अंदाच येणारं हे वर्णन.

त्या मुलीचा भाऊच आता घरचा कर्ता झालाय.

''अण्णाचा गावात दबदबा. हळूहळू अण्णाच घर झाला. मोठं घर. आणि घराला लोंबणाऱ्या काकडमिश्या. इभ्रतीला जपणाऱ्या रुबाबात.''

तरुण वयात पाय घसरणं आणि पाळत ठेवणारं रुबाबदार घर पुढे त्या मुलीचं काय होणार याची काळजी वाचक करेपर्यंतच...

''पालीगत सरपटत ती आढ्यापतूर गेली होती. तिथंच गळ्याभोवती करकचलेल्या दोरीला लोंबत होती. आतबाहेर अंधार भणभणत होता.''

या जिवघेण्या, काळीज कापत जाणाऱ्या वाक्यांनी, कथा संपते.

'भोग'कथेत एक बाई, तिचं अनैतिक संबंधातून जन्माला आलेलं बाळ एका ओळखीच्या बाईच्या पदरात टाकून रात्रीच्या अंधारात गायब होते. ही बाई बाळ मांडीवर घेऊन आपल्या नवऱ्याला सांगते की ती बाई म्हणाली,

''सांभाळ लेकराला आन् गेली.''

तो विचारतो, ''पर कुठं गेली?''

''बाईमाणूस आणखी कुठं जाणार हो?'' ती उत्तरते.

या वाक्यातली सहजता म्हणजे चुकलेल्या फसलेल्या बाईची अख्खी जीवनगाथाच आहे.

पुरुषी मतलबीपणा, स्त्रीची अगतिकता तिला क्षमा न करणारा समाज, कठोर जगरहाटी, असे कोणतेही शब्द न उच्चारता ही कथा

स्त्रीपुरुष संबंध, समाज, रुढी परंपरा सगळ्यावरच प्रखर प्रकाश टाकत वाचकाला नि:शब्द करते!

'पंढरीला बुक्का मारल्यासारखा अंधार', 'काजळ ओतल्यासारखं आभाळ', 'मुक्यानं थेंब थेंब टिपं गाळणारं चिंचेचं झाड', 'रस्त्यावर तो डोळे खुपसून होता', 'अंधारानं पुन्हा पांखरून टाकलं', 'साळ्याला झेंडू फुटला होता', 'अंगातली सारी हाडं उसाच्या घाण्यापुढं जळत असल्यासारखी' 'मंद उजेडात घर झुरळागत दिसत होतं'

ही अशी मिताक्षरी वर्णनं - कथेचा दर्जा उंचावणारी. कलालांच्या शैलीचं महत्त्वाचं वैशिष्ट्य हेच की त्यांना फापटपसारा लागत नाही. कमी परंतु नेमके शब्द वापरून ते चित्र उभं करतात.

छोटासा, साधा प्रसंग सांगतात; ग्रामीण सहजतेने. आणि शेवट मात्र काळीज तोडणारा असा. कधी घटना तर कधी लेखकाने वापरलेलं एखादं सूचक वाक्य किंवा प्रतीक.

त्यावर फारसं मोठं तत्त्वज्ञान सांगणं नाही किंवा रंजकता आणावी अशी कुठे कलाकुसर किंवा जोडकाम नाही.

अत्यंत प्रवाही कथानक नात्यांचा फार गवगवा न करता दिसून येणारी नात्याची घट्ट वीण, त्यातली नैसर्गिकता-विलोभनीय अशी!

'इरादा' या कथेत प्रियकराबरोबर धाडसाने पळून गेलेली तरणी पोर आहे. तिचं खरोखरच प्रेम आहे त्याच्यावर. मध्यरात्रीच्या अंधारात तो मात्र तिच्या घाबरलेल्या मन:स्थितीचा बरोबर फायदा घेऊन नको तेवढी जवळीक करतो!

तिथे त्याची मन:स्थिती सांगताना कलाल लिहून ठेवतात.

''पिठूर चांदणं होतं पण पेट घेणारी धग मावळली होती.''

पुरुषांच्या शारीर ओढीचं याहून कमी शब्दात परंतु प्रभावी असं काय वर्णन करता येईल?

कलालांच्या कथा अशा आहेत; मनात रुतून बसणाऱ्या. गरिबी, उपासमार, कष्ट, दुष्काळ, ओसाड रान, धूळ, चुलीच्या धुरासमोर अखंड धगधगणारं बाईचं जगणं, अबोध वयातली स्वप्नं या सगळ्यासकट उघड्या बोडक्या रानाचं भकासपण आणि धुरकट ओलसर खोपीतलं करूण जगणं सांगणारी त्यांची कथा अस्सल ग्रामीण प्रतिमा, प्रतिकांसकट कागदावर उमटते, कमी बोलते आणि अचानकच गप्प होऊन जाते. तुम्ही मात्र पुन्हा पुन्हा तिला वाचत राहता.

बेळगाव जवळच्या खेड्यातले पण आयुष्य कोल्हापुरात व्यतीत केलेलले कलाल, ग्रंथपाल म्हणून कार्यरत होते. दोनच कथासंग्रहातून त्यांनी ग्रामीण वास्तव व्यथा वेदनेसकट वाचकांसमोर ठेवलं.

उत्तम हस्ताक्षर असणारे, फारसे कुठे न दिसणारे सखा कलाल, मराठी कथेत अत्यंत मोलाची भर टाकून गेले. दोनच कथासंग्रह लिहून ते लिहायचे थांबले होते. त्यांची कथा देखील त्यांच्यासारखीच कमी बोलणारी परंतु मराठी वाङ्मयात तिने अभंग अशी तिची मुद्रा कोरून ठेवली आहे.

कलालांची मितभाषी कथा आता मात्र बोलायचीच थांबली आहे, कायमची.

तिचे 'ढग' मात्र आभाळात नेहमीच दिसत राहतील.


**डॉ. वृषाली किन्हाळकर**
भ्रमणध्वनी : ९४२२८७१३६५
sahajrang@gmail.com



॥ग्रंथाली॥



# गंध आणि काटे

**चांगदेव काळे**

माणसाचे जगणे गुंतागुंतीचे आहे. त्याच्या आशा-आकांक्षा, वृत्ती-प्रवृत्ती, यातून सर्व रसाचे, सर्व कलांचे आविष्कार होतात. जगण्याच्या असोशीपासून विरक्तीपर्यंत, कष्टप्रद जगणे सोसण्यापासून राजकारणी डाव टाकण्यापर्यंत चालणारे मानवी मनाचे खेळ अनाकलनीय असतात. या कथासंग्रहात रेखाटलेल्या वेगवेगळ्या व्यक्तिरेखा अशाच आहेत. आपल्या भोवती दिसणाऱ्या... न दिसणाऱ्या... त्यांचे चित्रदर्शी रूप आपल्यापुढे साकारते अशा उत्कृष्ट शैलीत मांडलेल्या...

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# अस्पृश्य देवता

## आणि निवडक कथा

**डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**



प्रतिभा राय मानवतावादी लेखिका आहे. कथा लिहिताना त्या तिथल्या पूर्ण आसमंताचं, संस्कृतीचं, परंपरांचं, ऋतूंचं वर्णन करतात. त्यातून हळूहळू घटनेकडे जाताना, घटनेतील पात्रांची ओळख होते, त्यांची परस्परांमधील नाती व्यक्त होतात. जीवनातील अनेक लहान मोठ्या गोष्टीतून सत्य अगदी मार्मिकपणे समोर येतं. त्यांच्या कथांमध्ये मानवी स्वभावाचं सूक्ष्म निरीक्षण, नात्यातील गुंतागुंत, द्वंद्व, (असह्य) एकटेपण व्यक्त होतं. कुटुंब आणि समाजातील विविध परंपरा आणि परिस्थितीचं वर्णन करताना त्या माणसाच्या मनाचं, आत्म्याचं सूक्ष्म चित्रण करतात.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# मुखपृष्ठ चित्रकार सतीश भावसार

**मुलाखत : दीपक घारे**

**‘शब्द रुची’च्या अंकांची मुखपृष्ठ आपुलकीने सजवणारे सतीश भावसार यांनी ‘ग्रंथसंकल्पनाकार’ अशी स्वत:ची ओळख निर्माण केली. त्यांचा प्रवास आणि ध्यास यांचा वेध घेणारी ही मुलाखत...**

● गेली अनेक वर्षे तुम्ही मुखपृष्ठ चित्रकार म्हणून काम करत आहात. मान्यवर प्रकाशनसंस्थांसाठी आजवर तुम्ही असंख्य मुखपृष्ठ केलेली आहेत. यातून ग्रंथसंकल्पनकार (Book Designer) म्हणून तुमची वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. यासाठी मुळात चित्रकलेची आवड तुमच्यात कशी निर्माण झाली?

– माझे वडील आर्मीत होते. लष्करी सेवेत असल्यामुळे माझं बालपण लष्करी वसाहतीत गेलं. मराठी, हिंदी, इंग्रजी अशा माध्यमांमधून माझं शिक्षण झालं. वडील रजेवर घरी आले की स्केचेस करायचे. चित्रकलेची त्यांना आवड होती. सिनेनटांचे पोर्ट्रेट्स, ऐतिहासिक प्रसंगचित्रे अशा प्रकारची चित्रे ते करीत असत. हिंदी चित्रपटगीते त्यांना आवडत असत. वडील रजा संपवून ड्यूटीवर निघून गेले की मी देखील तशीच चित्रं काढून पाही. दलाल, मुळगावकरांचे आदर्शही डोळ्यासमोर होतेच. मात्र वडिलांची इच्छा होती, मी चित्रकार होऊ नये. त्याऐवजी डॉक्टर व्हावं. आर्मी मेडिकल कॉलेजमध्ये मला प्रवेश मिळू शकला असता आणि थोड्या खर्चात मला डॉक्टर होता आलं असतं. आठवी-नववीपर्यंत माझ्या डोळ्यांपुढे तेच ध्येय होतं.

● पण मग चित्रकलेत करिअर करायचं वेड डोक्यात कधी आणि कसं शिरलं?

– अकरावीत असताना माझा मित्र मोहनच्या घरी गेलो असताना मी तो स्प्रे-गन वापरत असताना पाहिलं. कट् आऊट्सच्या साहाय्याने तो स्प्रे-गन वापरून ज्या रंगछटा साकारत होता त्या विलक्षण होत्या. त्या क्षणीच मी ठरवून टाकलं, आपण चित्रकार व्हायचं. अशी चित्रं आपल्यालाही रंगवता यायला हवीत.

● तुम्ही मग पुण्याच्या अभिनव कलाविद्यालयात प्रवेश घेतलात. तिथला अनुभव कसा होता?

– ‘अभिनव’मध्ये प्रवेश घेतला आणि प्रश्न पडायला लागले. सुरुवातीला फाऊंडेशनला असताना त्रिकोण, चौकोन काढायला लागायचे. टू डी डिझाइन करताना ते कशासाठी करायचं असा प्रश्न पडायचा. पण या मूलभूत शिक्षणाचं महत्त्व पुढे अनेक वर्षांनी प्रत्यक्ष काम करताना लक्षात आलं. सुभाष अवचट आम्हाला तीन-एक वर्षे सीनियर होता. तो आम्हाला शिकवायला येई.

कॉलेज सुटलं की मी सुभाषच्या स्टुडिओवर जाई. माझं खरं शिक्षण झालं ते तिथे. सुभाष पुस्तकांची मुखपृष्ठं करायचा. मासिकांसाठी इलस्ट्रेशन्स करायचा. त्याची चित्रं रेखाटण्याची शैली माझ्या इतकी अंगवळणी पडली की मी त्याच्यासारखीच चित्रं काढू लागलो. त्याच्याकडे अनेक लेखकमंडळी येत. साहित्यावर चर्चा चालत. त्याचा मला फायदा झाला. उपयोजित कलेतील जी. डी. आर्ट झाल्यानंतर सहा महिने मी कामं मिळवायचा प्रयत्न केला. पण कोणी काम देईना. अनंत अंतरकरांनीही चित्र नाकारलं.

● पण यामागच्या कारणांचा तुम्ही शोध घेतलात का?

– घेतला ना. सुभाष अवचटचा माझ्यावर एवढा प्रभाव होता की मी त्याच्यासारखीच चित्रं काढायचो. एकदा मी त्याला तसं म्हटलं देखील. यावर तो नुसताच हसला. मला म्हणाला, ‘‘सतत काम करत रहा. तुझं तूच याचं कारण शोधशील.’’ यातून बाहेर कसं पडायचं? बराच विचार केला आणि माझ्याच मनाने दहा पुस्तकांची मुखपृष्ठं तयार केली. ती माझ्याच स्वतंत्र शैलीतील असतील याची दक्षता घेतली आणि ती मुखपृष्ठं माझं काम म्हणून मी दाखवू लागलो.

● याचा काही उपयोग झाला का? पहिला ब्रेक केव्हा मिळाला?

– काही दिवसांतच. त्या काळात मी साहित्य परिषदेत जात असे. तिथे साहित्यिक, प्रकाशकांची अनेकदा भेट होत असे. असंच एकदा चेतश्री प्रकाशनाचे वा.रा. सोनार भेटले. त्यांना ती मुखपृष्ठ दाखवली. त्यांना माझं काम आवडलं असावं. त्यांनी मग साने गुरुजींच्या ‘श्यामची आई’ या पुस्तकाचं मुखपृष्ठ करण्याचं काम मला दिलं. मला मिळालेलं ते पहिलं काम. मग महिन्याला एक याप्रमाणे मी ‘चेतश्री’साठी तीन-चार पुस्तकांची कामं केली.

● उमेदवारीच्या काळात तुम्ही इतरही कामं केली असतील. पण तुम्ही रमलात ते ग्रंथ संकल्पन आणि ग्रंथप्रकाशनाच्या क्षेत्रात मुखपृष्ठ चित्रकार व्हायचं हे तुम्ही आधीपासून ठरवलेलं होतं की

ते तसं घडत गेलं?
– मुखपृष्ठ चित्रकार व्हायचं हे माझं ध्येय पक्कं होतं. या क्षेत्रातच मला काम करायचं होतं. याचं कारण लहानपणापासून मला वाचनाची आवड होती. आजही मी काही ना काही वाचल्याशिवाय झोपत नाही. लहानपणी आमच्या कॉलनीत लायब्ररी होती. तिथे हिंदी, मराठी पुस्तके असायची. वडील देखील हिंदी कादंबऱ्या वाचायचे. मलाही हिंदीची गोडी लागली आणि वडिलांपेक्षा अधिक वेगाने मी पुस्तकं वाचू लागलो! गुलशन नंदांच्या कादंबऱ्या, रहस्यकथा असं जे मिळेल ते मी त्या वयात वाचलं. त्यामुळे मुखपृष्ठं, इलस्ट्रेशन्स याबद्दलचा माझा ओढा वाढत गेला.


● पण मग लेखनाकडे कधी वळला नाहीत का?
– उमेदवारीच्या काळात लेखन केलं. पण चार पैसे मिळावेत म्हणून. त्याचं असं झालं. काहीच काम नसताना निलायम थिएटरमध्ये मी सिनेमाची तिकिटं तपासायचं, म्हणजेच डोअर कीपरचं काम करायचो. तेव्हा 'सुपर्णा' प्रकाशनाच्या राजू मिरासदारने मला विचारलं, ''तू पुस्तकं वाचतोस, तर लेखनाचं काम का नाही करत?'' त्या काळात त्याची एक योजना होती. इंग्रजीतील क्लासिक्स घेऊन मराठीत या पुस्तकांचं संक्षिप्त रुपांतर करायचं होतं. 'बेन हर', 'प्राइड अँड प्रिजुडाइस'सारखी पुस्तकं त्यात होती. साधारणपणे शंभरएक पानात या कादंबऱ्या बसवायच्या होत्या. चांगली पुस्तकं आयती वाचायला मिळणार होती आणि वर चार पैसेही मिळणार होते. राजूने जेव्हा दुर्गा भागवत, भा. रा. भागवत अशी संपादकांची नावं घेतली तेव्हा मी थोडासा विचारात पडलो. पण मी एक पुस्तक पूर्ण केलं आणि दाखवलं. संपादकांच्या ते पसंतीस आलं आणि चार वर्षांच्या कालावधीत एकूण अकरा पुस्तकं मी रुपांतरित केली.


अशीच मी एक दीर्घकथा लिहिली होती, 'प्रिय कोनोविया'. ती कोणी प्रसिद्ध करेल अशी शक्यता नव्हती. पण एकदा अंतरकरांशी मी कथेबद्दल बोललो आणि त्यांनी ती 'हंस'मध्ये छापली देखील! नंतरच्या काळात मात्र लेखन मागे पडलं.

● या काळात चित्रकार म्हणून काही वेगळी कामं केलीत का?
– ॲनिमेशनसाठी लागणारी चित्रं मी केली. माधव वझे यांना अशी चित्रं काढून पाहिजे होती. त्या काळात ॲनिमेशन फिल्मसाठी पारदर्शक फिल्म वर अनेक चित्रं काढावी लागत. ती कला मी आत्मसात करून घेतली. त्याची फोटोग्राफी करण्याचं तंत्रही शिकलो. नॅशनल फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटट्यूटमध्ये एक वर्षाचा कोर्स केला. श्याम बेनेगल यांच्यासोबत एक शॉर्ट फिल्म करण्याची संधी मिळाली. त्यासाठी मी नऊ महिने काम केलं. सुरुवातीला श्रेयनामावलीत माझं नाव आलं तेव्हा मला खूप आनंद झाला होता.












● ॲनिमेशनच्या क्षेत्रात तुम्ही रमला नाहीत. पुस्तकांची कामं करण्याची इच्छा प्रबळ ठरली का?
– मी कामं शोधण्याच्या निमित्ताने १९८६मध्ये मुंबईत आलो. माझे मित्र मला मुंबईत येतोस का? म्हणून विचारीत होते. नीतिन पेडणेकर नावाचा माझा मित्र होता. त्याच्या ओळखीने कम्युनिकेशन नावाच्या ॲडव्हर्टायझिंग एजन्सीत मला नोकरी मिळाली. त्याआधी मुंबईत भटकताना फिल्म्स डिव्हिजनच्या कार्टून विभागाचा मला अचानक शोध लागला. मी तिथे जाऊन नोकरीची विचारणाही केली होती. माझ्या ॲनिमेशनच्या अनुभवावर मला तिथे नोकरी मिळत होती. पण मी ती पत्करली नाही.

● ॲड एजन्सीत तुम्ही किती काळ काम केलंत?
– मी एक ते दीड वर्षे तिथे काम केलं. पण जाहिरातींच्या कामात मी रमलो नाही. त्या काळात मी डोंबिवलीत स्थायिक झालो. दिवसभर नोकरी करायची आणि उरलेल्या वेळात मुखपृष्ठांची कामं शोधायची असा क्रम सुरू झाला. डोंबिवलीच्या आरती प्रकाशनाचे सुरेश देशपांडे यांनी चार-पाच पुस्तकांची मुखपृष्ठं करायला दिली.

● मुखपृष्ठ चित्रकार म्हणून या व्यवसायात स्थिरावायला किती वर्षे जावी लागली?
– जवळपास सात-आठ वर्षे लागली. दरम्यानच्या काळात माझा विवाह झाला. माझ्या पत्नीची, स्मिताची कामात साथ मिळाली. पैसे मिळवण्यासाठी नुसती मुखपृष्ठं करून भागणार नव्हतं. म्हणून मग घरीच स्क्रीन प्रिंटींगची कामं करू लागलो. मी दिवसभर मुंबईत फिरायचो. प्रकाशकांची कामं मिळवायचो. घरी स्क्रीन प्रिंटिंगचं काम स्मिता बघायची. हळू हळू मॅजेस्टिक, मनोविकास अशा प्रकाशकांची कामं मिळू लागली. 'नवशक्ती' दैनिकात फ्री लान्सर म्हणून काम करू लागलो. तिथे चित्रं काढण्याबरोबरच चित्रप्रदर्शनांवरही लिहू लागलो. यामुळे एक फायदा झाला. वर्तमानपत्रात नाव येऊ लागलं. डीटीपीचं

तंत्रज्ञान आल्यावर तेही युनिट सुरू केलं. मुखपृष्ठांबरोबर टाइप सेटिंग चालू केल्यामुळे कामंही जास्त मिळू लागली. मुखपृष्ठ चित्रकार म्हणून एस्टॅब्लिश व्हायला १९९६-९७ साल उजाडलं. आज आता बहुतेक सर्वच मान्यवर प्रकाशकांची पुस्तकं माझ्याकडे मुखपृष्ठांसाठी येतात.

● पुस्तकांची मांडणी, त्याला एक देखणं पण अर्थपूर्ण रूप देणं ही एक कला आहे. बुक डिझाइन, ग्रंथांचं दृश्य पातळीवरचं संकल्पन हा उपयोजित कलाप्रकार असला तरी त्याला साहित्याची समज आणि चित्रकाराची सर्जनशीलता आवश्यक असते. आपल्याकडे पुस्तकांची सजावट असा चुकीचा शब्दप्रयोग केला जातो. खरं तर पुस्तकाचं दृश्यरूप हे अंतरंगातून आलेलं आणि आशयाशी एकरूप असतं. तुम्ही या सगळ्या निर्मिती प्रक्रियेकडे कसं पाहता?

– मुखपृष्ठ करायचं तर आधी पुस्तकाचं हस्तलिखित पूर्णपणे कळलं पाहिजे. ते कळल्यावर मग काम सुरू होतं. पुस्तकाचा कंटेन्ट कळल्यावर दृश्य प्रतीकांच्या भाषेत तो मांडता आला पाहिजे. प्रत्येक पुस्तकाचा एक संदेश असतो. बॉटम लाइन असते. ती बॉटम लाइन वाचकांपर्यंत पोचवण्याचा माझा प्रयत्न असतो. असा एक दृश्य आकार सापडला की मी पाच-सहा स्केचेस करतो. कलर स्कीम बदलून पाहतो. मग त्यातलं चांगलं ते निवडतो.

● मुखपृष्ठाची शैली लेखकानुसार अथवा पुस्तकाच्या विषयानुसार बदलते का?

– बदलते ना. पण ते निवड करण्याचं स्वातंत्र्य चित्रकाराला असावं लागतं. वाचकांच्या काही आवडी निवडी असतात. प्रकाशकांचेही ठोकताळे असतात. अनुभवाने आता माहीत झालं आहे की अध्यात्मिक पुस्तक असेल तर तिथे मानवाकृतिप्रधान चित्रच लागतं. देवादिकांच्या सगुण स्वरुपाशिवाय पुस्तकं खपत नाहीत. अमूर्त चित्रं अनेकदा पुस्तकांवर एक फॅशन म्हणून छापली जातात. पण मी मुखपृष्ठांसाठी कधी अमूर्त चित्रं करीत नाही.

● तुमच्या आजवरच्या प्रवासात मुखपृष्ठांच्या निर्मितीत आणि मुद्रणात अनेक बदल झाले. त्यामुळे पुस्तकांच्या दृश्यरूपात फरक पडला. तुम्ही या साऱ्या तांत्रिक बदलांना सामोरे कसे गेलात?

– डिप्लोमा घेऊन बाहेर पडलो तेव्हा लेटरप्रेसचा जमाना होता. लाइन कलर, फोर कलर प्रिंटिंग, त्यासाठी आर्ट वर्क कसं करायचं याची काहीच माहिती नव्हती. सुभाष अवचटकडून किंवा प्रत्यक्ष काम करताना ते कळत गेलं. सुरुवातीला मुखपृष्ठासाठी कागदावर चित्रं रंगवायचो. आजही स्केचिंग करायची आणि चित्रं रंगवायची सवय मी ठेवलेली आहे. ऑफसेट प्रिंटिंग, लॅमिनेशन इत्यादिंमुळे पुस्तकांचा चेहरामोहरा बदलला.

पण खरा बदल झाला तो संगणकामुळे. फोटोशॉप किंवा कोरेलड्रॉमुळे प्रत्यक्ष संगणकावरच मुखपृष्ठं करता येऊ लागली. सुरुवातीला भीती वाटायची. पण शाळीग्राम, चंद्रमोहन यांच्याकडून हे तंत्र शिकून घेतलं. पण नंतर एकदा हात बसल्यावर कामं अधिक वेगाने आणि चांगल्या प्रकारे होऊ लागली.

● मुखपृष्ठकला या नव्या तंत्रज्ञानामुळे समृद्ध झाली की तिचा दर्जा खालावला?

– आजकाल हे तंत्रज्ञान सहजपणे उपलब्ध असल्यामुळे अनेकदा डीटीपी ऑपरेटरच मुखपृष्ठं बनवतात. त्यामुळे अनेकदा मुखपृष्ठांमध्ये सवंगपणा येतो. लेखकांच्या मुखपृष्ठाबद्दलच्या अवास्तव कल्पना, मुखपृष्ठं करणाऱ्यांचं दृश्यकलेबद्दलचं अज्ञान आणि प्रकाशकांच्या माफक अपेक्षा यामुळे भविष्यात मुखपृष्ठकलेला चांगले दिवस राहतील की नाही याचीच शंका वाटते.

● ग्रंथ संकल्पना आणि मुखपृष्ठकलेला शतकाहून अधिक वर्षांची परंपरा आहे. म. वि. धुरंधर, दलाल मुळगावकर, सुभाष अवचट यांच्यापासून रविमुकुल, चंद्रमोहन यांच्यापर्यंत अनेकांनी या कलेला समृद्ध केलेलं आहे. तुम्हीही या परंपरेत शोभतील अशी काही मुखपृष्ठं केलेली आहेत. त्यांपैकी उदाहरण म्हणून काही सांगाल का?

– चांगली मुखपृष्ठं करायची तर त्याची जाण चित्रकाराइतकीच प्रकाशक आणि लेखकांना हवी. चित्रकाराला त्याला पाहिजे ते व्यक्त करण्याचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे. असे काही मोजके प्रकाशक मला भेटले. निखिल वागळे, प्रकाश विश्वासराव यासारख्या प्रकाशकांकडे ती नेमकी दृष्टी होती. निखिल वागळेंनी तस्लिमा नसरीन यांच्या 'फिट्टम फाट' पुस्तकाचं मुखपृष्ठ मला करायला दिलं होतं. स्त्रीपुरुष संबंधांवरचा कादंबरीतील थेट आशय नग्न स्त्रीपुरुष दाखवूनच व्यक्त करणं आवश्यक होतं. त्यावर होणाऱ्या संभाव्य टिकेचा धोका पत्करून वागळेंनी ते छापलं आणि तस्लिमा नसरीन यांनाही ते आवडलं. विश्वासराव देखील लेखक आणि चित्रकार यांच्यात मुखपृष्ठाबद्दल मतभेद झाले तर चित्रकाराची भूमिका लेखकाला पटवून देत.

अरुण शेवते यांच्यामुळे गुलजार यांच्या 'देवडी' या पुस्तकाचं मुखपृष्ठ केलं. गुलजार यांना ते आवडलं आणि गुलजारांशी माझी दोस्ती झाली. रत्नाकरक मतकरी यांच्या आत्मचरित्राला मी केलेलं मुखपृष्ठ हा एक वेगळा प्रयोग होता. मतकरी यांच्याबरोबर मी एक फोटो सेशन केलं आणि रंग लावलेल्या त्यांच्या चेहऱ्याचा एक फोटो मी मुखपृष्ठासाठी निवडला. मतकरी यांचं गूढकथाकार प्रयोगशील नाटककार म्हणून असलेलं त्यांचं व्यक्तिमत्त्व मी पकडू शकलो. अशी कलावंत म्हणून समाधान देणारी अनेक मुखपृष्ठं मी केलेली आहेत.

● मुखपृष्ठांव्यतिरिक्त तुम्ही इलस्ट्रेशन्स, मासिकांची मुखपृष्ठही केलेली आहेत. विशेषत: अलिकडे वसंत सरवटे गेल्यानंतर 'ललित' दिवाळी अंकाची मुखपृष्ठं तुम्ही केलीत. बाबूराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्या एकत्रितपणे प्रसिद्ध करण्याचं महत्त्वाचं काम एक संपादक म्हणून तुम्ही केलंत. अमृता शेरगिल आणि व्हॅन

गॉग सारखे चित्रकार, प्रभाकर नाईक साटम यांच्यासारखे टॅपेस्ट्री चित्रकार तुमच्या कुतुहलाचा आणि अभ्यासाचा विषय राहिलेले आहेत. अभिजात कलेकडे तुमचा असलेला ओढा तुम्ही केलेल्या व्यक्तिचित्रणात्मक रेखीचित्रांमधून आणि पेंटिंग्जमधून दिसतो. तुमच्यातला हा अभिजात कलावंत रोजच्या कामाच्या रेट्यामुळे आणि भोवतालच्या दृश्यकलेबद्दलच्या उदासीनतेमुळे गुदमरतो आहे असं नाही तुम्हाला वाटत?

– वाटतं ना. हे असमाधान दोन प्रकारचं आहे. एकतर व्यावसायिक कामं करण्याच्या व्यापात हवी तशी पेंटिंग्ज करायला निवांतपणाच मिळत नाही. तरीही गेली काही वर्षं मी नेटाने काही पेंटिंग्ज करतो आहे. बाबूराव अर्नाळकरांचं पुस्तक मी त्यांचा एक फॅन म्हणून केलं. अमृता शेरगिल, एम. आर. आचरेकर यांसारख्या चित्रकारांबद्दल मला एक चित्रकार म्हणून कुतूहल आहे. अशा चित्रकारांवर लिहिलं गेलं पाहिजे असं मला वाटतं. 'ललित'च्या मुखपृष्ठांबद्दल म्हणाल, तर त्या चित्रांना एक थीम आहे. सरवटेंच्या थीमशी संवाद साधणारी पण माझ्या स्वतंत्र शैलीतील ती चित्रं आहेत. आशयाच्या दृष्टीने ती इलस्ट्रेशन्सपेक्षा पेंटिंगशी आणि अभिजाततेशी नातं सांगणारी आहेत.

● प्रकाशन व्यवसायात इतकी वर्षं राहिल्यानंतर समाजाच्या एकूणच अभिरूचीबद्दल तुम्हाला काय वाटतं? तुमचा अनुभव काय सांगतो?

– खरं सांगू का? दृश्यकलेची एकूणच समज आपल्याकडे कमी आहे. लेखक, प्रकाशक आणि मुखपृष्ठ चित्रकार हे ग्रंथनिर्मितीचे प्रमुख घटक आहेत. आणि अर्थातच चौथा महत्त्वाचा घटक म्हणजे वाचक. मला वाटतं लेखक आणि प्रकाशकांनी मुखपृष्ठ चित्रकाराला त्याच्या पद्धतीने व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य दिलं पाहिजे. पण बरेचदा असं होत नाही. लेखक-प्रकाशकांच्या आग्रहाखातर काही वेळेस तडजोडी कराव्या लागतात. अनेकदा कल्पक आणि अभिजात मुखपृष्ठ मला बाजूला ठेवावी लागलेली आहेत. लेखकाच्या प्रयोगशीलतेला वाव देणं जितकं महत्त्वाचं तेवढंच चित्रकाराच्या प्रयोगशीलतेला महत्त्व दिलं पाहिजे. तरच वाचकांची अभिरूची समृद्ध होईल.


**– दीपक घारे**

भ्रमणध्वनी : ९१६७७६४३२८

gharedeepak@rediffmail.com

ग्रंथाली

## राज कुलकर्णी यांची तीन पुस्तके




### दक्षिणेची मथुरा तेर

सातवाहन, शिलाहार, मौर्य, मोगल, मराठे अशा सर्व राजवटी पाहिलेले सर्व धर्मांचा मनोरम संगम अनुभवलेले मराठवाड्यातील तेर हे महाराष्ट्राच्या गेल्या दोन हजार वर्षांनी साक्ष आहे. हे पुस्तक म्हणजे तेरच्या गेल्या दोन हजार वर्षांच्या इतिहासाची सैरच जणू!


**मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.**




### वेताळ पंचवीशी

विक्रम आणि वेताळ हे आपल्याच मनातील दोन संवादी आणि विसंवादी अविष्कार आहेत. वेताळ जेव्हा विक्रमादित्याला कोड्यात टाकणारे प्रश्न विचारतो, तेव्हा ते प्रश्न तो आपल्याच विचारतो आहे, असे वाचकाला वाटू लागते. अशा 'डायलेक्टिकल' मांडणीतूनच सत्याचा, वास्तवाचा वेध शक्य होते.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**




### आठवडीबाजार आणि समाज जीवन

राजकीय, सांस्कृतिक इतिहास या त्याच्या जीवनशैलीपासून सुटा अभ्यासताना काही पैलू निसटण्याची आणि त्यामुळे काही संगती तुटून जाण्याची शक्यता असते. म्हणून त्या माणसाचा ग्राहक म्हणून अभ्यास करताना त्याच्या जीवनशैलीशी होणारा परिचय हा ही त्या अभ्यासाचा महत्त्वाचा भाग मानायला हवा.

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

# टू लेट

संतोष पाठारे

**सामान्य माणसांच्या आयुष्याचं प्रतिबिंब उभं करणारा तमिळ चित्रपट 'टू लेट' मनातला आशावाद जपण्याची उमेद देतो...**


अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा आहेत, याची जाणीवही नसणारा एक वर्ग समाजात वावरत असताना केवळ या गरजा भागवण्यासाठी काही माणसं आयुष्यभर राबत असतात. महाकाय शहरांमध्ये अन्न आणि वस्त्राची सोय सहज उपलब्ध होत असली तरीही गाठीला पैसे असूनही हक्काचं घर मिळवणं मात्र अशक्यप्राय होऊन जातं. इमारतीचे मजले आणि त्यातील फ्लॅटचे भाव आकाशाला भिडत असल्यामुळे स्वतःच घर हे स्वप्न अनेकदा हवेतच विरून जातं. जागतिकीकरणानंतर आयटी क्षेत्रात झालेल्या प्रगतीने घरांच्या किमतीवर अप्रत्यक्षपणे परिणाम केला. आयटी क्षेत्रात काम करण्यासाठी शहरात आलेल्या तरुणांच्या लोंढ्यामुळे फ्लॅटच्या भाड्यामध्ये भरमसाठ वाढ झाली आणि महिन्याला जेमतेम पगार मिळवणाऱ्या सामान्य माणसाला अशा फ्लॅटमध्ये भाड्याने राहणे देखील दुरापास्त झालं. शहरांचा विस्तार होत असताना घर ही मोठी समस्या बनून गेली. या पार्श्वभूमीवर 'टू लेट'सारखा सिनेमा येणं महत्त्वाचं आहे. या चित्रपटाने २०१८ चा सर्वोत्तम तमिळ चित्रपट म्हणून राष्ट्रीय पुरस्कार व अनेक महोत्सवांमध्ये मानाचे पुरस्कार मिळवले.

बऱ्यापैकी सोयी असलेलं, चांगल्या वस्तीतलं घर मिळवण्यासाठी करावी लागलेली वणवण एखाद्या कलाकाराचं कौटुंबिक आयुष्य कसं ढवळून काढते याचं प्रत्ययकारी दर्शन चेजियन यांच्या 'टू लेट' या तामिळ चित्रपटात घडतं. घर बांधणं ही आपल्या वैयक्तिक आवडीची व आर्थिक कुवतीवर अवलंबून असलेली बाब असली तरी देशातील अर्थव्यवस्था आणि सम ाजातील वर्गभेद त्यावर कसा प्रभाव टाकतो यावर 'टू लेट'मध्ये चेजियनने प्रकाश टाकलाय.

'टू लेट'चा नायक इलॅन्गो चित्रपटसृष्टीत धडपड करणारा तरुण आहे. लेखक दिग्दर्शक होण्याची कुवत असलेल्या इलॅन्गोला पैसे कमवण्यासाठी घोस्ट रायटिंग, डबिंग सारखी काम मनाविरुद्ध करावी लागतात. घरात बायको अमुधा आणि शाळेत जाणारा मुलगा सिद्धान्त. इलॅन्गोची घरमालकीण त्यांना एक महिन्याची नोटिस देऊन घर रिकामं करण्यास सांगते. भाड्याने नवीन घर शोधण्यासाठी इलॅन्गो आणि अमुधा प्रयत्न करू लागतात. महिन्याभराच्या कालावधीत इलॅन्गो, अमुधा आणि सिद्धान्त यांना आलेले अनुभव व त्यांच्या वैयक्तिक जीवनात झालेली घालमेल 'टू लेट'मध्ये वास्तववादी शैलीत चेजियनने चित्रित केली आहे. चेजियनचा चित्रपट दिग्दर्शनाचा हा पहिलाच प्रयत्न आहे. चित्रपटाआधी त्याने तमिळ चित्रपटसृष्टीत प्रकाशचित्रणकार म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'टू लेट' पाहताना त्याच्यातील प्रकाशचित्रणकार ठळकपणे जाणवत राहतो. प्रत्येक फ्रेम उत्तम प्रकाशयोजनेच्या साहाय्याने जिवंत करण्याचं कौशल्य चेजियनकडे आहे. त्याच्यावर असलेला जागतिक चित्रपटांचा प्रभावसुद्धा अनेक दृश्यातून समोर येतो. इलॅन्गोने सिद्धांत बरोबर टीव्हीवर पाहिलेला 'बायसिकल थिव्ज', टोलेजंग इमारतीत लिफ्टमधून जात असताना सिद्धान्तच्या हातातील लाल बलून ही काही उदाहरणं!

चित्रपटसृष्टीत स्वतःच स्थान निर्माण करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाबरोबरच बायको-मुलगा यांना किमान चांगल्या घरात निवारा मिळवून देण्यासाठी इलॅन्गोला यातायात करावी लागते. त्याच्या बजेटमध्ये असलेल्या डिपॉझिट आणि महिन्याचं भाडं देण्याची तयारी असूनही तो व्हेजिटेरियन आहे की नॉनव्हेजिटेरियन? हिंदू आहे की मुस्लीम? विवाहित-संसारी पुरुष की अविवाहित? अशा प्रश्नांच्या फेऱ्यांना त्याला सामोरं जावं लागतं. घरमालकिणीने दुसऱ्या भाडेकरूंना घर बघायला बोलावल्यानंतर अमुधाच्या वैयक्तिक आयुष्यावर बंधने येतात.

'टू लेट'मधील इलॅन्गो व अमुधाला भाड्याचं घर शोधताना आलेले अनुभव थोड्याफार फरकाने शहरात येऊन प्रस्थापित होणाऱ्या प्रत्येकाने अनुभवलेले आहेत त्यामुळे या चित्रपटाच्या आशयाशी आपण चट्कन जोडले जातो. चित्रपटात गुंतून जाण्याचं दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे त्याची वास्तव पातळीवरील मांडणी. इलॅन्गो, अमुधा व सिद्धान्त हे कुटुंब, त्याची घरमालकीण, घर शोधताना त्यांना भेटलेली विविध माणसं ही इतकी अस्सल आहेत की ती आपल्या आसपास वावरत असल्याचा प्रयत्न चित्रपट पाहत असताना येत राहतो. चेजियनने केलेली प्रसंगाची मांडणी व त्यात वापरलेल्या प्रतिमा प्रभावी आहेत. घरभिंती व खिडक्या यांचा अत्यंत




समर्पक वापर त्याने केला आहे. इलॅन्गो आणि अमुधाच्या वाजवी अपेक्षांचं प्रतीक म्हणून येणाऱ्या खिडक्या, सिद्धान्तने इमारतीच्या वरच्या मजल्यावरील सुखवस्तू घरातील मुलीकडे खिडकीतून पाहणं आणि टोलेजंग इमारतीमधील भव्य खिडक्या, असे विविध आशय त्याने या प्रतिकातून मांडले आहेत. घरमालकिणीने घर रिकामं करण्याची नोटिस देण्यासाठी अमुधाला बोलावलं असताना इलॅन्गो आणि सिद्धांतने खेळलेला वाघ-उंदिराचा खेळाचा चपखल वापर प्रसंगाची तीव्रता वाढवतो आणि थेट संघर्षाचं चित्रण टाळून ते सूचकपणे मांडण्याचं दिग्दर्शकाचं कौशल्य चित्रपटाच्या सुरुवातीलाच ठसठशीतपणे जाणवतं.

इलॅन्गो आणि अमुधाचा मानसिक तणाव त्यांच्या कृती व संवादामधून सतत जाणवत राहतो व त्यातूनच त्या व्यक्तिरेखांचा आलेख सुद्धा उलगडत जातो. आपण सर्जनशील असूनही फुटकळ कामात व्यर्थ वेळ घालवतोय ही इलॅन्गोला असलेली बोच, नवीन घर शोधण्यात येत असलेल्या अपयशाने आलेलं नैराश्य व त्यातून अमुधावर उगारलेला हात, यातून परिस्थितीच्या रेट्यात एका भल्या माणसाचं झालेलं स्खलन उत्तमरित्या प्रकट होतं. आपण नवऱ्याला आर्थिक हातभार लावू शकत नसल्याची खंत मनात बाळगणारी आणि घरमालकिणीने केलेल्या सततच्या अपमानामुळे भासून गेलेली अमुधा, सुद्धा प्रत्ययकारी आहे. या व्यक्तिरेखा जिवंत करण्याचं श्रेय दिग्दर्शकाइतकचं संतोष श्रीराम व सुशील राजकुमार या कलाकारांना द्यायला हवं. त्यांचा घरातील वावर एकमेकांना समजून घेणं, क्वचित प्रसंगी रागावणं, नवीन घर बघायला गेल्यानंतर नव्या उमेदीने हरखून जाणं, हे सगळं या दोघांनी खूप सहजपणए व्यक्त केलयं. धरून बाला या बालकलाकाराने सिद्धांतची निरागसता तितक्याचं सुंदरपणे व्यक्त केलीय.

आशय, अभिनय व प्रकाशचित्रण यांच्या बरोबरीनेच ध्वनी आरेखन 'टू लेट'चं महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. पार्श्वसंगीताचा वापर पूर्णपणे टाळून केवळ घटनास्थळावरील विविध ध्वनीच्या माध्यमातून प्रत्येक प्रसंग उठावदार करण्याची किमया दिग्दर्शकाने साधली आहे. चित्रपट हे दृक्‌श्राव्य माध्यम असल्याचा खऱ्या अर्थाने प्रत्यय घ्यायचा असेल तर 'टू लेट' पहाणे आवश्यक आहे.

राहतं घर सोडून जाण्याच्या आधी खडूने रंगवलेल्या भिंती सिद्धांतकडून काही केल्या स्वच्छ होत नाहीत. त्याने काढलेले पक्षी, झाडं व विमान ही जणू त्या कुटुंबाची स्वप्न बनून येतात. घर सुटलं तरी स्वप्न सुटतं नाहीत, ती कायम आपल्या बरोबरच राहतात. खिडकीत दोरीने बांधून ठेवलेला मनीप्लांट अलगद सोडवून दुसऱ्या घरी लावायचा असतो. 'टू लेट' घर बांधण्याचं अशक्यप्राय स्वप्न पाहणाऱ्या अनेकांच्या आयुष्याचं प्रतिबिंब दाखवतो, आसपासची परिस्थिती निराशाजनक असली तरीही म नात आशावाद कायम ठेवण्याची उमेद देतो. मनोरंजन करण्यापेक्षा चित्रपटाचं हे योगदान सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात अधिक आहे ना!

**– संतोष पाठारे**
भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७
santosh_pathare1@yahoo.co.in

# दहिवडीचे दिवस

**अपर्णा महाजन**

**पहाटे एक दीड तास वाचन हा रोजच्या दिनक्रमाचा भाग असे. मी हेन्रिक इब्सेनच्या नाटकांवर रिसर्च केला, तेव्हा नॉर्वेजियाचा हेन्रिक इब्सेन मला माझ्या माहेरचा वाटत होता..तेव्हापासून नोरा माझ्या मनात होती...**

माझ्या महाविद्यालयात, एका वर्गामध्ये मी अब्दुल कलाम यांचा 'The Power of Prayer' हा धडा शिकवत होते. त्यात ते म्हणतात, 'असे आईवडिल मला मिळाले, त्यांच्या कडून मला खूप शिकायला मिळालं, म्हणून मी खूप नशीबवान समजतो स्वतःला.' मग चर्चेमध्ये मी विद्यार्थ्यांना तुम्हाला काय शिकायला मिळालं रे तुमच्या आईवडीलांकडून? असा प्रश्न विचारला. आश्चर्यकारकपणे सगळ्यांनी मोकळेपणानी बोलायला सुरुवात केली. एक म्हणाली,' माझे पप्पा मला पाहिजे ते देतात'. दुसरीच्या डोळ्यांत पाणी.. म्हणाली, 'माझे वडील आर्मीत होते, त्यांना वाटते घर म्हणजे आर्मीच आहे. मला आठवत नाही मी त्यांच्याशी कधी बोललीय ते'. एक मुलगा म्हणाला,' एवढं असतं च नं, इतकं सहन करावंच लागतं की..'. अशा अनेक प्रतिक्रिया, त्यावर पुन्हा चर्चा.. हे ऐकताना, मला जाणवलं, हाच तो काळ असतो; पुढील आयुष्यात आईवडील जवळ वाटण्याचा किंवा ते कधीही जवळचे वाटू शकणार नाहीत, अशी दरी निर्माण होण्याचा...

मग मला आठवले माझे दहिवडीचे दिवस! दहावीपर्यंत मी तिथे राहिले होते.

सातारा जिल्ह्यातील, 'माणदेशा'तलं, दहिवडी नावाचं माझं गाव. दुष्काळाचा राजा म्हणावं असं. अत्यंत कोरडी हवा, एखादा बारीकसा ओहोळ असावा, अशी माणगंगा नदी. बऱ्याचदा ती कोरडीच असे. एका विहिरीवर गावाचा पाणीपुरवठा होत असे. तेंव्हा नळ आले नव्हते. आजूबाजूला धोत्रा, बाभूळ आणि तरवड या झाडांची मुबलकता. क्वचित एखादा पिंपळ, वड किंवा कडूनिंब. हवा कमालीची कोरडी. कोणत्याही क्रीम, तेल, मलमाला जुमानणार नाही, अशी करकरीत बोचरी थंडी. आजूबाजूला सगळी जिरायत शेती. त्यात पिकणारी दगडी ज्वारी, हुलगे, हरभरे आणि कुर्डूची फुले. मोजक्या पालेभाज्या आणि फारच मोजक्या फळभाज्या. बाजारात डाळिंब मात्र खूप असत. ती कदाचित शेजारच्या सोलापूर जिल्ह्यातून येत असावीत.

तिथे ब्रिटिशकालीन कोर्ट होतं, 'जीवन शिक्षण विद्या मंदिर' नावाची मुलांची, मुलींची प्राथमिक शाळा होती. मुलांच्या शाळेची एक इमारत होती. आमच्या शाळेला इमारत नव्हती. कुठे मठात, तर कधी नांगरेपाटील नावाच्या पाटलांच्या वाड्यात शाळा भरे. पाचवीपासून 'महात्मा गांधी विद्यालय' नावाचे हायस्कूल होते. एक डी.एड., बी.एड.चे ट्रेनिंग कॉलेज पण होते. 'अशोक टुरिंग टॉकीज' नावाचा तंबू होता; जिथे स्वतःच्या सतरंज्या घेऊन सिनेमा पाहायला जावे लागे. संध्याकाळी त्या सिनेमाची मोठा कर्णा घेऊन जोरात दवंडी असे, 'आज रात्रौ ठीक साडेनऊ वाजता....' अशी. आम्ही सगळे त्याची नक्कल करायचो.

अशा या माळरानावर वसलेल्या खऱ्याखुऱ्या खेडेगावात माझं घर होतं. गोल रचनेचं. दगडी कुंपण, त्याला छोटसं हिरव्या रंगाचं फाटक, बाहेर अंगण, आईनी तयार केलेलं. सडा-रांगोळी असलेलं. फाटकाच्या आत फरशीचं अंगण, पाणी साठवायचा सिमेंटचा हौद, अंगणातली बाग, झोपाळा असलेली बाहेरची खोली, उबदार



माजघर, प्रशस्त स्वैपाकघर, शेजारी माझ्या वडिलांचं- अण्णांचं ऑफिस, आणि त्याच्या शेजारी 'बंगला' नावाची एक मोठ्ठी, उंच हवेशीर खोली. त्या खोलीचं नावच 'बंगला'! तिथे आम्ही अभ्यास करायचो. आणि त्याला लागून बाहेरच्या बाजूला भलेमोठे बाथरूम, आणि एक हवेशीर पाटीचा संडास.

आज, पालक म्हणून वेगवेगळ्या स्तरांवर मोठे होताना, या घरातल्या प्रत्येक कोपऱ्याचे, दगडाचे, तिथल्या वातावरणाचे, संस्कृतीचे, आई अण्णांच्या आम्हाला वाढवण्याचे कित्येक क्षण वेगवेगळ्या रुपात डोळ्यापुढे येतात. कोणत्याही पातळीवर 'रम्य' नसणाऱ्या या आडवळणी गावात, मोठे होताना जे क्षण मी नकळत जगले ती आज मला पालकत्वाची कार्यशाळा वाटते.




निसर्गाचा कोप असलेल्या जमिनीत आईने बाग फुलवली होती. किती हरतऱ्हेची फुले! बाथरूमच्या छतावर पसरलेला मोगऱ्याचा वेल! वसंतपंचमीला त्या मोगऱ्याची पाने हळुवार खुडायची आणि तीन दिवस त्याला पाणी घालायचे नाही. त्याला 'ओढ देणे' म्हणतात. आणि चौथ्या दिवसापासून दररोज पाणी. आणि मग 'प्रत्येक पानाबरोबर मोगऱ्याचे फूल येणार बरं का' असं माझे वडील म्हणत आणि आम्ही त्या फुलांची वाट पहात असू. हजारो फुलं यायची. मोठ्या मोठ्या माळा, गजरे, माठामध्ये मोगरा, देवघर मोगऱ्याने ओथंबलेले. असा तो मोगरा उत्सव असे. या शिवाय देशी गुलाब, त्याचा पारदर्शी बरणीत भरपूर असलेला गुलकंद, आमच्या लांब वेण्यांमध्ये दररोज एखादं फुल किंवा गजरा असेच असे. इतर अबोली, निशिगंध, जुई, जास्वंदी, कळीची जास्वंद, कोरांटी... शिवाय एका कोपऱ्यात अंबाडीच्या भाजीचा वाफा, घेवाड्याचा मांडव, ओवा, पपई, हदग्याचे झाड; त्याची फुले तोडायला असंख्य पोपट येत. इतके की त्याचं नाविन्य वाटत नसे. आम्ही सगळे लहानपणी नदीवरून किंवा विहिरीवरून एकेक कळशी आणून झाडांना पाणी घालत असू. याचा कुणाला कधी बाऊ वाटला नाही. या बागेमुळे आमच्या घराला 'वाळवंटातलं नंदनवन' म्हणत. आईची ही बागेची आवड आम्हा तिन्ही बहिणींच्यात आली आहे. माझ्या मुलीत, नेहामध्ये, पण आलीय.

आम्ही सात भावंडं! त्यामुळे 'चीपर बाय द डझन' या पुस्तकातल्या अनेक सिद्धांतांसारखी, आमची भावंडांची टीम काम करत असू. कामापेक्षा तो 'इव्हेंट' होई. जसं, मोगर्याची पाने खुडणे, आमरस करणे, पत्रे, पागोळ्या स्वच्छता, वखारीतून आलेली लाकडं, सरपण रचून ठेवणे.. आणि अशी कितीतरी. मला जाणवतेय, कदाचित यातून मी टीमवर्कचे धडे घेतले असणार..

माझे वडील सातारा जिल्ह्यातले प्रसिद्ध वकील. ॲडव्होकेट वि.दि. अंतुरकर. सेंट झेविअर्समधून बी ए इंग्लिश करून त्यांनी पुण्याच्या आय एल.एस.मधून कायद्याचं शिक्षण घेतलं होतं. त्यांचं संस्कृत, मराठी आणि इंग्लिश साहित्यावर खूप प्रेम होतं. पहाटे लौक्कर उठून, ते आम्हा सगळ्यांकडून, आमच्या जेवणाच्या टेबलावर (हो.. तेव्हा दहिवडीत आमच्याकडे डायनिंग टेबल होते! आण्णांनी ते दिल्लीहून मागवले होते.) बसून ते सांगतील ते पुस्तक आम्ही वाचत असू. मग जशी जमेल तशी त्यावर चर्चा..यातून, वाचण्याकडे लक्ष द्यायला पाहिजे, ते समजायला पाहिजे, त्यावर आपले काही मत असयला हवे आणि ते व्यक्त करण्याची क्षमता हवी या सगळ्या गोष्टी.. आत्ताच्या भाषेत 'सॉफ्ट स्किल्स' आम्ही शिकलो. महाकवी कालिदासाची नाटके, शेक्सपिअरची नाटके, हेन्रिक इब्सेनची नाटके, रीडर्स डायजेस्टच्या संग्रहित गोष्टींची पुस्तके, जस्टीस एम सी छागलांच 'रोजेस इन डिसेंबर', नेहरूंनी इंदिरा गांधींना लिहिलेली पत्रे, ही सारी पुस्तके आम्हा सर्वांकडून वाचून घेतली होतीच. पहाटे एक दीड तास वाचन हा रोजच्या दिनक्रमाचा भाग असे. मी हेन्रिक इब्सेनच्या नाटकांवर रिसर्च केला, तेव्हा नॉर्वेजियाचा हेन्रिक इब्सेन मला माझ्या माहेरचा वाटत होता..तेव्हापासून नोरा माझ्या मनात होती.

मला आठवतेय, दिवाळीत, नरकचतुर्दशी दिवशी, अभ्यंग स्नान झालं, फराळ बिराळ झाला की आमच्या गावातील बंडोपंत कोर्डे नावाचे गृहस्थ भरपूर दिवाळी अंक घेऊन येत. आमच्या घरी ते पहिल्यांदा येत. अण्णांच्या ऑफिस मध्ये आपली अंकांची पोतडी उघडत. आणि ते सारे अंक चाळून, वाचून ज्याला जे आवडेल ते त्यांनी घ्यायची आम्हाला पूर्ण मुभा होती. अण्णांचं आम्हाला ते दिवाळीचं बक्षिस असे. मी लहान असल्याने, चांदोबा, कुमार, किशोरपासून किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, सत्यकथा, जत्रा, अगदी आवाज सुद्धा .. असे बरेच अंक आम्ही घेत असू. त्यावेळी यात खरोखर विशेष वाटत नसे पण आज निश्चितपणे जाणवतेय की किती छान संस्कार होते ते, नकळत केलेले, नकळत झालेले..

दर रविवारी, सकाळी लौक्कर उठून, आम्ही सगळे आमच्याकडे दूध घालणारे पिसाळ आडनावाचे शेतकरी, (आता हे नाव लिहिताना गंमत वाटतेय, पण लहानपणी त्यात हसू येण्यासारखं काही वाटलं नव्हतं..) त्यांच्या विहिरीवर पोहायला जायचो. दहिवडी सारख्या छोट्या गावात पोहायचा पोषाख घालून, जे माझ्या आईनी आमच्यासाठी शिवले होते, पोहणाऱ्या मुलींपैकी फक्त आम्ही तिघी होतो. नंतर पुण्यात एस पी कॉलेजमध्ये मी एका वर्षी पोहण्याच्या टीममध्ये होते.. त्याचं श्रेय खरंतर त्या कपारी कपारींच्या विहिरीकडे जातं.

आण्णा आम्हाला आणि आमच्याबरोबर आमच्या शाळेतल्या बऱ्याच मुलामुलींना इंग्रजी शिकवत. तेव्हा रेडिओवर शालेय पाठ होत. आई मला ते ऐकायला सांगे. एकदा शाळेत रेडिओवर ऐकून



मी धडा वाचताना, पेज नंबर फाईव्ह (ओठ एकमेकांना चिकटू न देता 'फ') असे म्हणाले. इतर सगळे फायू (ओठ दाबून) म्हणत. आमच्या सरांनी माझं खूप कौतुक केलं होतं. मला माझं इंग्रजी खूप भारीय असं वाटलं होतं तेव्हा...

मी आणि माझा भाऊ शाळेतून दुपारी घरी यायचो, तेव्हा आई झोपाळ्याच्या खोलीत, चष्मा लावून, इंडियन एक्सप्रेस वाचत बसलेली असे. आम्हाला त्यातली मॅगीचे कार्टून वाचून दाखवी. आईला एरव्ही सतत कामात बघायची सवय. तिला असे बसलेले पहिले की रिलॅक्स वाटे. आमच्याकडे कोजागिरी पौर्णिमेला अण्णांच्या सगळ्या वकील मित्रांना बोलावले जाई. आई सगळ्यांसाठी आटीव दूध आणि स्वतः छान-छान खाऊ करी. मग आम्ही गीत रामायणातली गाणी म्हण, कधी कविता म्हण किंवा श्लोक असे म्हणून दाखवत. असा मनोरंजनाचा कार्यक्रम असे. आमच्यासाठी औंध संस्थानातले एक दाभाडे नावाचे गुरुजी संगीत शिकवण्यासाठी येत. शुक्रवारी आणि शनिवारी. अण्णांनी आमच्यासाठी तंबोरा, पेटी आणि तबला आणला होता. दहिवडीत असं असणं, हे किती कठीण होतं हे मला आता जाणवतंय. आई खूप कष्टाळू, सुगरण होती. ती विणकाम, शिवणकाम, भरतकाम करे. आम्हाला सांगे, हात वाट्टेल ते काम करू शकतात. प्रसंगी पाटीचा संडास धुवायला सुद्धा तिने आम्हाला शिकवले होते. अशी मुळापासून आणि जिथली स्वच्छता आवश्यक आहे तिकडे प्राधान्य देण्याची दृष्टी नकळतपणे आमच्यात आली. नेहाला सुद्धा जेव्हा मी कानाकोपऱ्यातून, बेसिन, कमोड स्वच्छता करताना पहाते, तेव्हा मला आईची आठवण आल्यावाचून राहत नाही.

आमच्या घराशेजारी एक माळीवाडा होता. तिथल्या एक बबनच्या आई आमच्या घरी आईच्या मदतीला येत. त्यांना पद्मा-पुष्पा नावाच्या दोन माझ्या एवढ्या मुली. आई सणासुदीला, दिवाळी संक्रांतीला, आम्हाला सगळ्यांना एक तागा आणे आणि तिघींना सारखे फ्रॉक शिवायची. त्यावर कच्छी टाक्याने विणकाम करी. त्यांचे आमच्याबरोबर टेबलावर बसून जेवायला बसणे कधी खटकले नाही. आज मला या गोष्टीचे मनापासून छान वाटतेय.

आम्ही भावंडं एखाद्या विषयावर वाद घालायचो. विशेषतः मी आणि माझा, माझ्यापेक्षा मोठा भाऊ. मी इमानेइतबारे मुद्दे काढून कळकळीने माझे म्हणणे सांगे. मग भैय्या त्याची बाजू मांडे. शेवट असा होई की मी म्हणायचे, 'खरंच रे.. पटलं मला तुझं!' आणि मग तो म्हणे आता तुझं म्हणणं कसं बरोबर आहे, हे देऊ पटवून? आणि तो तेही पटवून देई.. मी म्हणे, 'हो रे.. हे पण पटतंय... त्यामुळेच आज तो भारतातला मोठ्ठा वकील असावा...'

दहिवडीला हॉटेलमध्ये जाऊन खाण्याची प्रथाच नव्हती. कोणी पाहुणे परत जाताना किंवा आम्ही हॉस्टेलवर येताना आई ठराविक डबा देई. त्यात पोळी, बटाट्याची उडीदडाळ फोडणीला घालून भाजी, डाळमेथीचं वरण, दहीभात, लोणच्याची फोड आणि तूप साखरेची एक गुंडाळी पोळी असा बेत असे. ही डबा देण्याची परंपरा माझ्याकडे चालू आहे आणि माझ्या नेहानी पण ती चालू ठेवलीय.

या साऱ्या आठवणी, उत्स्फूर्त पणे जगलेले क्षण ही या डब्यासारखीच आयुष्यभर पुरणारी शिदोरी मला या दहिवडीच्या दिवसांनी दिलीय.

**– अपर्णा महाजन**
भ्रमणध्वनी : ९८२२०५९६७८
aparnavm@gmail.com



## डॉ. अनंत देशमुख यांच्या चार कविता

### अनुभवांची पोतडी..

मी नात्याचा काला भरपूर केला
मी भावनांचा गुंता सोडविला
मी कर्तृत्वावर पाणी सोडले
मी निर्मुक्त होऊन गंगेत स्थान केले
मी नगा फकीर होऊन मुक्त नाचलो

### प्रश्नोपनिषद..

आकाशाच्या विस्तीर्ण नीलिम्यात निखळ आनंद असेल का?
महासागराच्या शुभ्र फेनिल तळाशी सुख नांदत असेल ना?
निबिड अरण्याच्या पोटात दाट काळोखात एखादा काजवा
उघडमिटत असेल ना?
जमिनीच्या मायाळू उदरात सृजनाची हुंकार झुंबरं लगडत
असतील ना?
आणि जगभरच्या माणूस नावाच्या प्राण्यात प्रेम,
मायेची पालवी फुलेल ना?

### आताशा..

आताशा उदासी माझ्या जवळ येते
मैत्रीचे नवे सांगत नाते
आताशा आठवण फुंकर घालते
मनाला हळव्या रिझवत जाते

स्मृतींची पाखरे आकाशी उडता
तिन्हिसांज तेव्हा ताल धरते
मी असतो तेव्हा कैफात माझ्या
नवी विराणी आत आकारास येते

### माणसं..

हा ग्रंथ तू सवड मिळेल तसा वाचीत जा
अर्थाच्या भरजरी लोंब्या निसव
हळुवारपणं
लिहिणारानं आपलं आयुष्य  वेचलंय एकेक शब्दामागं
लक्षात घे त्याच्या अनुभवाचा अर्क
मागं तू शंका विचारायचास,  आयुष्य म्हणजे काय वगैरे
मी वर्षंच्या वर्षं गहाण टाकली ते समजावून घेताना
खरं सांगतो मुला एका श्वासाशिवाय काही कळलं नाही बघ मला
तू स्वतः प्रयत्न कर, तुला कळेल त्याचा अर्थ
तू माझ्यापेक्षा हुशार आहेस खात्रीनं
आणखी एक कर : माणसं समजून घे, त्यांना जप
शेवटी तीच तेवढी खरी रे बाबा।

भ्रमणध्वनी : ८६८९९७८७४४
dranantdeshmukh@gmail.com

# चंद्राची दुसरी बाजू

**डॉ. मोहन द्रविड**

**शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रातही स्वार्थ आणि कुमार्ग अवलंबिले जातात. संशोधकांनी केलेल्या फसवणुकीचे किस्से धक्कादायक आहेत...**

चंद्राच्या सौंदर्याने मोहित होत नाही असा माणूस विरळा. पण चंद्राला एक अदृश्य बाजू आहे याची बऱ्याच जणांना भारताचे चंद्रयान जाईपर्यंत  तरी कल्पना नव्हती. तोच प्रकार शास्त्रीय विषयांतील संशोधनाचा. आपल्या तेज:पुंज भारतीय संशोधकांची कीर्ती भारतातच काय पण सर्व विश्वात पसरली आहे. पण त्यांच्यातही काही नासके आंबे आहेत. आणि तेही चंद्राच्या दुसऱ्या बाजूप्रमाणे आपल्या नजरेपासून दूर असतात. परंतु त्यांच्यामुळे आपली, आपल्या अस्सल शास्त्रज्ञांची आणि एकूण आपल्या देशाची निष्कारण बदनामी होऊ शकते. ते टाळावे म्हणून त्यांचा आणि त्यांनी अवलंबलेल्या कुमार्गांचा परिचय असणे हे आपल्या सर्वांच्या हिताचे आहे.

संशोधनात लबाडी करणं ही काही नवीन गोष्ट नाही. किंवा कोणत्या एका राष्ट्रापुरती मर्यादित नाही. संशोधनाच्या बाबतीत सर्वात वादग्रस्त क्षेत्र कोणतं असेल तर ते औषधांचं. असं असण्याची तीन कारणे संभवतात. एक म्हणजे वैद्यकीय शास्त्र अजूनही पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यांसारखे 'परिपक्व' शास्त्र नाही. पदार्थविज्ञानातसुद्धा 'कोल्ड फ्यूजन'सारखे तोतये अधूनमधून डोकं वर काढतात, नाही असे नाही. पण काही वर्षातच ती डोकी उडवली जातात. वैद्यकीय शास्त्रात मात्र पळवाटा भरपूर असतात. दुसरं कारण म्हणजे रूग्ण आणि त्यांचे नातेवाईक रोगाने इतके हतबल झालेले असतात की त्यांची मन:स्थिती कशावरही चटकन विश्वास ठेवण्याइतकी नाजूक झालेली असते. तिसरं कारण म्हणजे इतरांना असाध्य वाटणाऱ्या रोगांवर आपल्याकडे अक्सर इलाज आहे असं सांगून औषधाच्या दुनियेत अमाप पैसे कमावायचा मोह भल्याभल्या संशोधकांनाही आवरत नाही.

असाच एक संशोधक म्हणजे अनिल पोट्टी. कॅन्सरच्या रूग्णांना दिलासा देणारा देवदूत अशी त्याची ख्याती अमेरिकेत २००७च्या सुमारास पसरली. त्याचे डझनांनी शोधनिबंध मातब्बर नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले. रूग्णांनी त्याच्या खात्रीच्या उपचारावर कोट्यवधी डॉलर्स खर्च केले. साधारण तीन वर्षांनंतर त्याचे पितळ उघडे पडले. आता हा भूमिगत झाला आहे. तो कुठे आहे याचा शोध घ्यावा लागतो. कधी या राज्यात उगवतो तर कधी त्या राज्यात. प्रत्येक राज्यात जाऊन तिथल्या कठीण परीक्षा देऊन वैद्यकीय लायसन्स मिळवतो. पण मागे लागलेला नशीबाचा फेरा मात्र त्याचा पिच्छा सोडायला तयार नाही! अनिलला बायको आणि मुलं आहेत. याच्या मागोमाग त्या बिचाऱ्यांचीही वरात.

अनिल पोट्टी मूळचा आंध्रचा. जन्मवर्ष १९७२. तामीळनाडू-मधल्या वेल्लूर या गावात अमेरिकन मिशनऱ्यांनी स्थापन केलेल्या हॉस्पिटलच्या संलग्न अशा कॉलेजमध्ये आपण वैद्यकीय शिक्षण पुरे केले असे तो म्हणतो. (त्याच्या बऱ्याचशा कहाण्या संशयास्पद आहेत.) वैद्यकीय शिक्षण पुरे झाले तेव्हा आपण बावीस वर्षांचे होतो असे तो म्हणतो. म्हणजे तो एम्. डी. झाला की एम्. बी. बी. एस्. झाला याचा पत्ता लागत नाही. त्यानंतर तो नॉर्थ डकोटा विद्यापीठात गेला. एम्.बी.बी.एस्. या पदवीला अमेरिकेत मान्यता नाही. म्हणजे एम्.डी. असला पाहिजे. पण मग वयाचा हिशेब लागत नाही.

अमेरिकेत अर्ज करताना आपण Rhodes Scholar होतो अशीही त्याने बतावणी केली. कदाचित त्यामुळेही अनिल एम्. डी. होता की नाही याचा नॉर्थ डकोटा विद्यापीठाने विचार केला नसेल. किंवा अर्जात आपण एम्. डी. असल्याची थापही त्याने ठोकली असेल. नॉर्थ डकोटामध्ये त्याने इंटर्नशिप केली. पुढे तो नॉर्थ कॅरलाइनामधील ड्यूक विद्यापीठात आला. ड्यूक हे जगातल्या प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक मानले जाते. इथे अनेक नोबेल पारितोषिक मिळवलेले शास्त्रज्ञ आहेत. ड्यूकमध्ये प्रवेश मिळणं ही एक मानाची गोष्ट मानली जाते. अनिल पोट्टीने इथे २००० मध्ये प्रवेश मिळवून २००६ पर्यंत ऑन्कॉलजी आणि हेमटॉलॉजी या विषयातले कोर्सेस घेतले आणि पुरे केले.

त्यानंतर अनिलने तिथे संशोधनास सुरुवात केली. याच सुमारास जीवशास्त्रांची (Life Sciences) घोडदौड जोरात चालू होती. मानवी जनुकांच्या नकाशाचा (Human Genome) कच्चा मसुदा २००१ साली पुरा झाला. २००५ साली तो पक्का झाला आणि २००७ साली एका विशिष्ट व्यक्तीची संपूर्ण 'जनुककुंडली' तयार झाली. आतापर्यंत प्रत्येक माणसाची प्रकृती जरी वेगळी असली तरी औषधं तीच असायची. त्याच प्रमाणात असायची. त्यात निष्णात

डॉक्टर बदल करेल तेवढेच. आता मात्र औषधांच्या वैयक्तीकरणाला (personalized medicine) वेग येणार होता.

अनिल ज्याच्या हाताखाली ड्यूकमध्ये काम करणार होता त्या संशोधक-डॉक्टरचे नाव होते जोसेफ नेव्हिन्स. हा कॅन्सर क्षेत्रातला दादामाणूस समजला जायचा. त्याचा कॅन्सर होण्यास जबाबदार असणाऱ्या जनुकांचा (oncogenes) खास अभ्यास होता. (पोट्टी प्रकरणापासून नेव्हिन्सही परागंदा झालेला आहे.) कॅन्सरच्या रूग्णांना कीमोथेरपी द्यायची म्हणजे कशी तारेवरची कसरत असते ते त्याला माहीत होते. एवढ्या मोठ्या मेन्यूतून एक औषध निवडायचे, त्यातला योग्य डोस निवडायचा, रूग्णाला कमीत कमी त्रास कसा होईल हे पहायचे, यात डॉक्टरची कसोटी असायची.

अनिलने इथे डोके चालवले. रूग्णाच्या आनुवंशिक रंगावटीप्रमाणे (genetic makeup) आपण औषध आणि औषधाचे प्रमाण ठरवू शकतो असे त्याने जाहीर केले. त्याचे त्याविषयीचे शोधनिबंध प्रसिद्ध झाले. ज्यांचा कॅन्सर पुढच्या थराला गेला आहे त्यांनाही आपल्या संशोधनाचा उपयोग होईल असे त्याचे आणि त्याच्या साहेबाचे म्हणणे होते. सर्वत्र खळबळ माजली. जणू काही अमृतकलश सापडला असा मोहोल तयार झाला. ड्यूक विद्यापीठाने तर एक पाऊल आणखी पुढे टाकले. त्यांनी त्या संशोधनाचे व्यापारीकरण करायचे ठरवले. अनेक गिऱ्हाइके गोळा केली. शेवटी पैशापुढे सारासार विचाराला नाक टेकावे लागते, हेच खरे.

हे सोंग फार दिवस टिकले नाही. अनिलचं संशोधन इतकं महत्त्वाचं होतं की उतर हॉस्पिटलांनीसुद्धा त्यासारखे प्रयोग चालू केले. पण त्यांना म्हणावे तसे यश मिळेना. पत्रापत्री झाली. भांडाभांडी झाली. ह्यूस्टन (टेक्सस) येथील अँडरसन कॅन्सर सेंटर मधल्या डॉक्टरांनी हा प्रश्न विशेष धसाला लावला. शेवटी बिंग फुटले. आपलं सगळं संशोधन बनावट होतं, असं अनिलने कबूल केलं. माफी मागितली आणि आपले सर्व शोधनिबंध परत घेतले.

अनिलने त्याच्या साहेबावर काय जादू केली होती कोण जाणे. पण तो साहेब सुरुवातीस काही कबूल होईना. विद्यापीठासह सगळ्यांवर फिर्यादी आणि दिवाणी दावे ठोकले गेले. लक्षावधी डॉलर्सची नुकसानभरपाई झाली. अमेरिकेच्या सी. बी. एस्. या अखील देशाच्या दूरदर्शन वाहिनीवर अनिलच्या या लफड्यावर वीस मिनिटाचा कार्यक्रम झाला. अनिलने ड्यूक सोडले. आश्चर्य हे की त्यानंतरही तो जिथे जायचा तिथे लोकांना आपलसं करायचा. सर्वजण त्याचं तोंड भरून कौतुक करत. पण त्याची अपकीर्ती त्याच्यामागे हात धुवून लागली होती. २०१८ मध्ये तरी तो नॉर्थ डकोटा या राज्यातल्या एका कॅन्सर सेंटरमध्ये काम करत होता. पुढचा थांगपत्ता लागत नाही.

यानंतर डोळ्यांसमोर येतो तो डॉ. भरत अगरवाल. याचे कारण हाही कॅन्सर क्षेत्रामधला. योगायोग म्हणजे जिथल्या संशोधकांमुळे अनिलचे बिंग फुटले त्याच अँडरसन कॅन्सर सेंटरमध्ये अगरवालची कारकीर्द गेली. अनिलचा जन्म झाला त्या वर्षी अगरवालने बनारस हिंदू विद्यापीठातून बायोकेमिस्ट्रीमध्ये एम्. एस्. सी. मिळवली होती. तिथून तो गेला कॅलिफोर्निया बर्कली या सुप्रसिद्ध युनिव्हर्सिटीमध्ये. तिथे त्याच विषयात त्याने १९७७ मध्ये पीएच. डी. मिळवली. तीन वर्षे पोस्ट-डॉक केल्यानंतर जेनन्टेक या बायोटेक कंपनीत त्याला नोकरी लागली. तिथे साइटोकाइन या रक्तातील घटकाच्या विषयात त्याने प्राविण्य मिळवले. शरीराच्या प्रतिकारशक्ती प्रणालीमध्ये साइटोकाइन महत्त्वाचे काम बजावतात.

भरतच्या या प्राविण्याच्या जोरावर अँडरसन कॅन्सर सेंटरने त्याला १९८९ मध्ये साइटोकाइन विभागाचा प्रमुख म्हणून नेमले. तिथे भारतीय मसाल्याच्या पदार्थांतले-विशेषत: हळद आणि वेलचीमधले-कॅन्सरनाशक गुण शोधण्याचे व्रत त्याने घेतले. त्याप्रमाणे भरपूर संशोधन केले. पाचशेहून अधिक शोधनिबंध लिहिले. २००४ साली करी फार्मास्युटिकल ही कंपनी काढली. साइन पाथ या कंपनीने त्याची काही पेटंट्स विकत घेतली.

२०१२ मध्ये त्याच्या संशोधनाबद्दल हळूहळू शंका यायला लागली. तपास चालू झाला. बनवाबनवी उघडकीस आली. एका वर्षाच्या आत त्याचे शंभर पेपर्स मागे घेतले गेले. काही त्याने स्वत: मागे घेतले. काही अँडरसन कॅन्सर सेंटरने. ज्यांच्यामुळे त्याची भानगड बाहेर पडली त्यांना अगरवालने आपले वकील परांजपे आणि महादास यांच्यातर्फे २०१३च्या मार्च महिन्यात धमकीवजा पत्र पाठवले. पण त्याचा काही परिणाम झाला नाही. त्याच्या पेपरना लागलेली गळती चालूच राहिली. शेवटी त्याने २०१५मध्ये अँडरसन कॅन्सर सेंटरचा राजीनामा दिला. तरीसुद्धा त्यानंतर तीन वर्षांनंतर रामदेवबाबाबरोबर मद्रास आय्. आय्. टी. मध्ये त्याने योजलेल्या कॉन्फरन्सला अँडरसन कॅन्सर सेंटरचा पुरस्कार आहे असे अगरवालने खोटे जाहीर केले.

साधारण अगरवालच्याच वयाचाच (जन्म १९४७) पण खूप पुढे पोचलेला आणि नामचीन झालेला संशोधक म्हणजे डॉ. दीपक दास. हा बंगाली बाबू कलकत्त्यात एम्.एस्.सी. करून १९७१मध्ये न्यूयॉर्क यूनिव्हर्सिटीत दाखल झाला. तिथे त्याने पीएच. डी. मिळवून काही वर्षे काम केले. नंतर तो गेला १९८४ मध्ये कनेटिक्ट यूनिव्हर्सिटीत. तिथे त्याला कायम स्वरुपाची नोकरी मिळाली ती हृदयशास्त्राचा (Cardiology) प्रोफेसर म्हणून १९९३ मध्ये. वयाच्या ४६ वर्षी. म्हणजे आतापर्यंतची त्याची कारकीर्द होती बऱ्यापैकी सामान्य.

त्यानंतर मात्र त्याच्या कारकीर्दीला बहर आला. शेवटी शेवटी तर त्याचा वर्षाचा पगार दोन लाख डॉलर्सपर्यंत गेला होता. (त्याच्या बरोबरीच्या अमेरिकेतील प्रोफेसरांचा सरासरी पगार होता ऐंशी हजार.) जेव्हा उतर संशोधकांना ग्रँट मिळण्याकरता दात्याच्या कण्या कराव्या लागत तेव्हा दासकडे दहा-दहा लाखाच्या ग्रँट येऊन पडलेल्या असत. अनेक शास्त्रीय नियतकालिकांचा तो संपादक (कधी कधी मुख्य संपादक), सल्लागार संपादक झाला. त्याच्या कार्याचा उल्लेख न्यू यॉर्क टाईम्समध्ये (३१ डिसेंबर २००२) आला. त्याचे पाचशेहून अधिक शोधनिबंध आणि ११५ लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्याने १५ पुस्तकं आणि तितक्याच पुस्तकांमधली काही

प्रकरणे लिहिली आहेत. त्याचा संशोधकांच्या जगतात मोठ्या प्रमाणात संचार होता. त्याने International Society of Heart Research आणि International Society of Free Radical Research यासारख्या अनेक देशी व विदेशी कॉन्फरन्स योजल्या, तर काहींचा तो चेअरमन झाला.

त्याच्या संशोधनाचा विषय तसा लोकांसाठी विशेष लोभस होता. द्राक्षाची लाल दारू (Red wine) प्याल्याने हृदयाच्या विकाराची शक्यता कमी होते आणि आयुष्य वाढण्यास मदत होते. (द्राक्षाच्या सालीमुळे दारूला लाल रंग प्राप्त होतो.) सालीमधल्या रेझ्व्हेराट्रॉल ह्या रेणूची ही किमया, असा दासचा सिद्धांत. त्याच्या विद्यापीठातील प्रयोगशाळेत त्याने काही प्रयोग केले हे त्याने जेव्हा छापून आणले तेव्हा मात्र काही लोकांना शंका यायला लागली. कारण तसे प्रयोग करण्याची उपकरणंच त्या प्रयोगशाळेत नव्हती! २००५ पासून विद्यापिठाने त्याच्यावरची चौकशी चालू झाली. २०१२ साली तोपर्यंतचा ६०,००० पानांचा अहवाल तयार झाला. एवढा मोठा असायचे कारण पक्षपाताचा आरोप येऊ नये म्हणून विद्यापिठाच्या अधिकारवर्गाला अहवालात कसलीही उणीव ठेवायची नव्हती. (तरीही हा तर भारतीय शास्त्रज्ञावरील जातीयवादी गोऱ्या लोकांचा कट, असा आरोप दासने केलाच.)

दासला २०१३ साली नोकरीवरून बडतर्फ केले. तत्पूर्वी त्याची भरपूर स्वप्ने होती. आहार आणि हृदयविकार यांच्या संबंधावर त्याला संशोधन करायचं होतं. आयुर्वेदाचा अभ्यास करायचा होता. त्याने त्याकरता जादवपूर विद्यापीठात International Society for Medicinal Food and Applied Nutrition नावाची संस्था चालू केली होती. सगळ्यावर पाणी पडले. त्याने विद्यापीठाला ३५ लाख डॉलर्स नुकसानभरपाईचा दावा करू म्हणून दम दिला. पण त्याच वर्षी तो मृत्यूमुखी पडला.

ॲलबॅमा विद्यापीठातील डॉ. संतोषकुमार कटारिया हा आहार आणि कॅन्सर यांच्यात सांगड घालू इच्छिणारा आणखी एक संशोधक. ग्रीन टी प्याल्याने कातडीचा कॅन्सर व्हायची शक्यता कमी होते या त्याच्या २००५ सालच्या सिद्धांताने अमेरिकेत खळबळ माजवली. (इथे हे लक्षात घेतले पाहिजे की गोऱ्या लोकांमध्ये सूर्यकिरणांमुळे होणाऱ्या कातडीच्या कॅन्सरचं प्रमाण जास्ती असतं.) बर्मिंगहॅम (ॲलबॅमा) येथील वर्तमानपत्रांत कटारियाच्या मुलाखती छापून आल्या. द्राक्षाच्या बिया खाल्ल्या की प्रॉस्टेट कॅन्सर व्हायची शक्यता कमी होते हा कटारियाचा दुसरा सिद्धांत. त्याचा तो पाठपुरावा करत असतानाच आभाळ कोसळलं.

संतोषकुमार कटारिया हा मूळचा उत्तर प्रदेशचा. अगरवाल, दास यांच्याच वयाचा. याने १९७५ मध्ये झाशी येथील बुंदेलखंड विद्यापीठातून रसायनशास्त्रात पी. एच्. डी. मिळवली. अलाहाबाद विद्यापीठात ३ वर्षे पोस्ट-डॉक केल्यानंतर तो अमेरिकेत गेला. तिथे ॲलबॅमा विद्यापीठातील त्वचाविज्ञान विभागाबरोबर कॅन्सर सेंटर, स्थूलता संशोधन केंद्र आणि बर्मिंगहॅम गावातील सैनिकांच्या हॉस्पिटल इत्यादींमध्ये त्याची नेमणूक झाली. त्याचे १५० शोधनिबंध आणि ८० च्या आसपास लेख प्रसिद्ध झाले, आणि ते असंख्य ठिकाणी उद्धृत झाले.

२०१२ साली प्रसिद्ध झालेल्या त्याच्या एका शोधनिबंधा-मधल्या फोटोमध्ये कुणालातरी काहीतरी गफलत दिसली. त्याने तक्रार केली. तिथून सुरुवात झाली. मग कटारियाचे सर्व पेपर बाहेर काढले आणि सर्वांची कसून तपासणी झाली. सगळा खोटेपणा बाहेर पडला. २०१७ साली तो विद्यापीठातून राजीनामा देऊन बाहेर पडला. त्यावेळी त्याच्याकडे NIH (National Institutes of Health) या सरकारी संस्थेकडून मिळालेली ५० लाख डॉलर्सची ग्रँट शिल्लक होती! विद्यापीठाने त्याचे प्रसिद्ध झालेले सर्व पेपर्स मागे घेतले.

ॲलबॅमा विद्यापीठात याच सुमारास हेराफेरी करणारा संशोधक म्हणजे डॉ. एच्. एम्. कृष्णमूर्ती. प्रथिनाच्या रेणूंची अंतर्रचना शोधणं हे याचं कार्यक्षेत्र. येल या जगप्रसिद्ध विद्यापीठात त्याने १९८० मध्ये पोस्ट-डॉक करायला सुरुवात केली. त्याचा साहेब होता नोबेल पारितोषिक विजेता डॉ. स्टाइट्स. तिथे कृष्णमूर्तीने केलेले संशोधन नावाजले गेले. १९८५ साली तो हेंड्रिक्सन प्रयोगशाळेत ज्येष्ठ शास्त्रज्ञ म्हणून दाखल झाला. तिथेही त्याचे काम नावाजले गेले.

१९९८ मध्ये तो ॲलबॅमात गेला. तिथे त्याने २००७ साली संशोधित केलेल्या काही प्रथिनांच्या रेणूंची अंतर्रचना डेंगी रोगाच्या व्हायरसवर औषध शोधण्यात उपयोगी पडेल असा गाजावाजा झाला. तेव्हा त्याचे संशोधन पडताळून पाहण्याचे प्रयत्न झाले, आणि कृष्णमूर्तीची लबाडी लक्षात आली. २०१० साली त्याला विद्यापीठाने बडतर्फ केले. त्याची बाजू घेणाऱ्या डॉ. सतीश कोतवालचे उपकथानकही मनोरंजक आहे. दक्षिण आफ्रिकेतल्या केप टाउन विद्यापीठात शास्त्रज्ञ म्हणून काम करत असताना त्याने सेकोमेट नावाचे एड्सवरती जडीबुटीचे जालीम औषध तयार करून बाजारात विकायला काढले. ते पिऊन अनेक एड्सचे रोगी मेले. कोतवालला केप टाउन विद्यापीठातल्या नोकरीवरून काढले गेले.

अगरवाल, दास आणि कटारिया यांच्या वयोगटातला आणखी एक शास्त्रज्ञ म्हणजे डॉ. फजलूल सरकार. त्याची कथाही जवळजवळ तशीच. फक्त तपशीलात फरक. याची बी. एस्. सी. १९७१ ची कलकत्ता विद्यापीठातील, एम्. एस्. सी. १९७४ ची अलिगढ मुस्लीम विद्यापीठातली, आणि पी. एच्. डी. १९७८ ची बनारस हिंदू विद्यापीठातली. विषय बायोकेमिस्ट्री. कॅन्सर संशोधनासाठी प्रसिद्ध असलेल्या स्लोन केटरिंग या संस्थेत पाच वर्षे पोस्ट-डॉक केल्यानंतर त्याला ओकलंड विद्यापीठात नोकरी लागली. १९८९ मध्ये त्याला मिशिगन या राज्यातील वेन स्टेट युनिव्हर्सिटीत पथॉलजी विभागात कायम स्वरुपाची संशोधक - प्रोफेसर म्हणून नोकरी लागली.

सरकार याच्या कामाचा उत्पादक काल म्हणजे २००४ ते २०१२. त्याचे काम कॅन्सर याच क्षेत्रात. मुख्यत: स्वादुपिंड, स्तन आणि पुर:स्थ (प्रॉस्टेट) ग्रंथी यांचा कॅन्सर. वेन स्टेटशी संलग्न

**(पान नं. ३९ वर)**

# ‘कथा’ विशेष वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने



चांगदेव काळे






डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे






कुमार सोहोनी



चांगदेव काळे ‘गंध आणि काटे’,
डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे
‘अस्पृश्य देवता आणि निवडक कथा’,
कुमार सोहोनी
‘शिदोरी : माझ्या नाट्य-चित्र
प्रवासाची’
आणि किरण येले ‘तिसरा डुळा’



किरण येले



हस्ते - उदय सबनीस, मृणाल कुलकर्णी,
दिलीप प्रभावळकर, संजय जाधव, अभिराम भंडकमकर,
अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर आणि सामान्य वाचक

ग्रंथाली

# ‘कथा’ विशेष वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने



योजना शिवानंद





डॉ. सिसिलिया कार्व्हालो





नंदिनी थत्ते





आरती कुलकर्णी



योजना शिवानंद ‘अम्लान’, डॉ. सिसिलिया कार्व्हालो ‘टिपंवणी’, नंदिनी थत्ते–सुधीर थत्ते ‘नोबेलनगरी २०१९’
आणि आरती कुलकर्णी ‘सुमद्राचं गाव.
हस्ते – सुदेश हिंगलासपूरकर, संजय मोने, शिल्पा कांबळे, भारत सासणे आणि मोनिका गजेंद्रगडकर


BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
ESTD.1918
(SCHEDULED BANK)
1918 2018
YEARS OF SUCCESS
Your Financial Supermarket
HOME LOAN
INTERNET BANKING
MSME / BDLN LOAN
We Listen & Serve With Smile
MOBILE BANKING
VEHICLE LOAN
PERSONAL LOAN - BPLN
FOREX SERVICE
VIDHYADHAN EDUCATION LOAN
* Terms & Conditions Apply.
Corporate Office: Catholic Bank Building, Papdy Naka, P.O. Papdy, Vasai - 401 207
Call Toll-Free: 1800 233 6000 | www.bccb.co.in


ग्रंथाली ४५

# ‘कथा’विशेष वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने























**स्टोरी टेलच्या सहकार्याने**
**कथावाचन आणि कथा–चित्र रेखाटन**
**प्रसाद मिरासदार**
**कथावाचन – उदय सबनीस, मृणाल कुलकर्णी आणि दिलीप प्रभावळकर**
**कथा–चित्र रेखाटन – विजयराज बोधनकर, रविमुकुल आणि पुंडलिक वझे**



स्वप्नपुर्ती होणार
प्रोसेसिंग शुल्क नाही
(मर्यादित कालावधीसाठी)
युनियन होम
5 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 30 वर्षांपर्यंत
परिवर्तनीय परतफेड पर्याय
आकर्षक अटींवर गृहकर्जाचा टेकओव्हर
कोणतेही छुपे शुल्क नाही
युनियन माईल्स
2 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 7 वर्षांपर्यंत
कमी प्रक्रिया शुल्क
स्पर्धात्मक व्याज दर
अटी लागू
कर्जासाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा | दैनिक घटत्या शिलकीवर व्याजआकारणी
युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
Union Bank of India
Good people to bank with
भारतीय बँकिंग कोड्स आणि स्टँडर्ड बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य
Member of Banking Codes & Standards Board of India
हेल्पलाईन नं.: 1800 22 2244 / 1800 208 2244 (टोल फ्री नं.) | 080 6181 7110 (सशुल्क) | +91 80 6181 7110 (एनआरआयसाठी)
www.unionbankofindia.co.in | UnionBankOfIndia UnionBankTweets unionbankinsta UnionBankofIndiaUtube unionbankofindia

॥ग्रंथाली॥

# 'कथा' विशेष वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

## कानाला खडा कथाकारांशी संवाद

**सूत्रसंचालन – संजय मोने**

**भारत सासणे, मोनिका गजेंद्रगडकर आणि शिल्पा कांबळे**














डॉ. सोनाली लोहार



प्रदीप पाटील



निवेदिका अस्मिता पांडे



निवेदिका डॉ. लतिका भानुशाली

# 'कथा'विशेष वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

## पुरस्कार वितरण समारंभ क्षणचित्रे
















नीला वसंत उपाध्ये यांचा सत्कार




NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
022 28602000
www.nkgsb-bank.com
ATTRACTIVE INTEREST RATES ACROSS ALL OUR LOANS!
Our CAR LOAN bring SMILES
*T&C apply
Building Your Bright Future...
Education Loan
India & Abroad
*T&C apply
EDUCATION LOAN
Turn your Dreams to Reality with our Home Loan
*T&C apply
NKGSB Bank's TRAVEL FINA
(TRAVEL LOANS UP TO ₹5 LAKHS FOR INDIA & ABROAD)
*T&C apply

**(पान नं. ३० वरून)**

असलेल्या कार्मनोस कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये त्याने काम केलेच, पण अँडरसन कॅन्सर सेंटर, मिशिगन विद्यापीठ वगैरे ठिकाणी जाऊन तिथल्या जगद्‌विख्यात शास्त्रज्ञांबरोबर काम केले. त्याचे १५० हून जास्ती पेपर प्रसिद्ध झाले. त्याला नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटकडून १९९३ पासून १.५ कोटी डॉलर्सची ग्रँट मिळाली. मिसिसिपी विद्यापीठातून त्याला २०१३ साली देखणी ऑफर आली. प्रतिष्ठित (Distinguished) प्रोफेसरशिप, दोन डिरेक्टरशिप, वार्षिक पगार साडे तीन लाख डॉलर्स, अनेक पोस्ट-डॉक, सहाय्यक प्रोफेसर नोकरीस घेण्याची मुभा, सुरुवातीचा बोनस साडे सात लाख डॉलर्स, इत्यादी, इत्यादी!

त्याच सुमारास कुठेतरी शंकेची पाल चुकचुकली. फजलूल सरकारच्या पेपरची छाननी चालू झाली. तोपर्यंत सरकारने मिसिसिपी विद्यापीठाची ऑफर स्वीकारली होती आणि वेन स्टेटचा राजीनामा दिला होता. पण सरकारवर चाललेल्या चौकशीची कुणकुण मिसिसिपी विद्यापीठाच्या कानावर आली आणि त्याला दिलेली ऑफर रद्द झाली. सरकारने वेन स्टेटला दिलेला राजीनामा परत घ्यायचा प्रयत्न केला. पण त्यात तो अयशस्वी झाला. तोपर्यंत सरकारचे असंख्य पेपर एकामागून एक बाद झाले आणि नियतकालिकांतून परत (Retract) केले गेले. वैतागून सरकारने दोन्ही विद्यापीठांना न्यायालयात खेचले. पण तो दोन्ही ठिकाणी हरला.

वरील गटापेक्षा दहा वर्षे मोठे असलेल्या (जन्म १९३८) डॉ. रणजीतचंद्र याचे पराक्रम तर आणखी वरच्या श्रेणीतील. हाही एके काळी (१९८५-२०००) कीर्तीच्या शिखरावर गेला आणि जोरात खाली कोसळला. याची कर्मभूमी कॅनडा. तिथल्या सरकारने त्याला देशाचा दोन क्रमांकाचा किताब (आपल्या पद्मविभूषणसारखा) 'Order of Canada' १९८९ मध्ये दिला होता. त्याचे नाव नोबेल पारितोषिकाकरतासुद्धा एकदा नव्हे तर दोनदा सुचवले गेले होते. आहार व पोषण यांचा रोगप्रतिकारशद्गतीशी असलेला संबंध हे रणजीतचंद्रचेही खास संशोधनक्षेत्र. या क्षेत्राचा त्याला जनक मानायचे. The Father of Nutritional Immunology अशी पदवी त्याला बहाल केलेली होती.

रणजीतचंद्रचे सुरुवातीचे आयुष्य जरा खडतरच गेले. बऱ्याच परिश्रमानंतर त्याला कॅनडामध्ये सांदीकोपऱ्यात असलेल्या The Memorial University of Newfoundland नावाच्या विद्यापीठात नोकरी मिळाली. तेथील सेंट जॉन्स नावाच्या छोट्या गावामधल्या कँपसमध्ये त्याने खाद्यपदार्थांशी संलग्न अशा कंपन्यांबरोबर १९८५ पासून संशोधनास सुरुवात केली.

औषधासारखी संशोधनात फसवाफसवी करण्यासाठी सुपीक जमीन कुठे मिळत असेल तर ती आहार आणि पोषण या क्षेत्रात. रणजीतचंद्रचे या विषयावर पाचशेच्या वर पेपर्स प्रसिद्ध झाले आहेत. प्रत्येक पेपर सरासरी ५० वेळा उतर संशोधकांनी आपल्या पेपरमध्ये आधार म्हणून उद्‌धृत घेतलेला आहे. त्याशिवाय रणजीतचंद्रची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. वर्षांतले १००-१२० दिवस व्याख्याने, कॉन्फरन्स यांच्या निमित्ताने तो जगभर फिरत असे. (असे असूनही त्याचं पेपर पाडणं चालूच असे.) तान्ह्या मुलांसाठी लागणाऱ्या दुधाच्या पावडरचे तथाकथित ''फॉर्म्युले बनवणाऱ्या मोठमोठ्या कॉर्पोरेशन रणजीतचंद्रकडून शिफारस मिळावी म्हणून त्याची आराधना करीत.

पुढील दहा वर्षांच्या काळात त्याचं बिंग हळूहळू उघडकीस आलं. त्याचं संशोधन अथपासून इतिपर्यंत बोगस आहे याबद्दल सर्वांचं एकमत झालं. सुरुवात झाली ती त्याच्याच हाताखाली काम करणाऱ्या सहकाऱ्यांपासून. त्यांनी साधारण १९९५ पर्यंत विद्यापीठातल्या वरीष्ठ वर्गाला सावध केले. रणजीतचंद्रच्या बोगस संशोधनाची कल्पना जरी आली असली तरी अधिकारी मंडळी तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करत बसली. भारतीय वंशाचा, कृष्णवर्णीय, प्रोफेसर जातीयवादाचा बळी, असली (कु)प्रसिद्धी त्यांना नको होती. त्याशिवाय एकूणच संशोधन, त्यावर प्रतिष्ठित नियतकालिकात प्रसिद्ध होणारे लेख, त्यामागची प्रक्रिया (Peer-Review वगैरे, वगैरे) या सगळ्यांना ग्रहण लागणार होते. आता यापुढे संशोधनावर विश्वास ठेवणार कोण?

आता रणजीतचंद्रची मजल वाढली. त्याने लहान बाळांनंतर म्हाताऱ्यांना पकडले. त्यांची स्मरणशद्गती पुन: उज्वलित करणाऱ्या गोळ्यांचा शोध त्याने लावला. त्याच्या मुलीने त्या तयार करून २००१ मध्ये बाजारात विकायला काढल्या. त्याचा त्या गोळ्यांवरील लेख बी. एम्. जे. या प्रसिद्ध मेडिकल नियतकालिकाने छापायचे नाकारले. त्यानंतर २००२ मध्ये अमृतलाल जैन नावाच्या जयपुर येथील मेमोरीअल क्लिनिकमधल्या संशोधकाचा रणजीतचंद्रच्या गोळ्यांवर स्तुतीपर लेख Nutritiion Research या मासिकात छापून आला. चौकशीअंती लक्षात आलं की अमृतलाल जैन नावाचा माणूस किंवा मेमोरीअल द्विलनिक नावाची संस्था जयपुरात नाहीच! ते केवळ रणजीतचंद्रच्या सुपीक डोक्याचे खेळ होते!

त्याची किमया इतक्या उच्च दर्जाची होती आणि त्याचे प्रस्थ एवढं मोठं होतं की शेवटी कॅनडा सरकारच्या कनेडीयन ब्रॉडकॅस्टिंग कंपनीला (सी. बी. सी.) हस्तक्षेप करावा लागला. त्यांनी २००६ साली 'The Secret Life of Dr. Chandra' हा कार्यक्रम टीव्हीवर टाकला. त्यात रणजीतचंद्राची संपूर्ण नालस्ती निघाली. त्याचे सर्व शोधनिबंध कालांतराने रद्द करण्यात आले. मेमोरीअल विद्यापीठाने त्याची चौकशी चालू केली. त्याला विद्यापीठ सोडणे भाग पडले. त्याने सी.बी.सी.वर १४ कोटी डॉलर्सचा अब्रूनुकसानीचा दावा केला. त्यात तो हरला. एवढेच नव्हे त्यात त्याला २० लाख डॉलर्स सी.बी.सी.ला खर्चापोटी द्यायला लागले.

त्याच्या एकूण कृत्यांनी त्याच्याशी संबंधीत असलेल्या संस्था आणि विद्यापीठांनाच नव्हे तर कॅनडा सरकारलाही शरमेने मान खाली घालावी लागली. सरकारने त्याला दिलेला बहुमानाचा Order of Canada हा छानदा हा किताब मागे घेतला. (असं इतिहासात क्वचितच घडलं आहे.) इथून पुढे अंटॅरिओ या राज्यात डॉक्टरकी


करायला आला. पण इथेही त्याला स्वस्थ बसवले नाही. कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडे या न्यायाने इन्शुरन्सची एक अफरातफर त्याच्या नावावर एका वर्षातच जमा झाली!

इथे ज्या संशोधकांचा विचार केला आहे त्यांनी आपापल्या क्षेत्रात अनेक वर्षे काढली. जगद्विख्यात झाले. आणि आयुष्याच्या शेवटी बदनाम झाले. हे असं कसं झालं? भारतीय शास्त्रज्ञांविषयी आकस हे कारण नक्कीच नाही. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या वाट चुकलेल्या शास्त्रज्ञांची चोरी सापडल्यापासून त्यांच्यावर कारवाई व्हायला अनेक वर्षे लागली. याचं मुख्य कारण म्हणजे अस्सल भारतीय शास्त्रज्ञांनी कमावलेली अनेक वर्षांची पत (good will). त्याचा फायदा या तोतयांनी घेतला. स्वत: तर फसलेच पण त्यांच्या हाताखाली पोस्ट-डॉकसारखे जे सहकारी होते. त्यांचीही कारकीर्द बरबाद केली. आणि यातील बहुसंख्य भारतीयच होते. एक शक्यता अशी आहे की १९९० च्या पुढे एकूणच नीतिमत्ता खालावली. येन केन प्रकारेण पैसे कमावणं याला महत्त्व आलं. संशोधन जगतातील जिला मुकुटमणी, असे गौरवले जाते ती अमेरिकेची बेल लॅब ही आता गाढवांच्या नांगराखाली आली आहे. (टॅन्झिस्टर, लेझर, यूनिक्स, सी, सी. या संगणकाच्या भाषा, प्रकाशापासून वीज तयार करणारे सेल्स असल्या क्रांतिकारक कल्पनांनी बेल लॅबमध्ये जन्म घेतला म्हणून एके काळी तिला कल्पनांची गंगोत्री ही उपाधी मिळाली होती.) तिथेही बनावट संशोधन झाल्याची उदाहरणे आहेत. यापुढे मूलभूत संशोधन बंद करून ज्यातून चटकन पैसे मिळतील असं संशोधनच आपण चालू ठेवणार असं या बेल लॅबने जाहीर केलं आहे. ज्याला रॅट रेस असा इंग्रजी शब्द आहे अशी घाणेरडी स्पर्धा सर्वत्र चालू झाली. आणि त्याला शास्त्रज्ञही बळी पडले. एका संशोधकाचे अशक्य कोटीतील असे पाच-पाचशे शोधनिबंध प्रसिद्ध व्हायला लागले. लबाडीचा जुगार खेळला गेला. अगरवालच्या केसमध्ये 'तू मोठा जुगार खेळलास आणि हरलास', असे उद्गार कोर्टाने काढले होते ते विचार करण्यासारखे आहेत. तेव्हा चंद्राच्या दुसऱ्या बाजूवर एवढ्याचकरता प्रकाश टाकायचा की त्यातील खाचखळगे कळावे.

**- डॉ. मोहन द्रविड**
भ्रमणध्वनी ९८२०५-६३१३०
mohan.drawid@gmail.com

॥ग्रंथाली॥

# थंड हवेचे ठिकाण




**सुकन्या आगाशे**

सुकन्या आगाशे यांचा हा तिसरा कथासंग्रह. व्यक्तीचा भवतालाशी चालणारा संघर्ष व त्यातून परत उभे राहणे या तिसऱ्या संग्रहातील कथांमधूनही दिसते. पुस्तकातील कथा आशयदृष्ट्या वैविध्यपूर्ण आहेत. आशयानुरूप बदलणारी कथनशैली येथे दिसते. दीर्घ वर्णनात न लडबडणाऱ्या, अचूक, नेटक्या, मितभाषी शैलीत मांडलेल्या या कथा आपल्या वेगळ्या 'रुपाशयां'मुळे लक्षणीय ठरतात.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# अनुभवांची शिदोरी




**विलास गावडे**

या कथासंग्रहातही सगळ्या कथा सामाजिक जाणिवेच्या असून कामगार व्यवस्थापन संबंध आणि संघर्ष यांचे चित्रण त्यातून दिसते. या कथांतील अनेक पात्रे वास्तव आयुष्यात आपल्या आसपास दिसतात. त्यामुळे या कथा आपल्या होत जातात. हा कथासंग्रह म्हणजे कोणत्याही प्रदेशातील कष्टकरी माणसांच्या जगण्याचा अत्यंत नीटसपणे मांडलेला सजग आलेख आहे.

- किरण येले

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# राजकारण आणि राजकारण्यांचं पर्सनल ब्रँडिंग : काल, आज आणि उद्या

डॉ. लतिका भानुशाली

**नेत्याचा तळागाळातील लोकांचा जेवढा जास्त संपर्क येतो, ज्याला एक दोन रुपयाने डाळीचे भाव वाढले तर एकूण अर्थव्यवस्थेवर त्याचा काय परिणाम होतो, हे कळते. ज्याला गावकी-भावकीचं राजकारण कळतं, गट-तट कळतात तोच नेता भारतात यशस्वी होऊ शकतो...**

दूरदर्शन हे सरकारी मालकीचं असताना आणि लोकशाहीच्या भविष्याची भिस्त ही वृत्तपत्रांवर अवलंबून असताना वृत्तपत्र आणि राजकीय नेते यांचं नात हे 'तुझं माझं जमेना आणि तुझ्यावाचून करमेना' या धर्तीवर होतं.

'हॅनोव्हर' हे ८० ते ९०च्या दशकात गाजलेलं प्रकरण. उपमुख्यमंत्री रामराव आदिक यांनी परदेश दौऱ्यात अपेयपान करून केलेलं असभ्य वर्तन पक्षाची प्रतिमा मलिन करण्यास कारणीभूत ठरलं आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला. लोकशाहीच्या चौथ्या आधार स्तंभानं यात महत्त्वाची भूमिका दाखवून दिली. जगातील बड्याबड्या नेत्यांना सत्ताभ्रष्ट करण्याचे कार्य लोकशाही आणि विचारस्वातंत्र्य असलेल्या देशांत वृत्तपत्रांनी केलं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांना दोन साध्या वार्ताहरांनी सादर केलेल्या प्रकरणामुळे आपले स्थान सोडावे लागले. त्यावेळी त्यांनी वॉशिंग्टन पोस्ट बंद पाडण्याचा प्रयत्न केला. जपानचे पंतप्रधान तानाका यांना वृत्तपत्रांनीच सत्ताभ्रष्ट केलं तर भारतात आणीबाणीनंतर याच चौथ्या स्तंभांच्या ताकदीमुळे पंतप्रधान इंदिरा गांधी यांना सत्तेवरून पाय उतार व्हावं लागलं. १९८५ साली केंद्रिय मंत्री व नभोवाणी मंत्री विठ्ठलराव गाडगीळ यांनी 'पत्रकारांसाठी आचारसंहिता हवी' अशी सूचना केली होती. त्यावेळी माधव गडकरी यांनी चिडून 'वृत्तपत्रांनी तुम्हाला काय करायला नको आहे ते स्पष्ट सांगा व मग ते आम्हाला का करावे लागले ते आम्ही ऐकवू' अशी उद्विग्न प्रतिक्रिया दिली होती.

नेते आणि वृत्तपत्र यांचं नात नेहमीच विळ्या-भोपळ्याचं असतं असं नव्हे. आताच्या काळात तर ते 'तुझ्या गळा-माझ्या गळा' असंच जास्त आहे म्हटलं तर ते वावगे ठरणार नाही. अर्थात काही अपवाद वगळता! १९९०च्या दशकात माध्यम क्रांती झाली. विविध वाहिन्या इंटरनेट, संगणक, सामाजिक संपर्क स्थान यांचा प्रभाव वाढत गेला. पूर्वी राजकीय पक्षांनी एखादा कार्यक्रम आयोजित केला की वृत्तपत्र प्रतिनिधींना आमंत्रित केलं जायचं. ते बातमी कव्हर करायचे आणि मग ती बातमी छापली जायची. वृत्तपत्रांची संख्याही त्यावेळी मर्यादित होती. त्यामुळे राजकीय नेत्यांची सर्व भिस्त ही व्यक्तिगत संपर्कावर अवलंबून होती.

आज नेमकी याच्या उलट परिस्थिती आहे. दूरदर्शन हे घराघरांत पोहचले आहे. त्यावरील विविध वृत्तवाहिन्या दिवसभर बातम्यांचा रतीब ओतत असतात. प्रचंड प्रेक्षक संख्या असल्याने प्रसारमाध्यमांची ताकदही वाढली आहे. दर शंभर माणसांमागे दहा माणसं ही सामाजिक संपर्कस्थानाशी जोडलेली आहेत. मग ते फेसबुक असेल, ट्विटर असेल, इन्स्टाग्राम असेल किंवा इतर काहीही. पत्र लोकांपर्यंत पोहचण्याचा हा सोपा मार्ग उपलब्ध आहे एवढं मात्र खरं!

या सर्वांमुळे जन्माला आलेलं अपत्य म्हणजे 'पर्सनल ब्रँडिंग'. ते कधी सेलिब्रिटींचं असेल तर कधी राजकारणी नेत्यांचे. 'पर्सनल ब्रँडिंग' ही एक संकल्पना आहे, ज्यामागे शास्त्रीय विचारांची बैठक आहे. प्रत्येक माणूस वेगळा असतो. त्याची शक्तिस्थानं भिन्न असतात. हीच स्थानं पर्सनल ब्रॅडिंगचा पाया आहे.

ब्रँड ही एक संकल्पना आहे. काही मूल्यांचा समुच्चय त्यात घडवून आणला जातो. 'मी काय आहे आणि मला काय करायचं आहे?' या मूलभूत विचारांतून ब्रँड तयार होतो. एखादी व्यक्ती लोकांशी कशी बोलते, कशी संवाद साधते, ती दिसते कशी. तिची देहबोली काय दर्शवते. ती लिहिते कशी, ती व्यासपीठावर कशी वावरते या सगळ्या गोष्टींमधून त्या व्यक्तीची एकजिनसी प्रतिमा तयार होत जाते. पण बोलणं आणि व्यक्तिमत्त्वाचं वर्तन यात फरक असेल तर अपेक्षित परिणाम साधला जात नाही. म्हणूनच एखाद्या व्यक्तीचं पर्सनल ब्रँडिंग करणं ही रचनात्मक कृती आहे. त्याला कार्याची जोड देणं गरजेचं असतं.

असं पर्सनल ब्रँडिंग सिनेसृष्टीत सर्रास पाहायला मिळते. काही वेळा व्यक्तीमध्ये अंतर्भूत असलेल्या अंगभूत गुणांचाच 'ब्रँड' म्हणून वापर केला जातो. उदा. रणवीर सिंह यांच्या व्यक्तिमत्त्वात सळसळणाऱ्या एनर्जीचा 'ब्रँड'च तयार झाला आणि त्याचा वापर कंडोमच्या जाहिरातीत खुबीने करून घेण्यात आला. काही वेळा याच्या बरोबर विरुद्ध वर्तन घडवून ब्रँड निर्माण केला जातो. उदा. सलमान खान हा रॅश ड्रायव्हिंग, काळवीट शिकार आणि ऐश्वर्या रायला मारहाण या कृतीमुळे समाजात बदनाम झाला तेव्हा त्याची जनमानसातील प्रतिमा सुधारण्यासाठी 'Being Humam' हा बँड



तयार करण्यात आला. हा एन. जी. ओ. नेमकं काय करतो हे आजही कोडं आहे. पण कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात सलमान खान आवर्जून Being Humamचा टी-शर्ट घालून येतो. मग त्याला पूरक म्हणून काही सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन स्वत:चे 'प्रतिमा उज्ज्वलन' करत राहतो.

ब्रँडच्या माध्यमातून अशा तऱ्हेनं स्वत:ची प्रतिमा घडविण्यासाठी राजकारणात हाच ट्रेंड सर्रास वापरला जातो. भारताचे पंतप्रधान हे एक्सट्रीमली ब्रँड ओरिएंटेड आहेत. ब्रँडिगची संकल्पना ही भारतीय राजकारणाला नवीन नाही. स्वातंत्र्योत्तर काळात किंवा त्या आधीही व्यक्तिगत पातळीवर राजकीय नेत्यांनी स्वत:चे पर्सनल ब्रँडिंग केले होतेच. माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची शेरवानी, त्यावरील लाल गुलाबाचं फूल, त्यांचं लहान मुलांविषयीचं प्रेम या गोष्टीं नेहरू यांचा ब्रँड होता. तीच गोष्ट महात्मा गांधी यांच्या चरख्याची. स्वयंपूर्णता (Self-reliance) या संकल्पनेला त्यांनी





चरखा या प्रतीकाची जोड दिली. आणि मग तोच चरखा महात्मा गांधी यांचा ब्रँड बनून गेला. आज 'मोदी कुर्ता' 'मोदी जॅकेट' या गोष्टी 'ग्लोबल इंडियन' या संकल्पनेचा ब्रँड ठरलंय. बाळासाहेब ठाकरे यांचा सुरुवातीचा पोशाख हा सामान्य माणसाची काळी पँट आणि पांढरा शर्ट हा होता. मग हळूहळू पांढरा कुडता, मग भगवा कुर्ता, गळ्यात माळा आणि डोळ्यांवर काळा गॉगल हा त्यांचा 'ब्रँड' बनला. पुढे पुढे ते सामनाचा अग्रलेख लिहित नव्हते. ते काम 'सामना'चे संपादक संजय राऊत यांच्याकडे आले. पण संजय राऊत यांनी अग्रलेखाची रोखठोक खास 'ठाकरे शैली' तशीच ठेवली कारण ती शैली बाळासाहेब ठाकरे यांचा ब्रँड होता.

रशियन राष्ट्रध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी कम्युनिझमच्या हुकुमशाहीच्या दबलेल्या समाजासमोर स्वत:ची 'हुकूमशहा' ही प्रतिमा दडपण्यासाठी स्वत:ला निरागस, सर्वसामान्य माणूस म्हणून लोकांसमोर आणले. त्यामुळे मग ते अचानक मॉस्कोच्या रस्त्यावर सायकल चालवताना दिसू लागले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा छोटे कुत्रे फिरवतानाची क्लिप जगभर समोर आल्यावर पुतीन मग मोठे कुत्रे फिरवतानाची क्लिप व्हायरल झाली. या पद्धतीने पुतीन यांनी स्वत:चा एक ब्रँड तयार केला. त्यासाठी त्यांनी ब्रँडिंग कंपन्यांचा आधार घेतला हे सनातन सत्य आहे. १९७० साली इंदिरा गांधी यांनीही अशा ब्रँडिंग कंपनीची सेवा घेतली होती याचे दाखले मिळतात. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना जवळची वाटेल अशी कॉटनची, ब्लॉक प्रिन्टिंग साडी आणि डोक्यावरून पदर ही प्रतिमा त्यांचा ब्रँड ठरून गेली होती. जॉन एक केनडी, विन्स्टर्न चर्चिल यांचा गेटअप, ड्रेस सेन्स हा चर्चेचा विषय होता. पुढे तोच त्यांचा ब्रँड ठरला. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल मध्यमवर्गीय समाजाचे प्रतिनिधी म्हणून पुढे येताना जाणीवपूर्वक मध्यमवर्गीय माणसाच्या 'ड्रेस'मध्ये स्वत:ला प्रोजेक्ट केले. अण्णा हजारे यांची गांधी टोपी आणि धोतर ग्रामीण नेतृत्व अधोरेखित करणारा ब्रँड ठरलंय.

आज ब्रँड ही संकल्पना केवळ बाह्य रुपावर मर्यादित नाही. तिची व्याप्ती प्रचंड विस्तारलेली आहे. नेत्यांची प्रतिमा घडवणं, ते सतत लोकांपुढे चर्चेत राहतील याची काळजी घेणं, निवडणूकांची धोरणं ठरवणं, आपल्याला सकारात्मक ठरू शकेल अशी समाजाची मानसिकता तयार करणं या सगळ्याच गोष्टी बँड या संकल्पनेत अंतर्भूत आहेत. या सगळ्याच गोष्टी ब्रँडिग करणाऱ्या कंपन्या अत्यंत व्यवसायिक दृष्टिकोनातून करू लागल्या आहेत. एखाद्याची प्रतिमा घडविणं किंवा प्रतिमा बिघडवणं हे सहज शक्य होऊ लागलं. या सगळ्यातून एक तीव्र स्पर्धा जन्माला आली. यातून एक ढळढळीत सत्य समोर आले की जो जास्त वेळ लोकांना दिसतो तो लोकांपर्यंत पोहचतो. मग हे सतत लोकांसमोर 'दिसत राहणं' ही राजकीय नेत्यांची गरज बनली. त्यासाठी पक्षाचे आणि नेत्यांचे ब्रँडिंग सुरू झाले. यातून जन्माला आले 'मिडिया लॉजिक राजकारण'. मिडियाकडून जास्तीत जास्त लक्ष वेधून घेण्यासाठी राजकीय नेत्यांची धडपड सुरू झाली. त्यासाठी विविध योजना ब्रँडिंग कंपन्यांच्या माध्यमातून आखल्या गेल्या. जास्त 'व्हिजिबल'(दृश्यमान) कसं राहावं या विचाराला महत्त्व आलं. डिजिटल माध्यमं, छापील माध्यमं, श्राव्य माध्यमं, दृक्-श्राव्य माध्यमं, सामाजिक संपर्क स्थानं यात आपला ब्रँड निर्माण करण्याची चढाओढ नेत्यांमध्ये निर्माण झाली. राजकीय नेत्यांचं ब्रँडिंग घडवून आणणाऱ्या कंपन्यांमुळे नेत्यांची भाषा कशी असावी, त्यांचे शब्द कसे असावेत, त्यांनी कोणते शब्द सातत्याने वापरले पाहिजेत, जे लोकांच्या भावनिकतेला हात घालतील, प्रसारमाध्यमांबरोबर संवाद साधताना त्यांची भाषा कशी असावी, हस्तांदोलन करताना देहबोली कशी असावी, त्यांनी कोणत्या कार्यक्रमाला कोणते कपडे घालावेत, याचा अत्यंत सूक्ष्म पातळीवर विचार होऊ लागला. पूर्वी गांधी टोपी-धोतर अशा पेहरावात असणारी नेते मंडळी अचानक 'फॅशनमय' झालेली दिसू लागली. त्यांचा ड्रेस सेन्स बदलला गेला. सफारीची जागा मोदी जॅकेट, कुर्ते यांनी घेतली. भारतीय राजकारणं यानिमित्तानं 'देखणं' झालं. ज्याची आवर्जून दखल घेतली



जाऊ लागली.

२००४ ते २००९ या काळात राहुल गांधी यांची अशी प्रतिमा घडविण्यात आली. या ब्रँडिंगला यशही मिळत होते. महाविद्यालयीन युवा-युवतींमध्ये ते कमालीचे लोकप्रिय होऊ लागले होते पण या ब्रँडिंगमध्ये सातत्य राहिले नाही. याच प्रकारचे मॉडेल राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी वापरले होते. तेच मॉडेल २०१४च्या निवडणूकांत म ोदी पर्यायाने बीजेपीने वापरले. काँग्रेसच्या भ्रष्टाचाराला कंटाळलेल्या लोकांना 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवलं गेलं आणि भारतीय राजकारणात 'मोदी' नावाचा चमत्कार जन्माला आला. यातूनच जन्माला आला. पूर्वी एखाद्या प्रकल्पाचे उद्घाटन राजकारणी करायचे पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चक्क 'मेट्रोचा ब्रँड व्हिजन' रिलिज केला. असं यापूर्वी कधीही घडलं नव्हतं.

अर्थात नुसतं ब्रँडिंग करून राजकारणात कधीही यश मिळवता येत नाही. त्याला कृतीची जोड द्यावीच लागते. कारण मुळात त्या नेत्यामध्ये सुद्धा गुणवत्ता वक्तृत्व, कार्यशैली, कामाचा उरक, दांडगा जनसंपर्क या गोष्टी असणे गरजेचे असते. म्हणजे परीक्षेत ४० टक्के गुणवत्ता मिळवण्याचा बुद्ध्यांक असलेला विद्यार्थी फार तर ५०-५५ टक्क्यांपर्यंत नेता येतो. त्याला मेरिट लिस्ट मध्ये आगता येणं शक्य नसतं. त्यामुळे ब्रँडिंग कंपन्यांच्या प्रयत्नाने ५० टक्के यश हे त्या नेत्यालाच खेचून आणावे लागते. या गोष्टी शिकवून एका मर्यादेपर्यंत पुढे नेता येतात. अमित शहा, नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शरद पवार हे उपजत गुणवत्ता असलेले नेते आहेत. त्यांच्याकडे स्वत:च्या टीम आहेत. सल्लागार मंडळं आहेत. ब्रँडिंग कंपन्या फक्त त्यांना धोरणं आखण्यात मदत करतात. पक्षाच्या अजेंड्यांप्रमाणे कार्यक्रम आणि योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करू शकतात.

यात समूह मानसिकता मोठ्या प्रमाणात प्रभावित केली जाते. तिला वेगळ्या पद्धतीने हाताळले जाते. त्यासाठी वापरली जाणारी Evidence based design making ही संकल्पना आता भारतातही मोठ्या प्रमाणात वापरली जाते. कोणतीही ध्येयधोरणं असू देत; सरकारी वा खाजगी त्याची अंमलबजावणी करण्याआधी संशोधन करणे गरजेचे असते. यात आधी लोकांशी व्यक्तिगत पातळीवर संवाद साधला जातो. त्यांना प्रश्नावली देऊन त्यांच्या मनाच्या कलाचा विचार केला जातो. मिळालेल्या या माहितीच्या भंडाराचे समूह मानसिकतेचे पद्धतशीर विश्लेषण केले जाते. संश्लेषण-विश्लेषण यातून जे निष्कर्ष हाती येतील त्यानुसार निर्णय घेतला जातो.

सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून लोकांची मानसिकता हवी तशी घडवता येणं शक्य आहे. एकदा आपण नेट ऑन केलं की सकाळपासून संध्याकाळपर्यंतची झोपेपर्यंतची आपली सगळी माहिती गुगलला मिळत राहते. तुम्ही काय पाहाता, काय लाईक करता, कोणत्या पोस्ट सोशल मिडियावर टाकता, कोणते फोटो अपलोड करता, कोणत्या पोस्ट फॉरवर्ड करता, कोणते आर्थिक व्यवहार करता, काय लिहिता या सर्वाची माहिती मग गोळा होत राहते. त्यातून एखाद्या व्यक्तीचा आरपार अभ्यास करून त्याचे व्यक्तिमत्व जाणून घेणं सहज शक्य होतं. या माहितीचा वापर करून समूह मानसिकता घडविली जाऊ शकते. 'केंब्रिज अ‍ॅटलांटिका' नावाची डॉक्युमेंटरी फिल्म नेट फ्लिक्स वर उपलब्ध आहे. यातील स्कँडल 'The Great Hack' नावाने प्रसिद्ध आहे. यात लोकांचा पर्सनल डाटा राजकीय नेत्यांनी निवडणूक धोरणं ठरवण्यासाठी जिंकण्यासाठी कसा वापरला याची पूर्ण माहिती दिली आहे. हे प्रकरण पुढे आले तेव्हा सगळं जग हादरलं. भारतातही अशी प्रकरणं आहेत. पण ती अजून प्रकाशात आलेली नाही. माणूस जेव्हा इन्स्टाग्राम, फेसबुक, ट्विटर यांसारख्या संपर्क स्थानांचा वापर करतो तेव्हा तो एक प्रकारे स्वत:ची प्रायव्हसी नकळतपणे त्या कंपन्यांना विकतो; हा डेटा ब्रँडिंग कंपन्यांना उपलब्ध करून दिला जातो हे सत्या आहे. अर्थात या भितीमुळेच आता नवीन ब्राऊझर आलेत. उदा. याच्या माध्यामातून जर नेटचा वापर केला तर ते तुमचा पर्सनल डेटा इतरांना देत नाहीत. काही कंपन्या या सेवा पुरविण्यासाठी पैसे घेतात पण आपली प्रायव्हसी जपतात.

२००१ मध्ये जशी वेबसाईट बनवण्याची बूम होती. २००८मध्ये रिअल इस्टेटीतील तेजीमुळे बिल्डर बनण्याची बूम होती. २०१३ साली सोशल मिडियाने जोर धरला. आता ब्रँडिंग कंपन्या आणि एजन्सी यांची चलती आहे.

ब्रँडिंग कंपनी चिंतन ग्रूपचे व्हाईस प्रेसिडंट चिंतन थोरात म्हणतात, ''प्रत्यक्षात हे काम करणं खूप अवघड आहे. प्रचंड मनुष्य बळ यासाठी वापरले जाते. ज्या नेत्यांना स्वत:चं ब्रँडिंग करायचं आहे त्या नेत्याबरोबर आधी कंपनीतील तज्ज्ञ माणसं दोन-तीन दिवस व्यतीत करतात. त्या नेत्याचं निरीक्षण केलं जातं. त्याच्या नातेवाईकाला भेटून त्याच्या एकूण व्यक्तिमत्वाचा अंदाज घेतला जातो. मग त्यांच्या मतदार संघातील लोकांशी संवाद साधून त्या नेत्याविषयी लोकांच्या काय भावना आहेत हे जाणून घेतले जाते. नेत्याचे विविध फोटो लोकांना दाखवून प्रथमदर्शनी त्या फोटोवर लोकं काय प्रतिक्रिया देतात ते तपासले जाते. या सगळ्या माहितीचा पद्धतशीर अभ्यास केला जातो. नेत्याचा जन्मापासूनची माहिती गोळा केली जाते. या माहितीचे विश्लेषण-संश्लेषण केलं जातं. ही एक दीर्घ प्रक्रिया आहे. जे नेते या योजना दीर्घ कालीन स्वरुपात राबवतात त्यांना बऱ्यापैकी यश मिळवणे शक्य होते. या प्रक्रियेत दोन-तीन महिने चक्क 'ट्रायल-एरर' या पद्धतीनं कामं चालू असत. जसं जिम मध्ये गेल्यावर एखाद्या माणसाला रोज पुशअप मारायला सांगितल्या तरी त्याला ते झेपलेच असं नाही. कदाचित दहाव्या पुशअपलाच त्याचे हृदय थांब म्हणून त्याला सांगू शकेल. मग त्या माणसाची शारीरिक क्षमता बघून त्याला नंतर जिम प्लॅन, डाएट प्लॅन दिला जातो. अगदी तशीच पद्धत नेत्यांना घडविताना राबवली जाते. मोठा पक्ष, मोठे नेते यांना या सर्वांची गरज नसते. त्यांचे स्वत:चे अजंडे ठरलेले असतात. ब्रँडिंग कंपन्या त्यांची प्रभावी अंमलबजावणी करतात.

सध्या महाराष्ट्रात असं काम करणाऱ्या कंपन्या दहा हजारांच्या

आसपास आहेत. मोठ्या कंपन्या मोठ्या पातळीवर काम करतात. उदा. IPACK, CHINTAN GROUP वगैरे. 'चाय पे चर्चा' ही मोदींची कल्पना IPACK या कंपनीच्या माध्यमातून राबवली गेली होती. क्राँग्रेसचे मुख्यमंत्री यांनी 'कॉफी विथ कॅप्टन' ही कल्पना ब्रँड कंपनीच्या माध्यमातून राबवली. जगनमोहन रेड्डी यांची पदयात्रा IPACKच्या माध्यामातून आयोजित केली गेली. याच कंपनीने आदित्य ठाकरे यांची जनयात्रा मॅनेज केली. त्याला युवा सेनेने राबवले. अमित शहा यांची ABM ही कंपनी फेसबुकच्या माध्यमातून आपल्या योजना लोकांपुढे आणते.

समूह मानसिकता प्रभावित करणारे हे तंत्र भारतीय लोकशाहीला घातक करू शकतं का? या प्रश्नाचं उत्तर देताना चिंतन ग्रुपचे व्हाईस प्रेसिडंट चिंतन थोरात म्हणतात की भारतीय समाज हा पूर्णपणे भिन्न आहे. सामाजिक संपर्क स्थानांचा वापर करणारा समूह मर्यादित आहे. शिवाय भारतीय मतदार शहाणा आहे. त्यामुळेच तर आणीबाणीनंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागले. नुसतं ब्रँडिंग करून भारतीय निवडणूका जिंकणं शक्य नाही. इथे पाश्चात्य पद्धती-तंत्र निष्प्रभ ठरतात. नेत्याचा तळागाळातील लोकांचा जेवढा जास्त संपर्क येतो, ज्याला एक दोन रुपयाने डाळीचे भाव वाढले तर एकूण अर्थव्यवस्थेवर त्याचा काय परिणाम होतो हे कळते. ज्याला गावकी-भावकीचं राजकारण कळतं, गट-तट कळतात तोच नेता भारतात यशस्वी होऊ शकतो.

निवडणूक धोरणं ठरवताना जनसंपर्क साधला जातो. प्रश्नावली, प्रश्नोत्तर यांच्या माध्यमातून कोणत्या गावातील माणसं कोणत्या राजकीय नेत्याच्या पक्षाच्या मागे आहेत हे लक्षात येतं. जिथे आपल्या पक्षाच्या मागे खूप जण आहेत हे कळतं तो मतदार संघ उमेदवाराकडून दुर्लक्षित केला जातो. कारण तिकडे जिंकून येणार याची खात्री असते. ज्या ठिकाणी विरोधी पक्ष अत्यंत सशक्त असतो. त्या मतदारसंघाकडेही दुर्लक्ष केलं जातं कारण ती सीट मिळणे शक्य नसते. पण जिथे दोन्ही पक्षांना समांतर संधी असते तिथे राजकीय ताकद वापरून समूह मानस बदलवण्याचा प्रयत्न केला जातो. माणसं फोडणं, पैशाचा घोडेबाजार या गोष्टी सर्रास केल्या जातात.

**- डॉ. लतिका भानुशाली**
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
latikabhanushali@yahoo.co.in

## पुढच्या पिढीसाठी नोबेलनगरी...

यंदा नोबेलनगरीला चोवीस वर्ष झाली. नोबेलनगरीच्या सुरुवातीच्या बालवाचकांनी 'बालक ते पालक' अशी वाटचाल केली आहे. त्यांची पुढची पिढी आता बालवाचक बनायला लागली आहे. या चोवीस वर्षांमध्ये मोठं 'माध्यमांतर' देखील घडून आलं आहे. हे माध्यमांतर दोन प्रकारचं आहे. एक म्हणजे, आज परदेशात गेलेल्यांचीच नाही, तर खुद्द महाराष्ट्रातली मराठी माध्यमात शिकलेल्यांची मुलंही विज्ञान मराठीऐवजी इंग्लिशमधून शिकत आहेत. दुसरं माध्यमांतर घडवून आणलं आहे, अंकीय म्हणजे डिजिटल माध्यमांनी. आजची पिढी संगणक, मोबाईल, इंटरनेट, यूट्यूब या गोष्टी अतिशय सहजपणे वापरते आहे. या पिढीच्या सोयीसाठी आम्ही नोबेलनगरीचं पुढचं व्हर्शन यंदा सादर केलं आहे.

इंग्लिशमधून विज्ञान शिकणाऱ्या मुलांना इंग्लिश पारिभाषिक शब्द परिचित असले तरी त्यांची सांस्कृतिक भाषा आणि घरातलं वातावरण मराठमोळंच आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी 'केंद्रोत्सारी बल' अपरिचित आणि 'सेंट्रीफ्युगल फोर्स' परिचित पारिभाषिक शब्द असतात. असं असलं आपली फुगडी वापरून यामागची मूलभूत संकल्पना समजावून सांगितली तर ती सर्व माध्यमांमधून शिकणाऱ्या मुलांना पटकन उलगडते. हे लक्षात घेऊन यंदापासून नोबेलनगरी एकाच पुस्तकात मराठी आणि इंग्लिश अशा द्वैभाषिक स्वरूपात तुमच्या भेटीला आली आहे.

नोबेलनगरीच्या नव्या व्हर्शनचा दुसरा पैलू उमलला तो सुदेश हिंगलासपूरकरांनी सुचवलेल्या पुस्तकावर 'क्यूआर कोड' देण्याच्या कल्पनेतून. या प्रकल्पाला आधुनिक माध्यमांची जोड देण्यासाठी आम्ही नोबेलनगरी वेबसाईट सुरू केली आहे. तिच्यामार्फत आपण वर्षभर भेटत राहू आणि त्यातून नोबेलनगरीशी संबंधित विज्ञानाच्या नवनव्या पैलूंशी परिचय करून घेत राहू.

या वेबसाईटचा क्यूआर कोड आम्ही खाली छापला आहे. तो वापरून तुम्हीही नोबेलनगरी वेबसाईटला भेट देत राहा. तुमच्या परिचयातल्या मंडळींनाही तो जरूर फॉरवर्ड करा आणि जास्तीत जास्त मुलांपर्यंत नोबेलनगरीचे हे नवं रूप पोचू द्या.

शिवाय, आम्हाला तुमचा प्रतिसादही इ-मेलने अवश्य पाठवा. तुम्ही केलेलं कौतुक आम्हाला पुढे जायला उमेद देईल आणि तुमच्या सूचना आम्हाला नवनव्या दिशा दाखवतील. म्हणूनच तुमच्या प्रतिसादाचीही आम्ही प्रतीक्षा करत आहोत.

**- सुधीर आणि नंदिनी थत्ते**

खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून नोबेलनगरी वेबसाईटवर जाऊन नोबेल विजेत्या संशोधनाशी संबंधित माहिती वर्षभर मिळवा किंवा खाली दिलेला बेवसाईटचा पत्ता वापरा.

Or use the web address below:

https://sites.google.com/site/nobelnagariwebsite    प्रतिसाद पाठवण्यासाठी इ-मेल- nobelnagari@gmail.com

# अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची निवडणूक : स्वरुप व संदर्भ

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**भारतात जी तिकिटं वाटण्याची प्रथा आहे ती अमेरिकेत नाही. त्यासाठी पक्षश्रेष्ठीऐवजी जनता दावेदारांची निवड करते. हे अर्थातच केव्हाही लोकशाहीवादी...**

या देशातल्या जवळ-जवळ सगळ्या राजकारण्यांच्या मनात आपण एके दिवशी अमेरिकेचे अध्यक्ष होण्याचं स्वप्न असतं. हे पद जगात सर्वात बलशाली व प्रभावी समजण्यात येतं. जग त्याच्यासमोर झुकतं. महासत्ताक राष्ट्राचा प्रमुख म्हणून त्याचा प्रत्येक शब्द झेलण्यात येतो, त्याच्या विधानाचा जगात काथ्याकूट केला जातो आणि त्याची हालचाल इतिहास घडवतो. जपानला १९९८ मध्ये भेट देताना ज्येष्ठ बुशला अचालक वांती झाली. ही घटना जगाच्या वर्तमानपत्रांच्या मुखपृष्ठावर झळकली. टीकाकारांना व विनोदकारांना आठवडाभर चघळण्यास खाद्य मिळालं. जग शांत की युद्धग्रस्त ठेवण्याची असामान्य जबाबदारी त्याच्या खांद्यावर असते. त्याचं धोरण अनेकांना आवडत नसलं तरी त्याची दखल मात्र सर्व घेतात.

अशा सर्वोच्च पदासाठी कुठच्या कॉलेजात शिक्षण घेतलं म्हणजे मदत होते? खरं म्हणजे त्यासाठी कुठल्याच पदवीची जरूरी नसते. जास्त शिक्षण घेतलेला बुद्धिजीवी 'Egg Head' म्हणून त्याची उपेक्षा करण्यात येते. मग राजकारणातील अनुभव कामी येत असतील. छे! ते तर अजूनच हानिकारक ठरतात. या चिखलात जास्त पावसाळे घातलेल्यांची उलटी-सुलटी मतं विरोधी दावेदारांच्या टीकेची लक्ष्य बनतात. म्हणून कोरा इतिहास असलेलेच यशस्वी होतात. त्यासाठी असामान्य कर्तृत्वगुण लागतात असं म्हणता येणार नाही. ओबामांचं कर्तृत्व अधिसभेत १४२ दिवस हजेरी लावण्यापुरतं मर्यादित होतं. याला काही अपवाद आहेत म्हणा. अध्यक्ष होण्यापूर्वी आयसेनहॉव्हरनी दुसरं महायुद्ध जिंकलं होतं. पण हल्ली कर्तृत्व गुणापेक्षा वाक्‌चातुर्य व करिष्मा महत्त्वाचा असं आढळून आलं. करिष्माधारकांमध्ये चुका पचवण्याची शक्ती असते तर वाक्‌चातुर्यानं आपला मुद्दा लोकांना पटवून देता येतो. त्यामुळे कर्तृत्वशून्य राजकारणीही अध्यक्षपदाची अभिलाषा बाळगू शकतो.


या देशातील अध्यक्षीय निवडणुकीची प्रक्रिया वेळखाऊ, खर्चिक व कष्टप्रद असते. महाराष्ट्रातल्या निवडणुका दोन आठवड्यांच्या प्रचारानंतर संपल्यादेखील. सापानं कात टाकावी एवढ्या त्वरेनं जागावाटपासाठी भांडणं झालीत. निवडणुका आल्या आणि ही वावटळ निघून गेली. आपल्या देशात दावेदार निवडून येत नाही तर पक्ष निवडून येतो. म्हणजे मृतदेह उभा केला तरी पक्षामुळे तो निवडून येऊ शकेल. अमेरिकेत पक्षनिष्ठेपेक्षा व्यक्तीवर जास्त भर देण्यात येतो. वर्षानुवर्षे पूर्वतयारी करावी लागते. त्यासाठी ज्या पायाभूत सुविधा लागतात त्या उभारण्यासाठी बराच वेळ, कष्ट, पैसा व व्यवस्थापनचातुर्य लागतं. पगारी सेवक, सल्लागार तर ठेवावे लागतातच पण जाहिरातीसाठी लागणारा प्रचंड पैसा उभा करावा लागतो. तो चाहत्यांकडून गोळा करण्यात येतो. या देशात निवडणुकांसाठी सरकार एक पैसाही (म्हणजे सेंटही) देत नाही. त्यामुळे चाहत्यांनी मूठ सैल सोडली नाही तर दावेदार यशस्वी होत नाही. नाही तर स्वत:च्या खिशातून पैसे लावावे लागतात. ट्रंपनी तसंच केलं. सर्वसामान्य राजकारणी जनसेवेचं सोंग करून अब्जाधीश होण्याचा प्रयत्न करतो तर ट्रंपसारखे अगोदरच लक्ष्मीधारक असतात. पण ते फार विरळाच. कुणा एका घटकाचा निवडणुकीवर अवाजवी प्रभाव पडू नये म्हणून सरकारनं प्रत्येकाच्या योगदानावर मर्यादा घातल्या आहेत. कुठलीही व्यक्ती प्राथमिक चाचणीसाठी तीन हजार दोनशे डॉलर व अंतिम निवडणुकीसाठी तेवढीच मदत करू शकते, पण या नियमाला चाळणीत भोकं असतात त्यापेक्षा जास्त पळवाटा आहेत.

अध्यक्षीय पदासाठी अनेक दावेदार रिंगणात उतरतात. मग त्यातून निवड कशी करणार? भारतात जी तिकिटं वाटण्याची प्रथा आहे ती अमेरिकेत नाही. त्यासाठी पक्षश्रेष्ठीऐवजी जनता दावेदारांची निवड करते. हे अर्थातच केव्हाही लोकशाहीवादी. प्रत्येक राज्यात प्राथमिक चाचण्या फेब्रुवारी २०२० मध्ये सुरू होऊन जूनमध्ये संपतील. सगळ्या प्रांतांना त्यांच्या लोकसंख्येनुसार ठराविक प्रतिनिधी संख्या देण्यात आली. सध्याच्या नियमानुसार त्यासाठी कमीत कमी १५ टक्के मतं पदरात पडणं आवश्यक असतं. त्यापेक्षा कमी मतं मिळणाऱ्यांना घरी जावं लागतं. जे नशीबवान ठरतात त्यांच्यामध्ये मतप्राप्तीनुसार प्रतिनिधी वाटण्यात येतात. शेवटी ज्या दावेदाराला बहुमत मिळतं त्याचं डेमॉक्रॅटिक पक्षासाठी मिलवॉकी, विस्कॉन्सीन येथे मोठ्या अधिवेशनात धुमधडाक्यानं (पोकळ) भाषणांच्या वर्षावात जुलैमध्ये पदारोहण होऊन त्याला ट्रंपबरोबर अंतिम फेरीत चुरस करण्याची संधी मिळेल. हे अधिवेशन कधी-कधी बरंच नाट्यमय होऊ शकतं कारण अनेकांत मतं वाटली

गेल्यामुळे कुणालाच बहुसंख्य प्रतिनिधी मिळत नाही. मग घोडेबाजार सुरू होतो. तो एखाद्या कादंबरीप्रमाणे उत्कंठावर्धक असतो.

रिपब्लिकन पक्षही स्थूलपणे आपला दावेदार तसाच निवडतो. पण यावेळी त्यात मुळीच नाट्य व उत्कंठा नाही कारण त्याचं नामांकन ट्रंपला मिळणार हे नक्की.

रिपब्लिकन पक्षाचे ९४ टक्के मतदार त्यांच्या पाठीशी आहेत. म्हणून सर्वांचं लक्ष सध्या डेमॉक्रॅटिक पक्षाचं (म्हणजे आपला काँग्रेस पक्ष) नामांकन कुणाला मिळणार इकडे वळलेलं आहे. त्यासाठी सुमारे दोन डझन दावेदार रिंगणात उतरले. यात ६ महिला, दोन कृष्णवर्णीय, एक समलिंगी नगरपालक, एक भारतीय वंशाची (कमला हॅरिस) व एक हिंदू धर्माची (तुलसी गॅबर्ड) अशा इच्छुकांचा समावेश होतो. पण आता ऑक्टोबर २०१९ ला त्यातले निम्मे गळून पडले. उरलेल्या १२ दावेदारांत फक्त तिघांना विविध सर्वेक्षणात १५ टक्केपेक्षा जास्त मतं मिळाली. निवडणुकीसाठी त्यांनी सर्वाधिक पैसा गोळा केला. त्यामुळे ते प्राथमिक चाचणीत शेवटपर्यंत टिकतील असं वाटतं. उरलेल्यांना कचऱ्याच्या ढिगात फेकण्यात येईल. त्यात सिनेटर कमला हॅरिस (तिची आई भारतीय व वडील जमेकातले कृष्णवर्णीय) व तुलसी गॅबर्डचा समावेश होतो. अजून त्यांनी माघार घेतली नसली तरी सर्वेक्षणात त्यांना फार कमी मतं मिळतात. कमलाला ५-६ टक्के तर तुलसीला १ टक्केच्या आसपास. म्हणून सध्या ज्या तीन दावेदारांना प्रत्येकी १५ टक्के पेक्षा जास्त मतं मिळतात त्यांच्यावर प्रकाश टाकणं औत्सुक्याचे ठरेल.


ज्यो बायडन

त्यातला महत्त्वाचा दावेदार म्हणजे ओबामाच्या कारकीर्दीत ८ वर्षे उपाध्यक्षाचं काम केलेले ७७ वर्षीय ज्यो बायडन. त्यापूर्वी ते डेलावेअर या बोटावर नव्हे तर नखावर मावणाऱ्या राज्याचे ३० वर्षे सिनेटर होते. याप्रमाणे त्यांनी सर्व आयुष्य राजकारणात खर्च केलं. हे त्यांना आता भोवत आहे. ते सध्या भ्रष्टाचाराच्या भोवऱ्यात अडकले आहेत. उपाध्यक्ष असताना युक्रेन व चीन या देशांवर प्रभाव पाडून आपल्या दारुड्या व अमली पदार्थांच्या आहारी जाण्याची सवय असलेल्या मुलाला (हंटर बायडन) श्रीमंत केलं असा त्यांच्यावर आरोप आहे. कार्तिक चिदंबरम वडील अर्थमंत्री असताना कसा लक्ष्मीधारक झाला हे जर माहीत असेल तर बायडनचं प्रकरण कळल्यास मुळीच वेळ लागणार नाही. अर्थातच उपाध्यक्ष हे आरोप नाकारतात. पण त्याविषयी सध्या चौकशा सुरू आहेत.

आरोग्य स्वास्थ्यही त्यांना अनुकूल नाही. त्यांना मेंदूच्या कर्करोगाच्या रक्तदाबाचा आजार आहे. पण तो आटोक्यात आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे ते बुद्धिभ्रंश झाल्याची लक्षणं जगाला दाखवतात. आपली उपाध्यक्षपदाची मुदत केव्हा संपली ते त्यांना आठवत नाही. त्यांना स्थलकालाचं विस्मरण पडतं. प्रचारसभेच्या थकव्यामुळे त्यांची बुद्धी क्षीण होते असं समजून त्यांच्या सल्लागारांनी बायडनला जवळजवळ बंदिस्त केलं. ते आता मोजक्या प्रचार सभा भरवतात व तिथे लिहून दिलेली भाषणं वाचतात. अवांतर बोलण्याची त्यांच्यावर बंदी घालण्यात आली असून वार्ताहरांच्या संवेदनशील प्रश्नाकडे ते पाठ फिरवतात किंवा त्याला बगल देतात.

अध्यक्षपदाच्या शोधाची ही बायडनची पहिली खेप नाही. पहिल्या पाळीत मतदारांचा प्रतिकूल प्रतिसाद मिळाला नाही म्हणून त्यांनी लवकरच माघार घेतली तर दुसऱ्या खेपेला २००८ मध्ये एका ब्रिटिश राजकारण्याचं भाषण चोरून ते जसंच्या तसं श्रेय देण्याच्या भानगडीत न पडता ठोकलं. ते उघडकीस येताच त्यांनी काढता पाय घेतला. आता तिसरी खेप लढताना ते निराळ्याच वादात सापडले. बराक ओबामांनी त्यांना अजून पाठिंबा दिला नाही हे फार बोलकं आहे. किंबहुना त्यांना त्यांचे लफडे व कोनाड्यात बासनात गुंडाळून ठेवलेली प्रकरणं चांगली ठाऊक असल्यामुळे काळ्या अध्यक्षांनी बायडनला निवडणुकीच्या भानगडीत पुन्हा पडू नको असा पडद्यामागे सल्ला दिला असं म्हणतात.

असं असूनही सर्वेक्षणात त्यांचा सध्या पहिला किंवा दुसरा नंबर लागतो. त्यांच्या चाहत्यांनी त्यांना बऱ्यापैकी पाठिंबा दिला. जून २०१९ च्या तिमाहीत त्यांनी त्यांना २२ दशलक्ष डॉलर दिले. सप्टेंबर तिमाहीत १५ दशलक्ष पाठवले. मतमोजणीत त्यांची लोकप्रियताही कमी झाली. हे क्षितिजावरचं वादळ की प्रासंगिक घोळ हे सध्या सांगणं कठीण आहे.

दुसरा दावेदार म्हणजे व्हरमॉट या बिमारू राज्याचे ७८ वर्षीय सिनेटर बर्नी सँडर्स. त्यांनीही सर्व आयुष्य राजकारणात खर्च करून लांब राजपुच्छ (Politied Tail) निर्माण केलं. पण तिकडे अजून कुणी लक्ष दिलं नाही. ते स्वत:ला लोकशाहीवादी समाजवादी समजतात. पण वास्तवात ते साम्यवादी आहेत. तो शब्द अमेरिकेत निषिद्ध समजला जात असल्यामुळे दुसरी गोंडस राज्यप्रणाली निवडली. पण त्यांच्या कृतीतून साम्यवाद प्रकट होतो. त्यांना एकेकाळी लक्षाधीश व अब्जाधीशांवर रोष असे, पण पुस्तक लिहून लक्षाधीश व २-३ घरांचे मालक झाल्यावर त्यांनी त्या संपत्तीधारकांवर आग पाखडणं बंद केलं. परशुरामानं क्षत्रिय वर्ण नष्ट करण्याचा विडा उचलला होता तसं त्यांना आता अब्जाधीशांची तमाम जात नामशेष करायची आहे. त्यासाठी संपत्ती कर, उत्पन्न कर व वॉल स्ट्रीटवरील व्यवहारकर यांची कुऱ्हाड वापरणार आहेत. बिल गेट्सला त्यांनी सुचवलेले कर लागू केले असते तर त्याची १०४ अब्ज डॉलरची संपत्ती आज ८० टक्क्यांनी घसरली असती असं म्हणतात.


या कररूपी उत्पन्नाचा उपयोग आपण मध्यमवर्गीयांसाठी व गरिबांसाठी आखलेल्या कल्याणकारी योजनांसाठी करू असं ते म्हणतात. त्यातल्या ३ योजना उल्लेखनीय आहेत. एक म्हणजे विद्यार्थ्यांचं शैक्षणिक कर्ज माफ करणं. सध्या त्यांच्या डोक्यावर सरासरी ३७,००० डॉलर (२६ लाख रु.) कर्ज असून सामूहिक ऋण

१.६१ ट्रिलियन डॉलर आहे. तरुण पिढीला ते का आवडतात याचं हे एक कारण आहे. यात आणि शेतकर्ज माफ करणाऱ्या आपल्या राजकारण्यांत काही एक फरक नाही.

त्यांची दुसरी योजना म्हणजे सार्वत्रिक व सर्वसमावेशक आरोग्य विमा. ती सुविधा या देशात राहणाऱ्या २७ अवैध स्थलांतरितांना द्यावी असं औदार्य ते दाखवतात. त्याचा खर्च दरवर्षी ३ ट्रिलियन डॉलर. म्हणजे संपत्ती कर लादून होणाऱ्या उत्पन्नापेक्षा ९ पट जास्त. पण या १२ शून्यधारी आकड्याची त्यांना भीती वाटत नाही. त्यासाठी सर्वसामान्यांच्या खिशात हात घालून त्यांचे कर वाढवावे लागतील हे ते प्रांजळपणे कबूल करतात. समाजवाद्यांना दुसऱ्याच्या पैशावर जगण्याची सवय असल्यामुळे आपल्याला तो भार सहन करावा लागेल हे कळताच त्यांची लोकप्रियता घटली.

तिसरी भव्य योजना म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास रोखून त्याचं रक्षण नव्हे तर संवर्धन करणं. म्हणजे जीवाष्म इंधन बाद करून सौर, पवन व जल विद्युत वापरणं. आजची वाहनं, विमानं व रेल्वेसारखे परिवहनाचे स्रोत बंद करणं. त्यासाठी दरवर्षी अंदाजित ३ ट्रिलियन डॉलर खर्च येईल. याप्रमाणे त्यांच्या सर्व ट्रिलियन्सची बेरीज केली तर संगणकाला खोकला व मतदारांना भोवळ येईल. असं असूनही त्यांच्या प्रामुख्यानं तरुण पिढीच्या चाहत्यांनी सप्टेंबरच्या तिमाहीत २५ दशलक्ष डॉलरची मदत केली. एवढी रक्कम दुसऱ्या कुणीच जमा केली नाही. दुर्दैव असं की हे लिहीत असताना (ऑक्टोबर ६, २०१९) त्यांना हृदयचा झटका आला व तीन दिवस दवाखान्यात भरती करावं लागलं. अमेरिकेचं अध्यक्षपद सर्वाधिक तणाव व दबावग्रस्त असल्यामुळे तो ताण त्यांचं दुर्बल हृदय किती सहन करू शकेल हा प्रश्न आहे.

या उच्च गटात मोडणारी तिसरी दावेदारीण म्हणजे मॅसॅच्युसेट या डाव्या राज्यातून निवडून आलेली ७० वर्षीय सिनेटर एलिझाबेथ वॉरन. तिचं व बनी सँडसेचं धोरण एवढं जुळतं की त्यांना बहीण–भाऊ समजावं लागेल. तिलासुद्धा सँडर्सपेक्षा सवाईनं करवाढ करून त्याच योजना राबवायच्या आहेत. याचा अमेरिकेच्या अर्थकारणावर व पर्यायानं त्याच्या जागतिक स्थानावर काय परिणाम होईल याचा एकतर गंध नाही नाहीतर क्षिती नाही. त्यामुळे चीनला अमेरिकेवर कुरघोडी करण्यास मुळीच अडचण येणार नाही कारण या धोरणामुळे देशाचं अर्थकारण अतिमंदीत जाईल.



**एलिझाबेथ वॉरन**

वॉरन स्वत:ला अमेरिकन इंडियन्स या जातीची वारसदार समजे. अशा अल्पसंख्यांकांना भारतात मागास जातींसाठी आहेत तशा अनेक सवलती राखून ठेवलेल्या आहेत. त्या भरवशावर तिला हार्वर्डमध्ये विधी प्रोफेसरचं पद मिळालं. पण अलीकडेच केलेल्या डीएनए चाचणीवरून तिच्यात त्या जातीच्या रक्ताचा एकही थेंब नाही असं आढळून आलं आणि तिला खऱ्या इंडियन्सची प्रतारणा केली म्हणून शरमेनं मान तुकवावी लागली.

शेवटी नामांकन झाल्यावर त्यांना ट्रंपविरुद्ध जनतेसमोर जावं लागेल. डेमॉक्रॅटिक पक्ष डावा नसून मध्याच्या डावीकडे आहे. रिपब्लिकन पक्ष आपल्या भाजपप्रमाणे मध्याच्या उजवीकडे. त्यामुळे या डाव्या दावेदारांचं सर्वसामान्यांशी सूत कसं जमेल हा प्रश्न आहे.

आता अमेरिकेत मतदान करण्याचा हक्क असेल तर तुम्ही कोणाला मत द्याल?


**– डॉ. अनंत लाभसेटवार**

**लेखक, माजी अध्यक्ष–फर्स्ट नॅशनल बँक आणि**

**ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका**

anantlabh@gmail.com



॥ग्रंथाली॥✲॥




# सुमद्राचं गाव

**आरती कुलकर्णी**

आरतीच्या कवितांमध्ये तसा सार्वजनिक जीवनात आता दुर्मिळ असणारा निरागस भाव, एखाद्या बालकाची सतत उत्सुकता आपल्यालाला भेटत राहते. कवितांच्या रूपातून आरतीनं केलेली ही निसर्गाची 'आरती' सर्वांनाच विलक्षण आणि प्रतिभाशाली शांतता देईल! **– अविनाश धर्माधिकारी**

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# नोबेलनगरी २०१९




**सुधीर थत्ते / नंदिनी थत्ते**

नोबेल पुरस्कार विजेत्या शोधांची यथार्थ वैज्ञानिक माहिती देणारा चोवीस वर्षे चालेलला जगातील एकमेव उपक्रम. सर्वोत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीसाठी राज्यशासनाचा तीन वेळा पुरस्कार. लोकांपर्यंत विज्ञान नेण्याचा अभिनव उपक्रम – खुद्द नोबेल विजेत्यांचा अभिप्राय.

**मूल्य १०० रुपये सवलतीत ६० रुपये**

# आदर्शवादी संस्थाचे पुनर्जीवन राष्ट्र सेवा दलाचा महत्वाकांक्षी प्रकल्प

**अभिजित हेगशेट्ये**

**एका नाविन्यपूर्ण प्रकल्पाचा संपर्कप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळताना जाणवणारे भारतातील शिक्षणाचे अस्वस्थ करणारे प्रश्न अंतर्मुख करणारे आहेत...**

राष्ट्र सेवादलाच्या स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या प्रदीर्घ वाटचालीत सेवादलाच्या मूल्य विचारांनी काम करणाऱ्या तसेच महात्मा गांधी, महात्मा फुले, साने गुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस. एम. जोशी या सारख्या विचारवंतांच्या प्रेरणेने अनेक कर्तृत्ववान व्यक्तींनी विविध ठिकाणी विचार सिंचनाच्या उद्देशाने विविध शिक्षण संस्था, वसतिगृहे, पाळणाघरे, सार्वजनिक वाचनालये आदी संस्थांची निर्मिती केली. सेवादलाचा विचार आणि कार्याच्या मुशीतून उभ्या राहिलेल्या या संस्थांना राष्ट्र सेवादलाच्या कार्याशी जोडून घेणे फार महत्त्वाचे आहे. यातील अनेक संस्था या बदलता काळ आणि आवश्यक संसाधनाची आवश्यक उपलब्धता नसल्यामुळे अस्तित्वाची कसरत करत आहेत. या साऱ्या ध्येयवादी संस्थाचे (रिव्हायटलायझेशन) पुनर्जीवन करण्याचा महत्वाकांशी प्रकल्प सेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गणेश देवी यांच्या संकल्पनेतून आकार घेत आहे. महाराष्ट्रातील अशा आठशेपेक्षा अधिक संस्था असून येत्या वर्षात किमान ५० संस्थांच्या पुनरुज्जीवन प्रकल्पाचे नियोजन काम सेवादलाच्या माध्यमातून हाती घेण्यात येत आहे.

स्वातंत्र्य चळवळीच्या त्या मंतरलेल्या दिवसात ध्येयवादाने, झपाटलेल्या तरुणाईला मूल्याधिष्ठित पुरोगामी चळवळीचा आकार आणि संस्कार देण्यासाठी स्थापन झालेल्या राष्ट्र सेवादलाने संघटन, संघर्ष आणि रचनात्मक कामाचा अजेंडा ठरविला. या संघर्षमय वातावरणात राज्यातील अनेक भागात अनेक राष्ट्र सेवादल कार्यकर्त्यांनी आणि पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी रचनात्मक कामाचा ध्यास घेत महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' या संदेशाने ग्रामीण जीवन जाणीवपूर्वक स्वीकारले, यातील अनेक कार्यकर्त्यांनी विविध शैक्षणिक आणि अन्य संस्थांच्या माध्यमातून रचनात्मक कामाची उभारणी केली. अशा शेकडो संस्था राज्यात उभ्या राहिल्या. या प्रत्येक संस्थेची उभारणी करताना तिच्या संस्थापकांनी अनेक प्रकारे त्याग, दूरदृष्टी, आणि नेतृत्व याचे अद्भुत संमिश्रण उपयोगात आणले. या संस्थानी आपले शैक्षणिक कार्याचा विस्तार करतानाच आपापल्या कार्यक्षेत्रात नोंदपात्र योगदान केले आहे. राष्ट्र सेवादलाशी सबंध असलेल्या किंवा सेवादलासारखे उद्देश असणाऱ्या केवळ महाराष्ट्रातील अशा संस्थांची संख्या आठशेपेक्षा अधिक आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या संस्था उभारल्या गेल्या आहेत. आजच्या शिक्षणातील व्यापारीकरणाचा चढता आलेख पाहिल्यास सध्याच्या विद्यार्थ्यांना याचा अंदाज करता येणेही कठीण आहे. लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षता, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता, विज्ञाननिष्ठा हा विचार आपल्या पुढच्या पिढीला समजावा यासाठी स्वातंत्र्य चळवळीनंतरही अनेक कार्यकर्त्यांनी आपले जीवन या प्रशिक्षणाच्या कार्यासाठी झोकून दिले. यातून समृद्ध विचारांच्या अनेक पिढ्या उभया राहिल्या. आज राज्यातील राजकारणात आणि सामाजिक क्षेत्रात भ्रष्टाचाराची बजबजपुरी माजली असतानाही काही आशेची आणि प्रकाशाची बेटे दिसतात, ती याच त्यागाच्या आणि मूल्याधिष्ठित सिंचनाच्या योगदानातून.गावागावातून एक एक वासा जमवून, एक एक चिरा जमवून, तर कधी पैसा-पैसा फंड उभारत या संस्था उभारतांना शेकडो कुटुंबांनी आपले सुख पणाला लावले. काहींनी तर पत्नीचे दाग-दागिने घर-दार पणाला लावल्याच्या कथा, या उभारल्या शिक्षणाच्या संस्थांच्या मागे एक इतिहास म्हणून उभ्या आहेत. आज सारे संदर्भ बदलले आहेत.या अद्ययावत स्पर्धेत आणि शासनाच्या शाळा बंद धोरणासमोर ह्या ध्येय निष्ठेने उभ्या राहिलेल्या आदर्शवादी संस्था तग धरू शकत नाहीत. याची जाणीव प्रकर्षाने होत आहे. मात्र त्याची नोंद नव्याने राष्ट्र सेवादलाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेतलेल्या डॉ. गणेश देवी यांना झाली. लोकशाही पुरोगामी विचारांचा वसा अखंड, प्रसंगी सारे अस्तित्व पणाला लावून वाहणाऱ्या ह्या संस्था आज त्यांच्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत. यावेळी त्यांना हिंमत आणि आधार देण्याची खरी गरज आहे. याचे अचूक भान डॉ. देवी यांनी ओळखले. हा आधार फक्त त्या संस्थेला नाही, तर तो आधार सेवा दलाच्या वैचारिक उत्थापनाला आहे. समाजातील वैचारिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे केंद्रच शाळा आणि तेथील मुले आहेत. सानेगुरुजींचा 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या शाळातील मुलांपर्यंत पोहोचणे हे मुख्य काम आहे. आपणाला हाच विचार या माध्यमातून पुढे न्यायचा आहे. त्याच्याच पुनर्जीवनाची ही सुरवात आहे.

या साऱ्या संस्था सुदृढ स्थितीत असणे हे नव्या पिढीतील





किशोर आणि युवकांच्या हिताचे आहे. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्याही दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. या साधया संस्था उत्तम  स्थितीत टिकवून ठेवणे ही राष्ट्र सेवादलाची प्राथमिक जबाबदारी असल्याचा विचार डॉ. गणेश देवी मांडतात. या विशेष प्रकल्पासाठी नवी टीम उभारताना  डॉ. गणेश देवी यांनी आयआयटी मुंबई येथील तज्ज्ञ प्रोफेशनल्स आणि आर्किटेक्चर क्षेत्रातील काही नव्या पिढीच्या आर्किटेक्टना निमंत्रित केले आहे. महाराष्ट्रातील अशा संस्था आणि शाळांना प्रत्यक्ष आर्किटेक्ट टीम भेट देते, या जुन्या स्ट्रक्चरची पहाणी करते, त्याचा पहाणी अहवाल तयार होऊन, या संस्थेचा कॅम्पस सुधारणे बाबतचा रिपोर्ट तयार करणे, या सोबतच त्या शाळेच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून पुढील २५-३० वर्षांचा दीर्घकालीन मास्टर प्लॅन बाबत विचार करणे. असा आराखडा आहे.

१७ नोव्हेंबर २०१९ पासून या प्रकल्पाला प्रत्यक्षात सुरवात झाली आहे. या प्रकल्पाचा संपर्कप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळतांना येणारे अनुभव विलक्षण आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रश्न नव्याने अधोरेखित करणारे आहेत. कोल्हापूरच्या 'माझी शाळे'ला आम्ही भेट दिली. १९४९ साली स्थापन झालेली ही शाळा सुसंस्कार शिक्षण मंडळ या संस्थेतर्फे मिरासाहेब  मगदूम अत्यंत उत्साहाने आणि नेटाने सानेगुरुजींचा विचार घेऊन फार मोठ्या प्रतिकुल परिस्थितीत चालवित आहेत. कदमवाडीत फक्त तीन गुंठ्यात बसलेली ही शाळेची इमारत, रस्त्याच्या पलीकडे महापालिकेने भाड्याने दिलेले मैदान, अशा परिस्थितीतही येथील शिक्षकांचे विद्यार्थ्यांसाठी असणारी आपलेपणा, योगदान आणि मनापासूनची धडपड त्यामुळेच आजच्या मराठी शाळांच्या घसरत्या टक्क्यातही ही शाळा १०५२ चा पट राखून आहे. खऱ्या अर्थाने कष्टकरी आणि श्रमणाऱ्या मुलांची ही शाळा आहे. येथे मोलमजुरी, हमाली करणारी, शेतकरी कुटुंबातील अत्यंत गरीब मुले येतात. येथील शिक्षक प्रत्येक मुलासाठी मेहनत घेतात. एकही मूल अप्रगत रहाणार नाही याची काळजी घेतली जाते. सप्ताहाचे नियोजन आणि दररोज आदर्श विचार देणारी प्रार्थना, ही या शाळेची वैशिष्ट्ये येथील मुलांना शाळा व्यतिरिक्त कोणतीच शिकवणी नसतानाही स्कॉलरशिप आणि पहिल्या दहात येणाऱ्या मुलांचे प्रमाण मोठे आहे. मात्र शासनाचे अनुदान फक्त पगाराव्यतिरिक्त मिळत नाही. येथील गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षक पैसे काढून पुस्तके व इतर अत्यावश्यक साधने पुरवतात. मात्र आर्थिक ताकद नसल्याने अद्ययावत शिक्षणाच्या पद्धती, कॉम्प्यूटर, तसेच उत्तम टॉयलेट आणि वर्गातंर्गत अद्ययावत सुविधा आणण्यात संस्था अपुरी पडते.

या दौऱ्यातील आणखी एक महत्त्वाची शाळा होती गडहिंग्लजची 'साधना स्कूल' या शाळेचे संस्थापक प्रा. बारदेजर यांचे शिक्षण मुंबईत सेंट झेविअर्स या उच्चभ्रू शाळेत झाले. आपल्या गावातही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करावी असे स्वप्न घेऊन त्यांनी १९६२ मध्ये गडहिंग्लजमध्ये 'साधना स्कूल' सुरू केली. इंग्रजी माध्यमाची १०० टक्के अनुदानित असलेली ही शाळा सद्य काळात दुर्गमच आहे. प्रशस्त जागा, पटसंख्याही मोठी, या परिसरात या शाळेचे नावही फार मोठे आहे. एक फार मोठा शिक्षणाचा इतिहास या शाळेला आहे. येथील माजी आमदार श्रीपतराव शिंदे हे अनेक वर्षे या संस्थेचे अध्यक्ष होते. हॉस्टेल सुविधा, कॉम्प्यूटर लॅब, विविध प्रकारचे व्होकेशनल कोर्स, एटीडी आर्ट कॉलेज असा मोठा विस्तार संस्थेचा आहे. अनेक इमारती एकमेकाला जोडून आहेत. येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्गही अगदी झोकून देऊन काम करणारा आहे. अनेक माजी विद्यार्थी देश परदेशात उच्चपदस्थ आहेत. स्वतंत्र वीस एकर जागा संस्थेच्या विस्तारीकरणासाठी उपलब्ध आहे. तसे काहीच कमी नाही. मात्र प्रा. बारदेजर आणि येथील मुख्याध्यापकांशी चर्चा करतांना जाणवले की, साऱ्या सुविधा असतानाही अद्यायवत नव्या शिक्षणाच्या प्रवाहाशी स्पर्धेत आपण टिकू का? अशी भीती त्यांना वाटत रहाते, शेजारी इंटरनॅशनल शाळा उभ्या रहात असतात. संस्थेला स्पर्धेत राहाणे शक्य होईल काय, अशी धास्ती रहाते. यातील प्रामुख्याने जाणवलेल्या कमतरता म्हणजे विपुल जागा असतानाही संस्थेने आर्किटेक्टकडून मास्टर प्लॅन कधी केला नाही. जागेचे उत्तम सौंदर्यीकरण होऊ शकते! नव तंत्रज्ञान आणावयाचे म्हणजे नक्की काय करायचे? याचे अद्ययावत मार्गदर्शन आणि शिक्षण क्षेत्रातील अद्ययावतता याचे पाठबळ याची त्यांना नितांत गरज जाणवली. निधी उभारणे हे त्यांच्यासाठी फार मोठी बाब नव्हती!  मात्र तंत्रज्ञानाच्या पाठबळाच्या जणू ते शोधात होते. हे सारे प्रवाह सेवादलाच्या कामाशी, विचारांशी आणि संघटनेशी जोडून घेण्याचा हा प्रयत्न आहे.

या सोबतच आज शिक्षणाच्या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानाचा प्रवाह या ग्रामीण दुर्गम भागातील शाळांना जोडून घेण्यासाठी खास आयआयटी तज्ज्ञांची टीम या शाळेला भेट देते. शाळेतील शिक्षणाचा

दर्जा वाढविणे तसेच गाव, शहर आणि परिसराला सोबत जोडून घेणे याचा अभयास करून हे आयआयटीअन्स एक मार्गदर्शक प्लॅन तयार करून देतील. ज्यामुळे शाळेच्या गुणात्मक आणि दर्जात्मक वाढ होणे शक्य होईल.

सेवादलाच्या या 'ध्येयवादी संस्थाचे पुनर्जीवन' हा फार मोठा प्रकल्प आहे. पुढील किमान ५ वर्षाच्या कालावधीत त्याचे काम सुरु रहाणार आहे. या प्रकल्पात या संस्थांचे सबलीकरण आणि पुनर्जीवन करतांना संस्थेच्या कोणत्याही आर्थिक आयोजनाला धक्का लागणार नाही. तसेच यासाठी लागणारा  निधी हा सेवादल नागरिक सहभागाने खास निधी उभा करण्याचे नियोजन आहे. त्याचबरोबर विविध संस्थांनी त्याकामी हातभार लावावा हेही अपेक्षित आहे. त्यामुळे त्याचा थेट भार या लाभार्थी संस्थानवर पडणार नाही. मात्र यातील संस्थांचा बदलासाठीचा सकारात्मक सहभाग फार महत्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पातील वैशिष्ट्य म्हणजे ओम, आशिष, हेमंत, विद्याधर हे मुंबई आयाआयटीतून उत्तीर्ण विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात काम करणारे, एक सामाजिक कार्य म्हणून आपला वेळ देणार आहेत. तर हरीप्रिया, प्रतीक, रक्षदा हीआर्किटेक्ट टीम ही सामाजिक भावनेने आपली  सेवा या प्रकल्पासाठी देणार आहेत. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात असणारी आजची तरुणाई शालेय स्तरावर वळून मागे पहात आहे. ती आपले योगदान उद्याच्या पिढीसाठी देऊ इच्छित आहे. ही नाविन्यपूर्ण बौद्धिक योगदान शालेय पातळीवरील नव्या क्रांतीकारक बदलाचे संकेत देणारे ठरणार आहे. या माध्यमातून येत्या काही वर्षात यापैकी बऱ्याच संस्था आपापल्या क्षेत्रात राज्यातील उत्कृष्ट संस्था म्हणून ख्याती मिळवतील. ज्या योगे राष्ट्र सेवा दलाचे आणि या साध्या संस्थांचे सामाजिक आणि सांस्कृतिक उद्दिष्ट पूर्ण होण्यास काही अंशी हातभार लागेल.


डॉ. सुरेखा देवी यांनी या शाळांतील प्रयोगशाळा अद्ययावत करण्याबाबत महत्त्वाच्या सूचना केल्या आणि त्याचे आजच्या काळातील महत्त्व विषद केले. शाळातील प्रयोगशाळा विकसित होणे हे फार महत्त्वाचे आहे. ज्ञान आणि संशोधनाची आवड आणि गोडी शालेय वयात लागणे ही या शाळांसाठी मोठी जमेची बाजू ठरू शकते.

राष्ट्र सेवा दलाच्या या 'रिव्हायलायझेशन ऑफ आयडियालिस्ट इन्स्टिट्यूशन्स' या प्रकल्पात सहभाग घेण्यासाठी संबधित संस्थांनी आपल्या संस्थेच्या माहितीसह प्रकल्प निमंत्रक अभिजित हेगशेट्ये Email - abhijit.shriram@gmail.com व अतुल देशमुख Email - atulddeshmukh33@gmail.com (राष्ट्रीय महासचिव राष्ट्रसेवादल) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन या निमित्ताने करत आहे.


**– अभिजित हेगशेट्ये**
प्रकल्प समन्वयक
ध्येयासक्त संस्थांचे पुनरुज्जीवन
प्रकल्प राष्ट्रसेवादल
भ्रमणध्वनी : ९४२२०५२३१४
abhijit.shriram@gmail.com



ग्रंथाली




# आवासचे दिवस

मूळ लेखक
**बनी रुबन**

अनुवाद/संपादन
**नीला वसंत उपाध्ये**

भूतकाळात जमा झालेल्या तरुणाईच्या विश्वातील संवेदनशील व ओढाळ कथा. जो कोणी कधीच विसरू शकत नाही, त्या तुमच्या तरुणाईच्या गहिऱ्या विश्वाची काव्यात्म, शृंगारिक तपशिलांसह पुनर्निर्मिती.

**मूल्य ३५० रुपये    सवलतीत २१० रुपये**

# सहिष्णुतेचे बांधकाम




डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

इतरांच्या न्याय हक्कांची बिनदिक्कत पायमल्ली करून त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची, त्यांचा बदला घेण्याची भाषा बोलणारे राजकारण हे सहिष्णुतेचे बांधकाम रोखून धरण्यासाठीच सुनियोजितरीत्या योजलेले राजकारण आहे. सहिष्णुतेसारख्या एका अत्यंत संवेदनशील विषयाची विविध अंगांनी सखोल व मर्मग्राही मीमांसा करणारे एक संग्राह्य पुस्तक!

**मूल्य २५० रुपये    सवलतीत १५० रुपये**

ठाणे वाचकदिन

# कथा-अभिवाचनस्पर्धा (शालेय गट), ठाणे

ठाणे वाचकदिन




'ग्रंथाली' गेली पंचेचाळीस वर्षे वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपक्रम राबवीत आहे. महाराष्ट्रभर ग्रंथप्रसार, प्रचार आणि वाचक चळवळ, हे जणू ब्रीद जपल्यासारखे हे उपक्रम सुरू आहेत, अगदी अव्याहतपणे. 'ग्रंथाली वाचकदिन' हा या अनेक उपक्रमांपैकी एक उपक्रम. तोही गेली पंचेचाळीस वर्षे सुरू आहे, अखंड ज्ञानयज्ञ सुरू ठेवल्यासारखा. हा वाचकदिन मुंबई-ठाण्यासह अनेक ठिकाणी साजरा करण्यात आलेला आहे. त्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे.

'अभिवाचन' हा एक अभिनव उपक्रम वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी गेली चार वर्षे राबविण्यात येत आहे. यात महाविद्यालयीन विद्यार्थी आणि खुलागट असे दोन विभाग करण्यात आलेले आहेत. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून शालेय गटाचा समावेश मागील वर्षापासून करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना, म्हणजे सातवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, शालेय वाचनाव्यतिरिक्त इतर वाचनाकडे त्यांचा कल वळवावा, त्यात त्यांची रुची वाढविण्याचा प्रयत्न करावा, पाठ्यपुस्तकांसोबच अन्य पुस्तकांचा परीचय त्यांना व्हावा, अशी संकल्पना यात अंतर्भूत आहे. म्हणून गेली दोन वर्षे ठाणे येथे हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यासाठी ठाण्यातील १२६ वर्षांपासून जिद्दीने आणि एका निश्चित अशा ध्येयाने वाचन चळवळीचेच कार्य करीत असलेली संस्था नामांकित म्हणजे मराठी ग्रंथ संग्रहालय. सन १८९३ साली महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल. भावे यांनी स्थापन केलेल्या या संस्थेच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला. त्यामुळे ग्रंथाली आणि मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा शालेय गटासाठीचा अभिवाचनाचा उपक्रम मागील वर्षाप्रमाणेच याही वर्षी यशस्वीपणे ठाणे येथे पार पडला आहे.

यावर्षी 'ग्रंथाली'ने 'कथा' हा विषय अभिवाचनासाठी निश्चित केला होता. सातवी ते नववी असा शालेय गट ठरविण्यात आला. इंग्रजी व मराठी अशा दोन्ही माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली होती. त्यांच्याच अभ्यासक्रमात नेमण्यात आलेल्या क्रमिक मराठी पाठ्यपुस्तकातील कथा निवडावी असे स्वातंत्र्य देण्यात आले. प्रत्येकी पाच मिनिटांचा अवधी देण्यात आला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी ही त्या त्या शालेयस्तरावर घेण्यात आली. यातून प्रथम दोन विजेत्यांना अंतिमफेरीसाठी निवडण्यात आले. ही अंतिमफेरी दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे येथे घेण्यात आली.

अंतिम फेरीत दाखल झालेले विद्यार्थी हे मराठी, इंग्रजी अशा दोन्ही माध्यमातील होते. यात शहरातील नामांकित विद्यालयांसह महानगरपालिका, आदिवासी पाड्यावरील शाळेतील मिळून पन्नास विद्यार्थी सहभागी झाले होते. या प्रत्येक विद्यार्थ्यास





सहभागाचे प्रमाणपत्र आणि पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच अंतिम फेरीत विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांना रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

अंतिम फेरीतील विजेते-

वेदांत आपटे, ९ वी, वसंत विहार हायस्कूल, प्रथम पुरस्कार, रु. १००१/- अधिक प्रमाणपत्र

पूर्वा सावंत, ७वी, एसव्हीपीटी, घोडबंदर , द्वितीय पुरस्कार,






रु. ७५१/- अधिक प्रमाणपत्र
श्रेयस साळुंखे, ८वी, बेडेकर विद्यालय, तृतीय पुरस्कार,
रु. ५०१/- अधिक प्रमाणपत्र
साईराज परब, ९वी, सरस्वती सेकंडरी स्कूल, उत्तेजनार्थ पुरस्कार,
रु. २५१/- अधिक प्रमाणपत्र
आशिष रामगुडे, ७वी, ज्ञानप्रसारिणी विद्यालय, उत्तेजनार्थ पुरस्कार,
रु. २५१/- अधिक प्रमाणपत्र
स्वरांगी धारप, ८वी, संकल्प इंग्लिश स्कूल, उत्तेजनार्थ पुरस्कार,
रु.२५१/- अधिक प्रमाणपत्र

परीक्षक म्हणून सुनीता फडके, धनश्री करमरकर, मिलिंद सफई यांनी काम पाहिले.

'मराठी ग्रंथ संग्रहालया'चे अध्यक्ष, प्रा. विद्याधर वालावलकर, 'ग्रंथाली'चे विश्वस्त, सुदेश हिंगलासपूरकर, परीक्षकांच्या वतीने अभिनेते मिलिंद सफई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मराठी ग्रंथसंग्रहालयातील सर्व पदाधिकारी आणि सदस्य, सेवक यांनी सहकार्य केले. या सगळ्यांना मनापासून धन्यवाद! परीक्षक आणि स्पर्धेत सहभागी झालेले सर्व स्पर्धक, सहभागी विद्यालयांचे मुख्याद्यापक, शिक्षक व पालक यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**– चांगदेव काळे**
भ्रमणध्वनी : ९८६९२०७४०३
changdeokale12@gmail.com

**॥ग्रंथाली॥ ॥ वाचकदिन**

**४५ कथा-विशेष ४५**

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

# 'ग्रंथाली'चा कथाविशेष वाचकदिन संपन्न

'ग्रंथाली'ने दोन दिवसीय वाचकदिन २४ व २५ डिसेंबर रोजी कीर्ती महाविद्यालयाच्या पटांगणावर साजरा केला. या वाचकदिनाचा कथा केंद्रबिंदू असल्याने सर्व साहित्यिक कथेभोवती गुंफले गेले होते. डिसेंबर 'शब्द रुची' मासिकाचा कथेवर आधारित अंक चांगदेव काळे यांनी संपादित केलेला होता. वाचकदिननिमित्त महाविद्यालयीन गट आणि खुला गट अशा दोन विभागांत सांघिक कथा-अभिवाचन स्पर्धा आयोजित केली होती. यात तब्बल ९१ स्पर्धकांनी सहभाग घेतला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विनंती केल्यामुळे केवळ विद्यार्थ्यांसाठी एकल अभिवाचन स्पर्धा घेतली गेली. स्पर्धेची पहिली फेरी कीर्ती महाविद्यालयात दिनांक २२ डिसेंबर रोजी पार पडली व अंतिम फेरी २५ डिसेंबरच्या वाचकदिनी संपन्न झाली. याला जोडून यावर्षी 'कथाचित्र' या अभिनव स्पर्धेचे आयोजन Tag या संस्थेच्या सहकार्याने करण्यात आले होते. कथाकारांनी कथा वाचायच्या आणि त्यावर आधारित चित्र स्पर्धकांनी रेखाटायचे असे या स्पर्धेचे स्वरूप होते. या स्पर्धेसाठी तब्बल ३६ स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. यातील काही स्पर्धक तर महाराष्ट्राच्या बाहेरूनही आले होते ही विशेष बाब होय.

शालेय गटासाठी ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे यांच्या सहकार्याने शालेय पुस्तकातील कथा या विषयावर स्पर्धा घेण्यात आली.

गेल्या वर्षी अरविंद गोखले यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे केले गेले. त्याच्या सांगतेच्या निमित्ताने अरविंद गोखले यांच्या कथांवर आधारित दोन एकांकिका 'अमरहिंद मंडळ' यांच्या सहकार्याने, कीर्ती महाविद्यालय येथे सादर करण्यात आल्या. यापैकी 'वनवासी' या कथेचे नाट्यरूपांतर दत्ता सावंत यांनी केले होते तर दिग्दर्शन अमर सोलंकी यांचे होते आणि 'तुळजा ननावरे' या कथेचे नाट्यरूपांतर राजीव जोशी यांनी केले होते तर दिग्दर्शन अश्वजित सावंतफुले यांनी केले होते. श्रीमती नीला उपाध्ये यांनी गोखले यांच्या कथांवर आधारित 'कथाव्रती अरविंद गोखले' आणि 'अनवट निवडक गोखले' या दोन पुस्तकांचे संपादन करून, गोखले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वर्षभर गोखले यांच्या कथांवर आधारित विविध ठिकाणी वेगवेगळे उपक्रम, कार्यक्रम सादर केले. त्यांच्या या कार्याचा गौरव २४ डिसेंबर २०१९ या दिवशी कीर्ती महाविद्यालय येथे एकांकिकादरम्यान करण्यात आला.

२५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'कथावाचन आणि कथाचित्र रेखाटन' या कार्यक्रमांतर्गत दिलीप प्रभावळकर यांनी 'निवडक चिमणराव'चे वाचन केले आणि पुंडलिक वझे यांनी चित्र रेखाटले, मृणाल कुलकर्णी यांनी 'हसरे दु:ख'मधील भाग वाचला आणि रविमुकुल यांनी चित्र रेखाटले आणि उदय सबनीस यांनी 'छावा' या पुस्तकांतील काही भागाचे अभिवाचन केले तर विजयराज बोधनकर यांनी यासाठी चित्ररेखाटन केले. या कार्यक्रमात तीन कथासंग्रह प्रकाशित केले. त्यातील 'गंध आणि काटे' या चांगदेव काळे लिखित पुस्तकाचे प्रकाशन उदय सबनीस यांच्या हस्ते, 'तिसरा डुळा' या किरण येले लिखित वाचकांच्या हस्ते, 'अस्पृश्य देवता आणि निवडक कथा' या वसुधा सहस्रबुद्धे लिखित पुस्तकाचे प्रकाशन मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.



## ‘वनवासी’ आणि ‘तुळजा ननावरे’ या एकांकिकांचे सादरीकरण















# कथा-चित्रस्पर्धेची क्षणचित्रे
























**कीर्ती महाविद्यालयाच्या पटांगणावर २५ डिसेंबर रोजी वाचकदिनी जमलेला रसिकवर्ग**








२५ डिसेंबर हा ग्रंथालीचा वर्धापनदिन. या दिवशी कुमार सोहोनी लिखित 'शिदोरी (माझ्या नाट्य-चित्र प्रवासाची)' या पुस्तकाचे प्रकाशन दिलीप प्रभावळकरांच्या हस्ते झाले. यावेळी अभिराम भडकमकर आणि संजय जाधव वक्ते म्हणून उपस्थित होते.

'कानाला खडा' या कार्यक्रमात संजय मोने यांनी भारत सासणे, मोनिका गजेंद्रगडकर, शिल्पा कांबळे या कथाकारांबरोबर मुक्त संवाद साधत, कथा हा साहित्यप्रकार, कथा निर्माण होतानाची मानसिक अवस्था, वाचकप्रतिसाद, पुरस्कार, समीक्षा अशा विविध पैलूंवर खुसखुशीत चर्चा घडवून आणली. या कार्यक्रमात 'टिपंवणी' हे डॉ.सिसिलिया कार्व्हालो लिखित आत्मकथन भारत सासणे यांच्या हस्ते, 'अम्लान' हा योजना शिवानंद यांचा काव्यसंग्रह मोनिका गजेंद्रगडकर यांच्या हस्ते, 'समुद्राचं गाव' हा आरती कुलकर्णी लिखित काव्यसंग्रह संजय मोने यांच्या हस्ते, 'नोबेलनगरी २०१९' या नंदिनी थत्ते आणि सुधीर थत्ते लिखित पुस्तकांचे प्रकाशन शिल्पा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमानंतर अभिवाचनस्पर्धा, कथाचित्रस्पर्धा आणि कथापरीक्षणस्पर्धा यांचा पुरस्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत सुरू झाला. कथा-चित्रस्पर्धेत महाविद्यालयीन गटात आकाश चंद्रकांत पोतदार यांस प्रथम पारितोषिक, ओमकार दत्तात्रय गांवकर यांस द्वितीय पारितोषिक, ओंकार विलास रहाटे यांस तृतीय पारितोषिक देण्यात आले. खुल्या गटात भूषण बडमंजी यांना प्रथम पारितोषिक, कुडलैया हिरेमठ यांना द्वितीय पारितोषिक, महेश बोलायकर यांना तृतीय पारितोषिक यांना देण्यात आले. स्पर्धेस परीक्षक म्हणून दीपक घारे, मनोज आचार्य, विजयराज बोधनकर, किशोर नांदिवडेकर, सचिन गावकर होते. कथांचे वाचन वृंदा दाभोळकर, योगेश खांडेकर, राजश्री गढीकर, सुनीता फडके, धनश्री करमरकर, निर्मोही फडके, विशाल मेटे आणि सोनाली लोहार यांनी केले.

कथा-अभिवाचनस्पर्धा महाविद्यालयीन गटात समूह अभिवाचनात जान्हवी दरेकर, कराली म्हात्रे यांना उत्तेजनार्थ; ऋतुजा कांबळे, श्रद्धा माटल, साक्षी ठीक यांना द्वितीय पारितोषिक; कल्याणी नेवे, मधुरा लिमये यांना प्रथम पारितोषिक देण्यात आले. वैयक्तिकमध्ये स्वाती बढे उत्तेजनार्थ, नागेंद्र स्वामी द्वितीय पारितोषिक आणि मंजिरी पोखरकर यांना प्रथम पारितोषिक देण्यात आले. हा उपक्रम ठाणे आर्ट गिल्ड टॅग यांच्या सौजन्याने घेण्यात आला.

खुल्या गटामध्ये देवेंद्र शिंदे, सिद्धांत साळवी, अर्पिता असलेकर यांना प्रथम पारितोषिक; श्रद्धा पोखणरकर, अक्षता कुलकर्णी-गायकवाड यांना द्वितीय पारितोषिक; सायली देसाई, प्रतिभा चांदूरकर यांना तृतीय पारितोषिक; नमिता जोशी, गीतांजली टेमिगरे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

कथा-अभिवाचनस्पर्धेचे परीक्षक म्हणून आशा इंगळे, मीरा कुलकर्णी, मेधा आलकरी, छाया पिंगे, भगवान इंगळे, दत्ता सावंत, चांगदेव काळे यांनी काम पाहिले.

'शब्द रुची' अंकातील 'कथा-परीक्षण' स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली, अस्मिता पांडे यांनी केले. स्पर्धेच्या संयोजनात प्रदीप पाटील, श्रीकांत पेटकर, किरण येले, नंदकुमार पाटील, दिनेश म्हसकर, राधिका कुंटे, संदीप काळे, डॉ. सुरेखा सबनीस, अरुण जोशी, धनश्री धारप, मृण्मयी भजक, राजीव जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम कीर्तीच्या महाविद्यालयाच्या सहकार्याने घडवला. यास प्रायोजक म्हणून सारस्वत को-ऑप. बँक, दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, युनियन बँक ऑफ इंडिया, एनकेजीएसबी कॉर्पोरेटिव्ह बँक लिमिटेड, बॅसिन कॅथलिक को-ऑप. बँक लिमिटेड यांचे सहकार्य लाभले.

**– सुदेश हिंगलासपूरकर**
भ्रमणध्वनी : ९८६९३९८९३४
hingalaspurkarsudesh@gmail.com

**शनिवार, १४ डिसेंबर २०१९**

# भाषा आणि संस्कृती जेवढ्या मुक्त असतील तेवढ्या टिकतील - **नागराज मंजुळे**
# मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या सत्तेला शह - **भालचंद्र मुणगेकर**



**मान्यवरांच्या उपस्थितीत मराठी अभ्यास केंद्र, आर.एम. भट हायस्कूल आणि गुरुदक्षिणा तसेच सहयोगी संस्थांनी आयोजित केलेल्या 'मराठीप्रेमी पालक महासंमेलना'चे उद्‌घाटन**

'सतत शुद्धतेचा आग्रह धरणारी भाषा डबकं होते, ती आटत जाते. भाषा आणि संस्कृती जेवढ्या मुक्त असतील तेवढ्या टिकतील' असे मत सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी मराठीप्रेमी पालक महासंमेलनातील भाषणात व्यक्त केले. मराठी अभ्यास केंद्र, गोखले एज्युकेशन सोसायटीचे आर. एम. भट हायस्कूल आणि गुरुदक्षिणा तसेच सहयोगी संस्था, परळ परिसरातील शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठीप्रेमी पालक महासंमेलनात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पालक महासंमेलनाचे हे तिसरे वर्ष आहे.

मराठीप्रेमी पालक महासंमेलनाच्या उद्‌घाटन सत्रात दिग्दर्शक नागराज मंजुळे, खासदार अरविंद सावंत, अभिनेत्री चिन्मयी सुमीत हे प्रमुख पाहुणे होते, तर अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर हे उद्‌घाटक होते.

आपल्या चित्रपटातून वंचित समाजाचे जगणे समाजासमोर मांडणारे सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे मातृभाषेतील शिक्षणाचा आग्रह धरताना म्हणाले की, 'मी समाजातल्या वंचित वर्गातला आहे, आमच्या भाषा समाजात अशुद्ध समजल्या गेल्याने आमच्यात मुलांच्यात समाजात वावरताना व्यक्त होण्याचा, बोलण्याचा न्यूनगंड निर्माण होतो. सतत शुद्धतेचा आग्रह धरणारी भाषा डबकं होते, ती आटत जाते. भाषा हे माध्यम आहे, ज्ञान नव्हे. आपल्या समाजात इंग्रजी येत नाही याची लाज वाटते, पण भारतातल्या इतर प्रादेशिक भाषा आपल्याला येत नाहीत, याबद्दल आपल्याला कधीच लाज वाटत नाही. मग इंग्रजीबाबत ही लाज का आणि कशी निर्माण होते?'

अर्थतज्ज्ञ भालचंद्र मुणगेकर यांनी मराठीतून शिक्षणाचा प्रसार ही सत्ताधाऱ्यांच्या सत्तेला शह देणारी गोष्ट आहे, असे म्हणत ज्ञानेश्वरी आणि तुकारामांच्या अभंगांचे दाखले दिले. चांगली मराठी बोलण्यापेक्षा चुकीचे इंग्रजी बोलणाऱ्यांना सध्या समाजात प्रतिष्ठा लाभत आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले. खासदार अरविंद सावंत यांनी लोक बाजारपेठेतल्या मागणीमुळे इंग्रजीला जवळ करतात, त्यांचे इंग्रजीवर प्रेम नसते. मात्र त्यामुळे आजही मराठी मंत्रालयाबाहेर फाटक्या वस्त्रात उभी आहे' असे उद्गार काढले.

मी मराठी अभ्यास केंद्राच्या मराठी शाळा गटाची सदिच्छादूत आहे; मात्र मी तथाकथित सदिच्छादूत नाही, तर माझी मुलं मराठी माध्यमातूनच शिकलेली आहेत. मराठी शाळेत जाऊन माझी मुलं मोलकरणींच्या मुलांची भाषा शिकली, पण मोलकरणींची मुलंही माझ्या मुलांची भाषा शिकली. ही देवाणघेवाण मुलांच्या जडणघडणीसाठी मला महत्त्वाची वाटते, असे अभिनेत्री चिन्मयी सुमीत म्हणाल्या.

मराठीप्रेमी पालक महासंमेलनामागील भूमिका सांगताना संमेलनाचे समन्वयक आनंद भंडारे यांनी मातृभाषेतील शिक्षणाचं महत्त्व पालकांना पटवून देणं, इंग्रजी भाषा शिकणे आणि इंग्रजी माध्यमात शिकणे या दोन भिन्न गोष्टी आहेत हे समजावून सांगणं, प्रयोगशील शाळांच्या उपक्रमांचे आदानप्रदान होणं आणि मराठी शाळांच्या बाजूने भूमिका घेण्यासाठी राजकीय नेतृत्वाला भाग पाडण्यासाठी पालकांचं संघटन उभारणं या उद्देशाने मराठी पालक महासमेलनाचे आयोजन केले जाते. या संमेलनाच्या निमित्ताने

मराठी शाळा सर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते विलास डिके यांनी मुंबईतील जवळपास २८० शाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन शाळांची सद्यःस्थिती दाखवणारं सर्वेक्षण करण्यात आले असल्याची माहितीही भंडारे यांनी दिली. गेली तीन वर्षे मराठी शाळा आणि पालक यांचे सक्षमीकरण करण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या या संमेलनासाठी भाषेच्या कार्यकर्त्यांना कशी उरस्फोड करावी लागते आणि तरी समाजाला त्याचे काही पडलेले दिसत नाही, अशी खंत मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांनी व्यक्त केली. दरवर्षी या संमेलनाचे नियोजन करताना सुरुवातीला त्याचे स्थळ मुंबईतील मोठे मैदान असते, पण पैशाअभावी प्रत्येक वर्षी ते शाळेच्या छोट्या सभागृहात घ्यावे लागते. आपल्याकडे राजकीय सभा आणि मंत्र्यांचे शपथविधी शिवाजी पार्कला करण्याची परंपरा आहे. पण मराठी शाळांतील पालकांचे असे संमेलन शिवाजी पार्कला भरवता येतील तो सुदिन असेल, असा आशावादही दीपक पवार यांनी व्यक्त केला.



मराठी शाळांसाठी जागरफेरी

ज्येष्ठ पत्रकार आणि आर. एम. भट शाळेच्या माजी विद्यार्थी संघाच्या - 'गुरुदक्षिणा'च्या अध्यक्षा प्रतिमा जोशी यांनी इंग्रजी माध्यमातील मुलांना मराठी वाचता येत नाही तेव्हा पालक त्याची वेगवेगळी कारणे देत असतात, पण मराठी माध्यमात शिकलेल्या मुलांच्या मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांवर प्रभुत्व असते असे म्हटले. सध्या मराठी समाज विविध प्रकारच्या गंडांत वावरत आहे. एकीकडे आपल्या समाजाला मराठी भाषेचा न्यूनगंड आहे, तर दुसरीकडे आपल्या इतिहासाबद्दल अहंगंडही आहे. महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाचं सरकार असलं तरी त्या सरकारने मराठी शाळा आणि तिथे शिकणाऱ्या मुलांचा प्राधान्याने विचार केला पाहिजे असे मत व्यक्त केले. गोखले एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष डॉ. एम. एस गोसावी यांनी मराठी शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी अधिक काम करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले.

पालक महासंमेलनाची सुरूवात जागर फेरीने करण्यात आली. या जागर फेरीत आर. एम. भट शाळेसोबत परळ परिसरातील सोशल सर्व्हिस लीग, क्ष. म. स. शिरोडकर हायस्कूल, नवभारत विद्यालय, एस. एस. एम. गर्ल्स हायस्कूल, शिवाजी विद्यालय या शाळांमधील सहाशे विद्यार्थी आणि शिक्षक, मराठी प्रेमी यांचा समावेश होता.

सायंकाळी ४ वा. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आर. एम. भट शाळा, एस. एस एम गर्ल्स हायस्कूल, कुमुद विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



त्यानंतर 'मराठी शाळांसाठी आम्ही काय करणार?' या सत्रात शिवसेनेचे आमदार अजय चौधरी. राष्ट्रवादीचे आमदार नवाब मलिक आणि भाजपचे आमदार आशिष शेलार उपस्थित होते. नवाब मलिक यांनी आता आमच्या सरकारच्या काळात सीबीएससी, आयसीएससी बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी विषय अनिवार्य करू असे म्हटले. 'महाराष्ट्रात मराठी शाळांसाठी आंदोलन करावे लागते ही चिंतेची बाब आहे, मात्र यासाठी समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय सरकार काही करू शकत नाही.' असेही मत त्यांनी व्यक्त केले.

शिवसेनेचे आमदार अजय चौधरी यांनी आता आमचंच सरकार असल्याने पुढील पालक महासंमेलनापर्यंत मराठी शाळा आणि मराठी भाषेसाठी आम्ही ठोस पावले उचललेली असतील असे म्हटले. २००९ पासून काँग्रेस - राष्ट्रवादीच्या सरकारपासून भिजत पडलेला मराठी शाळांच्या बृहत्आराखड्याचा प्रश्न आशिष शेलार शालेय शिक्षणमंत्री असताना काही प्रमाणात मार्गी लागल्याचे त्यांनी सांगितले. आता विरोधात राहूनही बृहत्आराखड्याचा प्रश्न धसास लावू असेही ते म्हणाले. त्यानंतर उपस्थित पालकांचे प्रश्न घेण्यात आले. शाळांच्या अनुदानाचे प्रश्न, शिक्षकांना कराव्या लागत असलेले अशैक्षणिक कामे, एस. एस. सी बोर्ड, आंतरराष्ट्रीय बोर्ड अशा अनेक प्रश्नावर तीनही मान्यवरांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. झी चोवीस तास वृत्तवाहिनीच्या पत्रकार दीपाली जगताप यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले.

## रविवार, १५ डिसेंबर २०१९

शासनाला मराठी शाळांच्या दुरवस्थेबाबत जाब विचारला पाहिजे - मराठीप्रेमी पालक महासंमेलनातील चर्चेचा सूर या संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या यशवंतांशी संवाद या पहिल्या सत्रात मानसी कदम, मनोज देशमुख, अनिकेत सुळे, सोनिया सांची, श्रुती मधुदीप या यशवंतांचा सहभाग होता. डॉक्टरने पेशंटला कळणाऱ्या भाषेत त्याच्याशी संवाद साधला तर पेशंटला मानसिक आधार मिळतो असे मत वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मानसी कदम यांनी व्यक्त केले. शाळेत असताना आजूबाजूची इंग्रजी माध्यमातील मित्रमैत्रिणींशी वागताना मनात आपण मराठी शाळेत शिकत असल्याचा गंड होता, मात्र पुढे वैद्यकीय शिक्षण घेताना



**आम्ही मराठी शाळांचे यशवंत!**

मराठी शाळेचे फायदे अधिक स्पष्ट होत गेले. त्यातला महत्त्वाचा फायदा म्हणजे विषयांच्या संकल्पना मातृभाषेतून समजून घेतल्यामुळे कधी घोकंपट्टी करावी लागली नाही असेही त्या म्हणाल्या. आयटी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मनोज देशमुख यांनी इंग्रजी माध्यमाच्या मुलांना स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणं शक्य होत नाही. म्हणूनच या मुलांना मराठी गाणी म्हणायचीही लाज वाटते. 'लॉग आऊट' पुस्तकाच्या लेखिका श्रुती मधुदीप यांनी मराठी माध्यमाचे महत्त्व सांगताना म्हटले की, स्वतःचा आशय शोधणं मातृभाषेतूनच शक्य होतो, म्हणूनच मी लेखन करू शकते. इंग्रजी भाषेत बरीच माहिती असल्याने ती शिकावीच लागणार आहे, मात्र स्वतःचा आशयच जर सापडला नाही तर इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा शिकण्याचा काहीच उपयोग होऊ शकत नाही. अन् इंग्रजी ही इतर भाषांप्रमाणे केव्हाही शिकता येऊ शकते. आधी बँकिंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या आणि फॅशन क्षेत्रात लोकप्रिय असणाऱ्या सोनिया सांची यांनी बँकेत काम करताना लोकांशी मराठीत संवाद साधून दिलेले उद्दिष्ट गाठल्याने वरिष्ठांकडून त्यांना प्रशस्तीपत्रक मिळाल्याचा अनुभव सांगितला तसेच महाराष्ट्रातील पारंपरिक पेहराव असणाऱ्या पैठणीला त्यांनी जागतिक पातळीवर नेले, हे केवळ मराठी शाळेत झालेल्या संस्कारानेच शक्य झाल्याचे त्यांनी म्हटले. बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत असणारे अनिकेत सुळे यांनीही मराठी माध्यमात शिकल्याने करिअरमध्ये आपले काहीही अडत नसल्याचे सांगितले. या सत्रातील मान्यवरांशी 'एबीपी माझा'च्या वृत्तनिवेदक मनश्री पाठक यांनी संवाद साधला.

या नंतरच्या 'मराठी माध्यम आणि बाबा' म्हणून माझी भूमिका या सत्रात किरण भिडे, किशोर तेली, माधव पंडित, चंदन तहसीलदार हे मान्यवर सहभागी होते. चंदन तहसीलदार यांनी मुलाला शाळेत घालतानाचा अनुभव कथन केला. ते म्हणाले की, मी मराठी आणि इंग्रजी दोन्ही शाळांना भेटी दिल्या. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पालकांचा पगार किती, नोकरीला कुठे, मुलं किती असे प्रश्न विचारले गेले. मराठी शाळेत गेल्यावर असे काहीच प्रश्न न विचारता तिथल्या शिक्षिकेने आधी मुलीला शाळा दाखवली, तिथे काय-काय गमती असतात हे दाखवलं. मुलीलाही शाळा आवडली. शाळेतल्या वागणुकीतील हा फरक बरंच काही सांगून गेला. त्यामुळेच आपण मराठी माध्यम निवडले असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी शाळेतच शिक्षक असणाऱ्या किशोर तेली यांना मराठी माध्यमाचे फायदे ठाऊक असल्याने मुलाला मराठी शाळेत घातले आणि त्यानंतर कधीही आपल्याला या निर्णयाचा आपल्याला पश्चात्ताप झाला नसल्याचे म्हटले. मराठी शाळेत मुलांची सर्व प्रकारची स्वच्छंद वाढ होते असेही त्यांनी प्रतिपादन केले. किरण भिडे यांनी मराठी माध्यमात शिकून चांगले करिअर केलेले पालकही मुलांना मराठी माध्यमात घालत नसल्याचे वास्तव मांडले. यामागील कारण सांगताना त्यांनी म्हटले की, आपल्याला ज्या गोष्टी मिळाल्या नाहीत त्या आपल्या मुलांना मिळाव्यात अशी प्रत्येक पालकाची मानसिकता असते. मग मुलासाठी शाळेची निवड करानाही आपण शिकलेल्या मराठी शाळेत न घालता झाकपाक दिसणाऱ्या इंग्रजी शाळेची निवड केली जाते. मराठी शाळेत शिकून रिक्षावाल्याच्या, भाजीवाल्याच्या मुलांसोबत मुलांना शिकावं लागेल असं पालकांना वाटतं. पण रिक्षावाल्याच्या मुलांसोबत मुलं जे शिकतील ते ती कुठंच शिकू शकणार नाहीत, असंही त्यांनी म्हटलं. हेमंत पंडित यांनी आपला मुलगा मराठी शाळेत शिकत असल्यानेच त्याच्या विचारात, निर्णय घेण्यात अधिक स्पष्टता असल्याचे निरीक्षण नोंदवले.

मराठी शाळांच्या आजच्या दुर्दशेला पालकांची इंग्रजीबाबतची मानसिकता काही प्रमाणात कारणीभूत असली तरी शासन मराठी शाळांबाबतची जबाबदारी झटकू शकत नाही. शासनाच्या चुकीच्या शिक्षण व भाषाविषयक धोरणांमुळेही मराठी शाळांपुढे अस्तित्वाचे संकट उभे राहिले आहे. मराठी शाळांबाबत कोणाचे काय चुकले? ह्या विषयावरील चर्चेत सहभागी झालेल्या सर्व वक्त्यांनी मराठी शाळांच्या दुर्दशेचे खापर मराठी समाजावर फोडून स्वतः नामानिराळे होणाऱ्या राज्यकर्त्यांच्या प्रवृत्तीबाबत तीव्र शब्दांत नापसंती व्यक्त केली. माजी शिक्षक आमदार संजीवनी रायकर यांनी मराठी शाळांच्या दुर्दशेबाबत पालक, शिक्षक, शासन ह्या सर्व घटकांचे काय काय चुकत गेले आणि ते ज्याचे त्यानेच दुरुस्त केले पाहिजे हे सांगताना इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या वाढत्या प्रभावाला केवळ एकाच घटकाला जबाबदार धरून चालणार नाही असे प्रतिपादन केले. जागतिकीकरण, शासनाचे अनुदानविषयक नकारात्मक धोरण,

मराठी शाळांच्या गुणवत्तावाढीकडे दुर्लक्ष अशा अनेक कारणांमुळे मराठी शाळा आज संकटात आहेत.

बेळगाव - खानापूर भागातून आलेल्या नारायण कापोलकर यांनी सीमा भागातील मराठी शाळांची कैफियत मांडताना महाराष्ट्रात मराठीला थोडा तरी राजाश्रय आहे, पण सीमा भागात भाषिक अल्पसंख्य म्हणून मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे दिवसेंदिवस अवघड होत असल्याचे सांगितले. एके काळी हजाराच्यावर असलेल्या मराठी शाळा आज अडीचशेपर्यंत आलेल्या आहेत. त्यांची पटसंख्या आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी आपली संस्था कसे काम करीत आहे, याची माहिती त्यांनी दिली. राजकीय असंवेदनशीलतेमुळे मराठी शाळा टिकवण्याचे आव्हान निर्माण झाले असून त्यासाठी समाजानेच पुढाकार घेण्याची गरज आहे.



लोकमतचे कार्यकारी संपादक विनायक पात्रुडकर यांनीही मराठी शाळांच्या दुर्दशेबाबत चिंता व्यक्त केली. पालक आणि शासन या दोहोंनीही भाषेपेक्षा व्यावहारिक लाभाला अधिक महत्त्व दिल्यामुळे मराठी शाळांची पटसंख्या रोडावत चालली चालली आहे. शासनाने २०१२ पासून मराठी शाळांना अनुदान व वेतनेतर अनुदान देणे थांबवले. त्यामुळे मराठी शाळा चालवणे व्यवहार्य राहिले नाही. मॉलसारख्या चकाचक असणाऱ्या इंग्रजी शाळांना प्रोत्साहन दिल्यामुळे शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोणच बदलला. शाळा हे नफा देणारे उत्पादन बनले.मराठी शाळा सरकारचा प्राधान्यक्रम राहिला नाही. त्यातून मराठी शाळांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. २५ वर्षांनंतर मराठी शाळांची स्थिती काय असेल याची कल्पनाही करता येत नाही.

ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी म्हणाल्या की, राजकीय सत्तांतर झाले म्हणजे समाजाचे प्रश्न सुटतात असे नाही, कारण राज्यकर्त्यांची मानसिकता बदलत नाही. मराठी शाळांची दुर्दशा मराठी लोकांमुळेच झाली असा अपप्रचार राज्यकर्त्यांकडून चालू आहे. खरं तर आपण सर्वांनी याबाबत राज्यकर्त्यांना जाब विचारला पाहिजे. शेवटी, लोकशाहीत सरकारच बऱ्याच गोष्टी ठरवत असते, त्यामुळे सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे जर मराठी शाळा चालवणे कठीण झाले असेल तर ती धोरणे बदलायला सरकारला भाग पाडले पाहिजे. लोकांना हव्या म्हणून इंग्रजी शाळांना मान्यता देतो, असे सांगून सरकारला हात झटकता येणार नाही.



होय! आम्ही मुलांना मराठी शाळेत घातले ह्या विषयावरील चर्चेत सुप्रसिद्ध अभिनेता सुमीत राघवन, अभिनेत्री चिन्मयी सुमीत तसेच लेखक, भाषांतरकार गणेश विसपुते आणि श्रुती विसपुते यांनी भाग घेतला. या दोन्ही कलावंत दांपत्यांनी आपल्या मुलांना जाणीवपूर्वक मराठी माध्यमाच्या शाळांत घातले.त्याबाबतचे आपले अनुभव कथन करताना आनंददायी शिक्षणासाठी मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले.आपल्या पालकांनी आपल्याला मराठी माध्यमात घालताना तो सहज व स्वाभाविक निर्णय होता. आज तो संघर्षात्मक झालेला आहे. शिक्षणाकडे, भाषेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोणच बदललेला आहे. आमची पिढी फुलण्यासाठी ज्ञानासाठी आनंद घेत शिकली. आज मार्कांसाठी शिक्षण दिले-घेतले जात आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. अस्मिता पांडे यांनी या दांपत्यांशी संवाद साधला.



समारोपाच्या सत्रात संमेलनानिमित्त आयोजित केलेल्या निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. हे पुस्तकरूपी पारितोषिके 'ग्रंथाली'ने प्रायोजित केली होती. संमेलनानिमित्त आयोजित केलेल्या या स्पर्धांना नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, शहापूर, नंदूरबार, चंद्रपूर, धुळे, नाशिक, जामनेर, जळगाव, सावंतवाडी, कुडाळ, सिंधुदुर्ग, इचलकरंजी, कोल्हापूर, कराड, सातारा येथील स्पर्धक सहभागी झाले होते.

प्रयोगशील शाळा आणि ग्रंथप्रकाशनांची दालने हे संमेलनाचे आकर्षण होते. मराठीप्रेमींनी या संमेलनाला चांगलीच गर्दी केली होती.

**- साधना गोरे**
भ्रमणध्वनी : ९९८७७७३८०२
sadhanagore82@gmail.com

## ‘डोहमृग’



**‘डोहमृग’ पुस्तकप्रकाशनसमयी पूजा काळे, सूर्यकांत मालुसरे, एकनाथ आव्हाड, सुदेश हिंगलासपूरकर, नमिता कीर, मधु मंगेश कर्णिक, लेखक सुरेश खेडेकर, प्रा. पंढरीनाथ रेडकर आणि शिवाजी गावडे**

‘‘कोकण साहित्याच्या दृष्टीने पुढारलेला आहे. कोकणातल्या कवींची कविता-कथा वेगळी असते; त्याला पर्यावरण आणि निसर्गाचा किनारा असतो. आता साहित्याचा परीघ बदलतोय त्याचं ज्ञान साहित्यिकांना हवं. गोष्ट ऐकायला आवडणे हे कथेचे सामर्थ्य आहे; याचं भानही कथाकारांना हवं,’’ असे उद्‌गार पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांना कोकण मराठी साहित्य परिषद, ग्रंथाली व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव यांच्या वतीने सुरेश खेडेकर यांच्या ‘डोहमृग’ या कथासंग्रहाचे प्रकाशन करताना मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथे काढले. यावेळी कोमसापच्या कार्याध्यक्षा नमिता कीर, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, प्रा. पंढरीनाथ रेडकर, अल्पना कशाळकर व एकनाथ आव्हाड यांनी ‘डोहमृग’ कथासंग्रहावर विचार मांडले. तर ग्रंथसंग्रहालयाचे डॉ. कृष्णा नाईक यांनी कथेचे वाचन केले. याप्रसंगी कोमसाप मुंबई उपनगरचे अध्यक्ष शिवाजी गावडे व सूर्यकांत मालुसरे यांनी खेडेकर यांना शुभेच्छा दिल्या. या दिवशी कथाकार सुरेश खेडेकर यांचा पंच्याहत्तरावा वाढदिवस असल्याने त्यांच्या पत्नी समता खेडेकर आणि कुटुंबियांसह मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. या अनुषंगाने कवयित्री गौरी कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन आयोजित केले होते. त्यात चाळीस कवींनी विविधांगी कविता सादर केल्या. त्यांना चांगलीच दाद मिळाली. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन मनोजन धुरंधर यांनी केले. तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणीच्या निवेदिका पूजा काळे यांनी केले. तसेच कवी व निमंत्रितांना सुरेश खेडेकर यांनी दैनंदिनी भेट देऊन आभार मानले.

## 'Talk To Me'

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी ग्रंथाली प्रकाशित, अनुया पोतनीस लिखित 'Talk to Me' या इंग्रजी पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार्ले येथील उत्कर्ष मंडळाच्या हॉलमध्ये दर्दी उपस्थितांच्या समोर संपन्न झाला. युवा लेखिका अनुया यांनी या पुस्तकात विविध भावनांचं रसायन एकत्र करून अनेक भावनाप्रधान कविता आणि लेख लिहिले आहेत. संभाषण कमी होत चाललेल्या आजकालच्या डिजिटल युगात भावनांचा निचरा करण्यासाठी एकमेकांशी बोलण्याची किती आवश्यकता आहे या विषयाला अनुया यांनी हात घातला आहे. त्यांच्या अगणित प्रवासात त्यांनी घेतलेले सुरेख आणि बोलके फोटो या पुस्तकात समाविष्ट केले आहेत. लेखिकेने आपल्या मनोगतात हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा कशी झाली याबद्दल बोलताना रस्किन बॉण्ड यांचा उल्लेख केला. ते म्हणत की शब्दांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचणं कितीतरी आनंददायी असतं, मग त्याचा आवाका लहान असो वा मोठा!

केईएमचे निवृत्त अधिष्ठाता डॉ. अविनाश सुपे आणि मुंबई विद्यापीठाच्या माजी उपकुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांसारख्या दिग्गज व्यक्ती या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभल्या होत्या. डॉ अविनाश सुपे यांनी आपल्या भाषणात लेखिकेचं अभिनंदन करताना पुस्तकातील पहिला लेख वडिलांना समर्पित केल्याबद्दल तिचं अभिनंदन केलं. दिशादर्शन करणारे आणि कणा ताठ ठेवून आचरण करण्याची मूल्यं देणारे तिचे वडील हे खरोखरच तिच्यासाठी ध्रुवतारा आहेत. आज समाजात ताठ कण्याने चालण्याची किती गरज आहे याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. तिने काढलेल्या अनेक फोटोंचं तर त्यांनी कौतुक केलंच परंतु त्यावरून तिला सुचलेल्या कविता अथवा लेख आणि त्यातील विचार यांचंही त्यांनी भरभरून कौतुक केलं. न्यूयॉर्क शहरातील बारकाव्यांचं तिने केलेलं वर्णन त्यांना भावलं कारण त्यामुळे त्यांच्या तेथील वास्तव्याच्या स्मृती जागृत झाल्या.




**'Talk To Me' पुस्तकप्रकाशनसमयी मेधा आलकरी, अंजू पोतनीस, लेखिका अनुया पोतनीस, डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. अविनाश सुपे, डॉ. अमोद पोतनीस आणि सुदेश हिंगलासपूरकर**

डॉ. स्नेहलता देशमुख यांनी आपल्या मधाळ वाणीत लेखिकेच्या लिखाणाचं कौतुक केलं. त्यांच्या भाषणात बहिणाबाईंच्या, कुसुमाग्रज, भा. रा. तांबे यांच्या कवितांची पखरण होती. एखाद्या आजीच्या मायेने त्यांनी आपल्या या नातीला लेखनप्रवासाच्या शुभेच्छा दिल्या. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावरील लेखिकेचं काढलेलं स्केच दोन्ही पाहुण्यांना अतिशय आवडलं.

एकत्र वाढलेल्या आणि आईवडिलांकडून विचार स्वातंत्र्याची, नीतिमत्तेची समान मूल्यं संपादन केलेल्या दोन बहिणी. एक लेखिका अनुया आणि दुसरी आरती. तिची प्रशंसक आणि टीकाकारही! तिच्या छोट्याशा भाषणाने समारंभाला कौटुंबिक जिव्हाळ्याचा सुगंध लाभला. तद्पश्चात अनुयाच्या मेहुण्यांनी पुस्तकातील उतारा वाचून दाखवल्यामुळे पुस्तकात काय वाचायला मिळणार आहे, याची एक झलक श्रोत्यांना ऐकायला मिळाली.

मेधा आलकरी यांनी नेहमीप्रमाणे आपल्या खुमासदार शैलीत, इंग्रजी आणि मराठी भाषांचा समतोल राखत केलेलं सूत्रसंचालन मंचावरील सन्माननीय पाहुण्यांचं आणि श्रोत्यांचं मन जिंकून गेलं.

## जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती-जमाती



**'जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती-जमाती' पुस्तकप्रकाशनसमयी शुद्धोधन अहेर, लेखक सुनिल सांगळे, डॉ. हरी नरके, सौ. सांगळे आणि सुदेश हिंगलासपूरकर**

'जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती-जमाती' या सुनिल सांगळे लिखित आणि ग्रंथाली प्रकाशित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ३० डिसेंबर, २०१९ रोजी एम.आय.जी. क्लब, वांद्रे येथे सायंकाळी पार पडला. या समारंभास सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. हरी नरके हे प्रमुख पाहुणे म्हणून आणि शुद्धोधन अहेर मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त, ग्रंथाली प्रकाशन, यांनी ग्रंथालीच्या उद्देशाची आणि कार्याची माहिती दिली.

त्यानंतर लेखक सुनिल सांगळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी सांगितले की मागील अनेक वर्षे स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, जातीय अत्याचार अशा बातम्यांनी अस्वस्थ होऊन, त्या गोष्टींची मुळे शोधण्याचा प्रयत्न केला असता, ती आपल्या धर्मग्रंथांमध्ये सापडली. अशा अनिष्ट रूढींना धार्मिक अधिष्ठान असल्यानेच त्या एवढ्या चिवटपणे समाजात टिकून आहेत, हे वास्तव लोकांसमोर यावयास हवे असे वाटल्याने हे पुस्तक लिहावे असे वाटले, असे सांगळे यांनी सांगितले.

शुद्धोधन आहेर यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की अशा प्रकारे वर्तमानपत्रांच्या बातम्यांनी अस्वस्थ होऊन अनिष्ट प्रथांचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करणे याला एक दृष्टी व मनाची संवेदनशीलता लागते. असे नवे लेखक पुढे येणे हेच जातिसंस्थेत हळूहळू का होईना बदल होत आहेत याचे लक्षण आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. हरी नरके यांनी सदर ग्रंथात एका अत्यंत संवेदनशील विषयाला हात घालण्याचे धाडस सांगळे यांनी दाखविले, याबद्दल अभिनंदन केले. एक अत्यंत क्लिष्ट विषय साध्या आणि प्रवाही भाषेत आणि आपल्या प्रतिपादनाबद्दल धर्मग्रंथातील शेकडो श्लोकांचे पुरावे देत सम्यक आणि संयत पद्धतीने हाताळल्याबद्दल त्यांनी लेखकाचे अभिनंदन केले.




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

**किटाळ**
**लक्ष्मण माने**




**'उपरा'नंतरचे दाहक आत्मकथन**

''लक्ष्मण, ज्या जनतेने फुलांच्या हारांच्या डोंगरावर उभे केलं होते, त्याच जनतेने गळ्यात जोड्यांच्या माळा घातल्या होत्या. म्हणून घाबरायचं नाही. तीच आई पुन्हा माया करायला लागते.''

'उपरा'कार लक्ष्मण माने यांच्या उपरानंतर आलेली अनेक पुस्तके ही त्यांच्या जीवनप्रवासाची सांगाती आहेत. हागणदारीच्या कुशीपासून विधान परिषदेपर्यंतचा प्रवास सगळ्यांना ठाऊक आहे. अनेक सामाजिक चळवळी, आंदोलने, जातीनिर्मूलनापासून ते भटक्याविमुक्ताना त्यांच्या मार्गापासून दूर करून सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी केलेले मोठे कार्य, शिक्षणाचे महत्त्व ओळखून जागोजागी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, वसतिगृहे, असा आयुष्याचा मोठा पट, केवळ समाजासाठी वाहिलेला, जगलेला, अनुभवलेला, अर्पित केलेला! साहित्यिक आणि कार्यकर्ता म्हणून असलेले स्थान त्यांना मिळालेल्या पद्मश्रीने अधोरेखित केले, गौरवांकित केले. लक्ष्मण माने हे सगळ्यांचे झाले. सर्व स्तरांचे झाले. परंतु अशी व्यक्ती जेव्हा कर्तृत्वाच्या एका टप्प्यावर पोहोचते तेव्हा तिला पुढे घेऊन जाणाऱ्या वाटेला वाकवण्यासाठी काही शक्ती प्राणपणाने एकवटतात, वाट अवरोधित करून टाकतात, पाय पुतळ्यासारखे तिथेच गाडले जातील याची काटेकोरपणे काळजी घेतात. मग पुढचे सारेच अंधारमय होत जाते, मागे फिरण्याची वाट तर आधीच खोदून नाहीशी केलेली असते. उरते ते माथ्यावर रणरणारे ऊन आणि पायाखाली धगधगती माती. सूर्याला ग्रहण लागते, चंद्राला ग्रहण लागते, तसे हे एका टप्प्यावरचे ग्रहण आहे, अशी त्याची भलामण केली जाते. पण तो थांबलेला काळ किती जीवघेणा असतो, हे फक्त त्यालाच कळू शकते, ज्याच्या नशिबी हे आले आहे. लक्ष्मण माने यांनी हे ग्रहण अनुभवले आहे, प्राणपणाने झेलले आहे आणि त्यातून ते सहीसलामत बाहेर देखील पडले आहेत. परंतु तो काळाकुट्ट कालखंड मागे कसा टाकणार? सारे आयुष्य पणाला लावणारा हा कालखंड म्हणजे अग्निपरीक्षाच होती, त्याने सोसायला लावलेला दाह आणि आयुष्यावर कोरून ठेवलेल्या खुणा कशा लपवून ठेवणार? त्या ग्रहणकालात अनुभवलेले, सहन केलेले, जे अमानुषपणाचे होते, त्याचे वर्णन म्हणजे 'किटाळ' होय.

लक्ष्मण माने यांनी स्थापन केलेल्या संस्थेत सेवा करीत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांनी लक्ष्मण माने यांच्या विरोधात बलाकाराचे दावे पोलीसस्टेशनात दाखल केले, एक दोन नाही, तब्बल सहा दावे. तेही चांगले दहा पंधरा वर्षांपूर्वीच्या काळाचे. यातले सत्यासत्य बाहेर पडेपर्यंत पोलीस आणि न्याययंत्रणा कामाला जुंपली जाते. या यंत्रणेचा खाक्या सगळ्यांनाच ठाऊक आहे. तिच्या अंमलाखाली भरडणे म्हणजे काय असते, हे मात्र जो अनुभवतो त्यालाच ते चांगल्याप्रकारे अनुभवाने कळत जाते. लक्ष्मण माने यांच्या विरोधात असे दावे दाखल झाल्यानंतर त्यांच्यामागे लागलेला ससेमिरा, त्यापासून वाचवण्यासाठी त्यांना करावी लागलेली धडपड, न्यायालयीन लढाई, पोलिसी तपास, पोलीस कोठडी, न्यायालयीन कोठडी, वकील, साक्षीपुरावे, असे एक मोठे विवर निर्माण झाले. ज्याच्या तळाशी लेखक सापडले. हे विवर म्हणजे शिकार करण्यासाठी तयार केलेले मायावी जाळे. ज्यातून सावज सहजासहजी सुटणार नाही, मरणांत अशा यातना सहन करीत आयते हाती सापडते, तसे ते सापडले.

बलात्काराची केस पोलिसस्टेशनात दाखल झाल्यानंतर लेखक एकटे उरत नाहीत. त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंबीय आहे. या सगळ्यांची ससेहोलपट सुरू होते. मानसिक छळ सुरू होतो. सामाजिक बहिष्काराचे डोंगर समोर येतात, आर्थिक घडीला सुरुंग लागतो. आणि कधीही स्वप्नात केली नसेल अशी वागणूक नशिबी येते. पोलीस कोठडी काय असते, तुरुंगाच्या भिंतीआडचे जग कसे असते, पोलीस तपासाच्या तऱ्हा कशा असतात, हे सारे सर्वप्रकारचे छळ करणारे अनुभव लेखकाच्या वाट्याला आले आहेत. ते सहन करताना आत्महत्येचे विचार मनात न आले तरच नवल!

लेखकाचे हे 'उपरा'नंतरचे पुढचे आत्मकथन आहे. लेखकाने उपरात आपल्या जगण्यातला संघर्ष वर्णन केलेला आहे. तो समाजाने लादलेला, जातीय व्यवस्थेने जखडलेला आणि जन्माच्या नाळेने बांधलेला होता. परंतु किटाळमध्ये आलेला संघर्ष एका विशिष्ट हेतूने लादलेला आहे. मूठभरही नसलेल्या माणसांनी आपली सूडबुद्धी प्रज्ज्वलित करून तिच्यात लेखकाला जाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. यात अनेक हेतू आहेत, काही शक्ती कार्यरत आहेत. परंतु लेखकाने त्याचे वर्णन करताना कुठेही आपले लेखकत्व वैयक्तिक पातळीवर आणलेले नाही, की आपल्या लेखनधर्माचा विसर पडू दिलेला नाही. 'उपरा' वाचत असताना जे लक्ष्मण माने आपल्यासमोर लेखक म्हणून उभे होते, ते तसेच या 'किटाळ'मध्येही उपस्थित आहेत. कुठलाही आततायीपणा, अन्याय अन्याय, सूड, मानहानी, असा आक्रोश नाही. अशा दाहक प्रसंगी एक लेखक अन्य कुणा व्यक्तिरेखेचे चित्रण करील, तसेच चित्रण तावूनसुलाखून निघाल्यानंतरही त्यांनी अतिशय संयमितपणे केलेले आहे. 'सत्याला मरण नसते. सत्य धारदार बनते तेव्हा ते काळीज चिरत जाते.' 'बाईने आंघोळ केली की पुरावा नष्ट.' अशी वाक्ये ते सहजपणे लिहून जातात. आपले कुटुंबीय, आप्त, मदत करणारे, यांच्याविषयीची कृतज्ञताही ते व्यक्त करतात. 'मी टू' (बाई खोटे कशाला बोलेल हो? तिच्या अब्रूचा खेळ ती का मांडील?') आणि 'अट्रॉसिटी' यांचा वापर कसा होऊ शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे 'किटाळ' होय. यातले मानसिक द्वंद्व हे एक झाड दोन पक्षी याचे स्मरण करून देते. जे लेखकाच्या सोबत वाचकालाही पुन्हा पुन्हा विचार करायला लावते.

सतीश भावसार यांनी या ग्रंथाचे मुखपृष्ठ सजविलेले आहे. अंगावर फेकलेला चिखल अशी कल्पना इथे दृश्य स्वरूपात साकारलेली दिसते. हा चिखल आहे की आत्म्यातून करपून झिरपलेले रक्ताचे अवशेष आहेत, याचे द्वंद्व व्यक्त करणारे, अंतर्मुख करायला लावणारे तसेच खिळवून ठेवणारे मुखपृष्ठ आहे.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

**लाल माती**
**शब्दांकन : विश्वास पाटील**




**हिंद केसरी आणि महाराष्ट्राची लाल माती**

'माझ्या दृष्टीने काशी पैलवानाबरोबरची ही लढत म्हणजे माझ्या पैलवानकीच्या वाटचालीत महत्त्वाची लढत ठरली. या कुस्तीने मला मोठी इज्जत दिली, मानसन्मान दिला. आत्मविश्वास दिला. पैसा दिला आणि खऱ्या अर्थाने मल्ल म्हणून मला स्वतंत्र ओळख दिली. माझ्या 'हिंदकेसरी'च्या वाटचालीतील हे पहिले पाऊल होते.'

कुस्ती हा खेळाचा एक प्रकार आहे, हा खेळ वैयक्तिक आहे, इतके वरवर पाहून चालणार नाही. त्यासाठी लागणारी मेहनत, चिकाटी, सराव, शरीरयष्टी, खुराक, तालीम, वस्ताद, पाठबळ, संधी, अशा अनेक बाबींची आवश्यकता असते. एकटा पैलवान असून भागत नाही, त्याला आकार द्यावा लागतो, पाठीशी खंबीरपणे कुणीतरी उभा असावा लागतो. सुदैवाने महाराष्ट्राने या खेळात नेहमीच आपला दबदबा कायम राखलेला आहे. महाराष्ट्र आणि कुस्ती हे एक समीकरण या क्षेत्रात असणाऱ्या सगळ्यांनी मान्य केलेले आहे. असे असले तरीही सांगली आणि कोल्हापूर यांचे वर्चस्व इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कायमच श्रेष्ठत्वाच्या पातळीवरचे राहिलेले आहे, हे कुणीही मान्य करील. 'महाराष्ट्र केसरी' आणि 'हिंद केसरी' हे कुस्तीतील मानाचे पुरस्कार समजले जातात. हे पुरस्कार मिळविणारे कुस्तीगीर याच शहरांत असलेल्या तालमीतून घडलेले आहेत. शाहूपुरी तालमीचे श्रीपती खचनाळे हे १९५९ साली झालेले पहिले हिंदकेसरी, मग हजरत पटेल, तेही याच तालमीचे. मारुती माने हे सांगलीच्या कवठेपिरान तालमीचे, तर मोतीबाग तालमीचे गणपतराव आंदळकर हे हिंद केसरी झालेले. म्हणजे तसा आलेख काढला तर हे दोन्ही पुरस्कार महाराष्ट्रात आणलेले आहेत ते या दोन्ही जिल्ह्यातील तालमींनी. त्याच परंपरेत शोभणारे आणखी एक नाव आहे, दीनानाथसिंह, कोल्हापूरच्या गंगावेस तालमीचा हिंदकेसरी पैलवान, ज्याने प्रथमच या तालमीसाठी हा पुरस्कार मिळवण्याची कामगिरी उत्तम प्रकारे पार पाडलेली आहे.

दीनानाथ मूळचे कोल्हापूरचे नाहीत. ते आहेत उत्तर प्रदेशातील. पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मुंबई गाठली, पण लौकिक मिळवला तो कोल्हापूरचा पैलवान म्हणून. यासाठी पाठबळ आणि माणूस पारखून घेणारी माणसे पाठीशी असावी लागतात, तशी ती त्यांना लाभली, हिऱ्याला सोन्याच्या कोंदणात बसवणारी. ती होती, खाशाबा जाधव, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, शरद पवार, मारुती माने, दारासिंग. दीनानाथ यांचा मुंबई ते सांगली व नंतर कोल्हापूर असा प्रवास झाला तो या मान्यवरांच्या आग्रहामुळे आणि कुस्तीवरील प्रेमामुळे. या तालमींमधील लाल माती, इथे असलेले कसदार वस्ताद आणि सहकारी मल्ल यांच्या सहवासात दीनानाथ महाराष्ट्र केसरी झाले आणि खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे झाले. मुंबईच्या प्रत्येक मैदानावर त्यांनी त्या काळच्या नामांकित पैलवानांशी लढत दिली. महाराष्ट्रात ज्या-ज्या ठिकाणी कुस्त्या आयोजित होत, तेथे जाऊन लढती दिल्या. दिल्ली, राजस्थान अशा भारतातील मोठ्या शहरात झालेल्या कुस्त्यांमध्ये भाग घेतला. भल्याभल्या नामांकित पैलवानांना अस्मान दाखवत लाल मातीत लोळविले. स्वतः कधीही स्वतःची पाठ लाल मातीला पाठ लावू दिली नाही. अशा या दीनानाथ नावाच्या पैलवानाने कुस्तीसाठी असलेले सगळे मानाचे पुरस्कार आपल्या मेहनतीच्या, शक्तीच्या आणि डावपेचाच्या युक्तीने जिंकलेले आहेत. हे यश मिळवताना त्यांनी स्वतःचे वर्चस्व निर्विवादपणे भारतभर प्रस्थापित केले, तसा आपल्या तालमीचा, आपल्या कोल्हापूर - महाराष्ट्राचा आणि त्यांच्या उत्तरप्रदेशाचा लौकिकही सिद्ध केला. या सगळ्यांना प्रतिष्ठेचा सन्मान मिळवून दिला. अभिमान वाटावा असे या सगळ्याचे वर्णन या चरित्रात आले आहे.

कुस्ती ही केवळ त्या पैलवानाची नसते. त्यामागे वस्ताद, तालीम, मदत करणारे सहकारी, गाव या सगळ्यांच्या प्रतिष्ठेचा विषय असतो. बाळासाहेब देसाई यांनी दाखवलेले प्रेम हे खेळाइतकेच आपल्या पैलवानाच्या प्रतिष्ठेला शोभणारे म्हणावे लागेल. वस्ताद पैलवानाकडून किती आणि कशी मेहनत करून घेतात, हा एक थक्क करणारा अनुभव ठरावा. बाराशे ते पंधराशे जोर मारणे, पाठीवर पैलवानाला घेऊन मेहनत करायची तर खुराकही तसाच आला. दूध, तूप, बदाम, थंडाई, मटण, सोन्या-चांदीचे भस्म, आकणी, यांचे प्रमाण आज सांगूनही कुणाचा विश्वास बसणार नाही, पण हे वास्तव आहे. महाराष्ट्र केसरी हा महाराष्ट्राचा पुरस्कार, 'हिंद केसरी' हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार, तसेच 'भारत केसरी', 'रुस्तुम ए हिंद', 'भारत भीम' अशा पुरस्कारांची ओळख या पुस्तकातून करून दिलेली आहे. काशी यादव, मारुती माने, गणपत आंदळकर, श्रीपती खचनाळे, मारुती वडार, मा. चंदगीराम, सतपाल, हरिश्चंद्र बिराजदार, त्या काळी गाजलेले हे पैलवान, त्यांची वैशिष्ट्ये, कुस्ती खेळण्यातले कौशल्य, त्यांची निर्माण झालेली स्वतंत्र ओळख, डावपेचावर असलेली त्यांची हुकूमत, त्यांनी गाजवलेली कारकीर्द यांचीही माहिती यात दिलेली आहे. ही माहिती कुस्तीचे दोन हात करताना पैलवानाने माहीत करून घेतलेली असते, अशा ओघात दिलेले आहे. त्यामुळे होणारी कुस्ती कुणासोबत आहे याचा अंदाज करणे सोपे जाते. ढाक, एकलांगी, एकेरी पट,दुहेरी पट, मुलतानी, यासारखे युक्तीने डाव वापरून मैदान जिंकता येते, ते येथेच कळते. त्यावेळी असलेले खुराकाचे दर, नेत्यांचे औदार्य, कुस्तीशी असलेले नाते, यासगळ्यांचे वर्णनही यात आलेले आहे. स्वतःची कौटुंबिक परिस्थिती, रीतीरिवाज, बहिणींची लग्ने, यांचेही तपशील सोबत आहेत.


विश्वास पाटील यांनी केलेले शब्दांकन हे अतिशय उत्तम झालेले आहे. यात लेखक डोकावणार नाही याची काळजी घेताना चरित्रनायकाच्या भूमिकेला पूर्ण न्याय मिळेल याची त्यांनी घेतलेली काळजी लक्षात घेण्यासारखी आहे. भाषाशैलीही सहज आणि चपखल आहे.

पुस्तकाचे अर्थपूर्ण मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी रुजवले आहे.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**अस्वस्थ तांडा**
**डॉ. विजय जाधव**




**अस्तित्व जपलेल्या वस्तीवरील संस्कृती**

'तांडा म्हणजे भीषण दारिद्र्य! ढोरकष्टाला जुंपलेली आणि घाम गाळणारी मजबूत जमात! संकटं आणि प्रश्नांना आपल्या पायाशी लोळण घालायला विवश करणारी जमात! धैर्यवान तरीही दारिद्र्याशी पक्की नाळ जुळलेली. कितीही कष्ट केले तरी थकून अंथरुणावर न पडणारी. नाचगाणी, डफडी बडवायची आणि अशा बेधुंद अवस्थेत कितीही रात्र झाली याचं भान नसणारी! इतर कष्टकरी इतके कुठं उत्साही, कलाप्रेमी असतात?'

गाव, शहरापासून दूर असलेली, डोंगरकुशीच्या आश्रयाने राहणारी कष्टाळू आणि काटक मनुष्यवस्ती म्हणजे तांडा. वाटेल ते आणि वाटेल तितके कष्ट करायची तयारी आसलेली ही माणसे, हाताला काम असते तेव्हा वाघ असतात पण काम नसते तेव्हा गाय होऊन राहण्याची वेळ त्यांच्यावर येते. पावसाळ्यात मोजकेच दिवस काम. पुढे जेव्हा ऊसतोडीचा हंगाम सुरू होतो तेव्हा या हातांना पुन्हा काही महिन्यांसाठी काम मिळते. तेवढेच. त्यामुळे दारिद्र्य पाचवीला पूजलेले असल्यासारखे कायम त्यांची सोबत करीत राहते. ही गरिबी या कथांच्या मध्यभागी आहे. ती माणसांना कुठल्या थरापर्यंत घेऊन जाते हे वेगळे सांगायला नको.

ऊसतोडीला जावे लागत असल्याने मुले शिक्षणपासून वंचित राहतात, हा यातला सगळ्यात मोठा धोका. दुसरा राक्षस आहे तो 'हुंडा' नावाचा. हुंडा दिल्याशिवाय मुलीचे लग्न होत नाही. हा हुंडा एकाला गरिबीत हात देतो तर दुसऱ्याला फाशीचा दोर जवळ करायला भाग पाडतो. कर्जमाफीच्या नावाखाली फसवणारे लांडगे आहेतच. ते गरिबाच्या असहायतेचा फायदा घेण्यात कुठलीही कसर ठेवीत नाहीत. ही गरिबी दूर करण्यासाठी कधी कधी अंधश्रद्धेची ही माणसे बळी ठरतात, त्यासाठी अघोरी कृत्ये करायला तयार होतात, तेही या कथांमधून आले आहे.

मानवी स्वभावाचे दर्शनही या कथांमधून प्रभावीपणे घडत जाते. 'अस्वस्थ तांडा' या कथेतील बेबी संताप अनावर होतो तेव्हा सासऱ्याचा कुऱ्हाडीने खून करायला मागेपुढे पाहात नाही. मुलीचा गर्भपात करायला निमूटपणे मान तुकवणारी विद्या वेगळेच वास्तव समोर आले, तेव्हा बेभान झालेली विद्या 'दणका' कथेत पाहायला मिळते. परिस्थिती आणि घरातले संस्कार यांच्यात स्वप्नांचा चुराडा झालेला अनिरुद्ध कसा हतबल ठरतो याचे वर्णन 'चुराडा' या कथेत आले आहे. एसटीच्या ड्रायव्हरशी लग्न केल्यानंतर नशिबी आलेल्या आजाराची शिकार ठरलेली रीमा, शिक्षण झालेले असूनही बेरोजगारी वाट्याला आलेला रमेश आणि कंडक्टर म्हणून एसटीत लागलेली श्रद्धा, यांचा तडजोडीचा संसार, या विविध व्यक्तिरेखा समर्थपणे साकारलेल्या आहेत. कस्तुरी, हळद या कथा हेलावून टाकणाऱ्या आहेत. खुंटीला टांगलेले दप्तर बालविश्व उभे करते तशी अगतिकताही!

तांड्यावर असलेल्या प्रथा, रिवाज, संस्कृती यांचे दर्शन या कथा घडवतात. मुलीच्या अंगाला लग्नाची हळद लागली तर ती लग्न झाल्यानंतरच धुतली जाते. ठरलेला वर लग्नासाठी आला नाहीतर तिचे लग्न दुसऱ्या वराशी लावले जाते. ज्याच्या घरात कुणाचा मृत्यू झालेला असेल तर तांड्यावरील इतरजण येऊन त्या घरात दिवाळीचा दिवा लावतात आणि घराची पूजा करतात. पितृअमावस्येला पितरं घातले जात नाही, दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी आणि होळीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी घालतात. त्याला बंजारा बोलीत 'धबुकार' म्हणतात. अशा इतरही चालीरिती इथे वाचायला मिळतात.

लेखक ज्या संस्कृतीतून आलेले आहेत, त्या संस्कृतीत रुजलेल्या भाषेचा गंध काही वेगळाच म्हणयला हवा. वाचकाच्या सोयीसाठी तिचा अर्थही सोबत दिलेला आहे. ही भाषा परखड, स्पष्ट आणि सडेतोड आहे, थेट आशयाला भिडणारी. तिथे असणारे वाक्प्रचार, गाणी, यांचाही उपयोग या लेखनात चपखलपणे केलेला आहे. यातून दुर्गम आणि दुर्लक्षित राहिलेल्या एका संस्कृतीचा परिचय होत जातो. लेखकाची भाषा सरळ आणि आशयाला न्याय देणारी असेल तर ते लेखन अधिक प्रभावी होते, तसे हे लेखन प्रभावी झालेले आहे. यात ओघाने आलेली वाक्ये पाहिली की, लेखकाच्या प्रतिभेचा आवाका लक्षात येतो. जसे, 'सोन्यासारख्या जीवनाचं अल्युमिनियम झालं. झक मारली अन् लग्न केलं!' 'हा कारखाना ऊसाचे केवळ ट्रकच पोटात रिचवत नाही तर गोरगरिबांची आयुष्येही तो खाऊन टाकतो.' 'ढग आले तं पाऊस नाही. आलाच पाऊस तं पेरणीला पैसे नाहीत. माणसाचं डोस्कं कसं चालेल?'वास्तव मांडण्यात लेखकाची अस्वस्थता वारंवार अनावर होत असूनही कथांचा तोल बिघडणार नाही याची खूप संयमपूर्वक काळजी घेतलेली दिसून येते. जे सांगायचे ते सांगण्यात ते यशस्वी झालेले आहेत, असे खात्रीने म्हणता येते. कथांना हवे असलेले तंत्र, पारंपारिकता, यापासून या कथा मुक्त आहेत. त्यांची मांडणी एका रेषेत येत नाही. परंतु त्यांच्यातले सच्चेपण, आशयाची सखोलता, वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण, यामुळे या कथांना स्वतःचा बाज लाभलेला आहे. उद्याचा एक आश्वासक लेखक म्हणून त्यांच्याकडून अपेक्षा करणे वावगे ठरणार नाही ते यामुळेच.

डॉ. प्रकाश राठोड यांची मर्मग्राही अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. तसेच लेखकाचे स्वतःचे मनोगतही आवर्जून वाचावे असे आहे.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ या पुस्तकाला लाभलेले आहे. तांड्यावरील चित्र स्त्रीवेषातून साकारले आहे. अंगभर आभूषणे, तितकीच आभूषणे रंगीत वस्त्रांवर आणि कडेवर मूल, हा इथला जगण्यातला अभिन्न भाग. पाठीमागचे पाल हे सतत होणाऱ्या स्थलांतराचे प्रतीक. आशय आणि शीर्षक यांचा समन्वय साधणारे सुरेख मुखपृष्ठ लक्ष वेधून घेते.

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**काळे आकाश निळा प्रकाश**

**डॉ. प्रमोद सलगरकर**




**कवड्याशा वरील काळे डाग**


'मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम ठेवायचे असेल तर त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुलांना त्यांचे सर्व प्रकारचे प्रश्न मोकळेपणाने व निर्भयपणाने मांडता येण्यासा एक मुक्त व्यासपीठ असले पाहिजे. काही अत्यंत वैयक्तिक प्रश्न कौन्सिलर किंवा थेरपिस्टच्या मदतीने सोडवता येतील. मुलांची बरीचशी सायकॉलॉजिकल एनर्जी अशा निरर्थक व दिशाहीन संघर्ष व तणावामुळे वाया जाऊ नये.'

एड्स या भयानक रोगाविषयी अनेक समज गैरसमज समाजात पसरलेले आहेत. रुग्ण, नातेवाईक आणि समाज या सगळ्यांचा या रोगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण अतिशय गंभीर आणि तितकाच तिरस्कार भरलेला आहे. या रोगाने घातलेले थैमान १९९० चाली भयानक स्वरूपाचे असल्याचे जागतिक तपासणी अहवालात निष्कर्ष द्वारे स्पष्ट झाले. या आजाराविषयी चिकित्सक पद्धतीने तपासणी करून मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न झाला. यात या रोगाची सगळी वर्तुळे स्त्रियांच्या भोवती फिरत असल्याचे लक्षात येते आणि या वर्तुळात केवळ स्त्रिया सापडल्या आहेत असं नाही तर पुरुष देखील यात सापडलेले आहेत. आणि पुढचा निष्कर्ष असा की पुरुषांच्या मुळेच हा रोग स्त्रियांकडे संक्रमित झालेला आहे. अशा या वर्तुळाने एक मोठा परीघ निर्माण केलेला आहे. या सगळ्याची उत्पत्ती, उपाय, परिणाम, समाज, वैद्यकशास्त्र, राजकीय दृष्टिकोन आणि मानसिकता या अंगाने तपासणी करणे व त्यावर मोकळेपणाने चर्चा करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. याविषयी डॉक्टर सलगर यांनी अतिशय मेहनतीने आणि तितक्याच चिकित्सकपणे हा विषय या पुस्तकात मांडलेला आहे. डॉक्टर सलगर हे कन्सल्टंट सर्जन म्हणून काम पहात आहेत. त्याचबरोबर ते केअर अंड सपोर्ट युनिट फॉर पीपल लिविंग एच आय व्ही, चैतन्य हॉस्पिटल, चौपाड, सोलापूर येथे हे काम पहात आहेत. याशिवाय इतर वैद्यकीय संस्थांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग आहे. कार्ल रॉजर्स यांच्या मानसोपचार पद्धतीवर विश्लेषणात्मक या ग्रंथाचं लेखन त्यांनी केले आहे. गेल्या पंधरा वर्षापासून एचआयव्ही एड्सग्रस्त रुग्णांच्या बरोबर काम करीत आहेत त्यामुळे या विषयाचा सर्वांगीण विचार आणि सखोल चर्चा या पुस्तकात मांडलेला आहे. रोग आणि त्याचे निवारण हे केवळ वैद्यकीय विज्ञानाच्या अंतर्गत सोडविण्याचे विषय नसून आजाराचे बहुआयामी स्वरूप समजावून घेतल्याशिवाय त्यावर निर्णयाक उपाय योजना करता येणे शक्य नाही, हे सत्य एड्सने रेखित केले आहे. एचआयव्हीचा अभ्यास हा एका अर्थाने माणसांचा अभ्यास आहे. या अभ्यासातून अनुभवास आलेले संचित सुजाण वाचकांसमोर ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. या विषयाच्या अंतरंगात पहाताना लैंगिक भावनांचे शास्त्रीय विश्लेषण केलेले आहे त्यासाठी त्यांनी फ्रॉइड, युंग, सार्त्र यांच्या शास्त्रीय दृष्टिकोनांचा संदर्भ यात दिलेले आहे. तसेच माणसाच्या लैंगिक प्रेरणा व लैंगिक वर्तन, जीवशास्त्रीय प्रेरणा, सखोलता, व्यापकता आणि व्यामिश्रता यांचाही शोध या पुस्तकात घेतलेला आहे. अनेक रुग्णांची अनुभवाच्या आधारावर माहिती, त्यांचे अनुभव यात दिलेले आहेत. या आजारात सापडलेल्या रुग्णांची संख्या आकडेवारीसह दिलेली आहे. हा आजार मुळात आफ्रिकन देशातून सर्वत्र फैलावला असा समज आहे परंतु अमेरिकेसारख्या प्रगत देशातही याचे अस्तित्व आहे त्याचप्रमाणे भारतासह अन्य अनेक देशांचा समावेश आहे. मूळ शब्द पॉर्न, प्रॉस्टिट्यूट असा शब्द ग्रीकमध्ये आहे तो परनेम या क्रियापदापासून घेतला आहे. याचा अर्थ विकणे. देहविक्री असा यातून निघालेला अर्थ. कसल्याही प्रकारची कायदेशीर मान्यता किंवा सुरक्षितता नसल्यामुळे या व्यवसायाचे झपाट्याने गुन्हेगारीकरण झाले आहे. स्त्रियांवर होणारे अत्याचार, बळजबरी आणि केवळ भूक भागविणे या भूमिकेतून केली जाणारी कृती एवढेच याचे स्वरूप राहिले आहे. यामुळे आज अनेक संस्था या व्यवसायात आलेल्या स्त्रियांना कायदेशीर संरक्षण आणि त्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी प्रयत्न करीत आहेत. संपूर्ण अभ्यासानंतर औषधोपचाराने एड्स नियंत्रणात राहत असला तरी त्याचे समूळ निर्मूलन होऊ शकत नाही याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

प्रतिबंधक औषधांचा वापर आणि लैंगिक वर्तना बद्दलचा सारासार विवेक हेच या प्रश्नावर खरे उत्तर आहे. या विषयाची मांडणी करताना लेखकाने वेगवेगळे विभाग केलेले आहेत. विषय समजावून सांगताना त्यात वैद्यकीय शब्दांचा इंग्रजी वापर टाळलेला आहे त्यामुळे हा विषय समजणे सोपे झालेले आहे. लेखक स्वतः वैद्यकीय सर्जन असूनही त्यांच्या लेखनात सहज सोपेपणा आहे. अनेक संदर्भांचा उपयोग केल्याने या लेखनाला बहुमोल असे मूल्य लाभलेले आहे. कलकत्ता येथील सोनारा वस्ती आणि उपचार केंद्र, वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेले उपचार केंद्र यांची माहिती येथे दिलेली आहे

या पुस्तकाला डॉ. यश वेलणकर यांची प्रस्तावना लाभलेली आहे. ही प्रस्तावना केवळ लेखकाचे कौतुक करीत नाही तर या संपूर्ण विषयाचा साकल्याने विचार मांडलेला आहे. त्यामुळे हा विषय अधिक व्यापक आणि समावेशक असा झालेला आहे. लेखकाने स्वतःचे मनोगत दिलेले आहे. लेखनामागील भूमिका, उद्देश आणि त्यांचा अनुभव याविषयी त्यांनी प्रांजळपणे लिहिले आहे. हे एकूणच पुस्तक या विषयावरील एकमेव असावे असे वाटते. विषयाचे गांभीर्य, पुरुष आणि स्त्री यांची लैंगिकता, पुरुषसत्ताक पद्धतीचा दृष्टिकोन, माणसाची मानसिकता, रुग्णाचे अंतकरण, या सगळ्याचा साकल्याने विचार केलेला विचार हा प्रथमच वाचनात आलेला आहे त्यामुळे या विषयाची माहिती घेऊ इच्छिणाऱ्या, अभ्यास करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल. एका मोठ्या समस्येवर लेखकाने मोठ्या धैर्याने एक उत्तम पुस्तक लिहिले आहे, यासाठी त्यांचे अभिनंदन करायला हवे. शिरीष घाटे यांचं आकृतिबंध स्पष्ट करणारे मुखपृष्ठ सूचक आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**


AN UNBEATEN* CENTURY
FULL OF LIMITLESS BOUNDARIES
& OVER THE TOP
Happiness
NEW INDIA ASSURANCE
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd
Log in Now:
www.newindia.co.in
Time to Relax, Now 24x7 you can buy new / renew old policy, from any device from anywhere
Toll Free Number
1800-209-1415
Regd & head office: New India Assurance Bldg., 87, M.G Road, Fort, Mumbai- 400001, India
IRDAI Regn. No. 190
CIN No. : L66000MH1919GOI000526
Advt. No. : NIA/CCD/2019-20/112

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

**Invest More Earn More**

**FIXED DEPOSIT**

**7.50%* p.a.**

**for senior citizens**

**(For 13 - 24 months)**

7.25% for general customers

*T&C Apply

**Saraswat Bank**

**Saraswat Co-operative Bank Ltd.**
(Scheduled Bank)

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.